म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल वा.
दा. क्र. १०८९२

७०७९२

बा. वा
३९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

27 SEP 1974

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वा. वा.
वा. क्र. ३९५६



दत्ता ताम्हणे

# कळीचा घोडा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा क्र. १०८९२ नों दि
वि. बाल वा.

अनुक्रम ३५३२८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३१५६
नों. दि. १०/११/६७
वाचनालय शाखा

दत्ता ताम्हणे

साधना प्रकाशन, पुणें

प्रथमावृत्ति
१ जुलै १९६४

प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार पुणें

मुद्रक
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ, पुणें

© दत्ता ताम्हणे

मुखपृष्ठ
पामको कमार्शियल आर्टिस्ट

किंमत
१ रुपया ६० पैसे

## २ : एक भाऊ राजा झाला

प्रधान मोठ्या राणीच्या वाड्यांत आला तेव्हां तिला तिच्यावर कोसळणाऱ्या संकटाची तिला कल्पनाहि नव्हती. तिनें नेहमींप्रमाणें हंसतमुखानें प्रधानाचें स्वागत केलें. पण प्रधानाचा चेहरा आज उतरलेला होता. राणीची भेट होतांच त्याचें डोळे पाण्यानें डबडबले. राणीच्याहि पोटांत धस्स झालें ! हळूंहळूं प्रधानानें घडलेली सारी हकीगत राणीला सांगितली. शेवटीं आपण त्या मुलांना ठार न मारतां अरण्यांत सोडून देऊं व आपल्या नशीबानें आणि कर्तबगारीनें तीं मुलें राज्यपदावर चढतील अशी त्यानें राणीची समजूत घातली.

दूरच्या जंगलांत शिकारीला जायचें आहे असें राजपुत्रांना सांगण्यांत आलें. त्यांच्यासाठीं दोन घोडे सज्ज झाले. जरूर तीं शस्त्रें, वस्त्रें व फराळाचें सामान त्यांच्याबरोबर देण्यांत आलें. दोघेहि राजपुत्र आपल्या आईचा निरोप घेऊन निघाले. त्यावेळीं मोठ्या राणीच्या मनाची स्थिति काय झाली असेल तें सांगणें कठीण आहे. बाळांना आयुष्य दे, अशी तिनें देवीची प्रार्थना केली.

मजल दरमजल करीत राजपुत्र व प्रधान एका जंगलांत आले. तेथेंच त्यांना रात्र झाली. रात्रीं झाडाखालींच मुक्काम करावा असें ठरवून त्यांनीं फराळ केला, जवळच्या झऱ्याचें पाणी प्याले व आपल्या पथाऱ्या पसरल्या साऱ्या दिवसाच्या श्रमानें राजपुत्रांना लागलीच झोंप लागली.

राजपुत्रांना गाढ झोंप लागल्याचें पहातांच प्रधान हलकेंच उठला व आपल्या घोड्यावर बसून राजधानीकडे निघाला. वाटेंत दोन हरिण-शावकांची त्यानें शिकार केली व त्यांचे चार डोळे काढून बरोबर घेतले. राजधानींत पोंचतांच धाकट्या राणीला ते डोळे दाखविले. राजपुत्रांचेच ते डोळे असल्याची तिची खात्री झाली व तिनें एक समाधानाचा सुस्कारा टाकला !

पहांटेच्या गार वाऱ्यानें व पक्ष्यांच्या किलबिलाटानें राजपुत्र जागे झाले. मामा जवळपासच कोठेंतरी असेल असेच त्यांना प्रथम वाटलें. बराच वेळ त्यांनीं वाट पाहिली. आजूबाजूला शोध केला. पण प्रधानाचा घोडाहि कुठें दिसेना. अखेरीस प्रधान आपल्याला मुद्दामच जंगलांत टाकून गेला, हें त्या हुशार राजपुत्रांच्या लक्षांत यावयास उशीर लागला नाहीं.

आतां पुन्हां राजधानींत जाण्यांत धोका आहे, हेंहि ते समजून चुकले. वनवास व वनवासांतील संकटें सोसण्याची त्यांनीं मनाची तयारी केली. एके ठिकाणीं रहाण्यापेक्षां पुढला मार्ग आक्रमावा, कदाचित आपलें नशीव उदयास येईल, असें ठरवून ते पुढील प्रवासास निघाले. आणखी कांहीं दिवस पुरेल एवढी शिदोरी त्यांच्याजवळ होतीच. शिवाय दोन चपळ व सुंदर घोडेहि त्यांच्या ताब्यांत होते. धनुष्यबाण जवळ असल्यामुळें व दोघेहि धनुर्विद्येंत पारंगत असल्यामुळें रानांतील श्वापदांचीहि त्यांना तेवढी भीति नव्हती. अशा रीतीनें बरेच दिवस ते प्रवास करीत होते. जवळची शिदोरी संपल्यामुळें कंदमुळें व रानांतील मधुर फळें यांवर ते आपला निर्वाह करीत होते. रात्रीच्या वेळीं एखाद्या झाडाखालीं निवाऱ्याला रहावयाचें, पाळीपाळीनें पहारा करावयाचा, दिवसां शिकार करून व कंदमुळें गोळा करून निर्वाह करावयाचा, एकाद्या ठिकाणाचा कंटाळा आला किंवा मृगया किंवा कंदमुळें मिळेनाशीं झालीं कीं पांचपंचवीस मैल पुढें कूच करावयाचें, अशा रीतीनें ते कालक्रमण करीत होते.

दिवस गेले, महिने गेले, कांहीं वर्षेंहि निघून गेलीं! ते वनवासी राजपुत्र आतां शैशवांतून पुढें जाऊन कुमार बनले होते. डोक्यावर जटा वाढल्या होत्या. अंगावरील वस्त्रें जीर्ण झालीं होतीं. अनेक अरण्यें एव्हांना त्यांनीं मागें टाकलीं होतीं.

असाच प्रवास करतां करतां एकदां एका अरण्यांत एक मनोहर ठिकाण त्यांना दिसलें. गर्द आंब्याची राई, झुळझुळ वाहणारा झरा, निवाऱ्याला उपयोगी पडेल असें एक जुनाट मंदिर हें सर्व पाहून यापुढें एकसारखे भटकत न रहातां तेथेंच कायमचें रहावें, असें त्यांनीं ठरविलें.

पहिल्याच रात्रीं त्या दोघा राजपुत्रांपैकीं मोठा झोपला होता व धाकटा राजपुत्र पहारा करीत होता. मध्यरात्र झाली होती. देवीच्या मूर्तीच्या पाठी-मागून एक मोठा भुजंग बाहेर आला. त्यानें आपल्या फणेंतील देदीप्यमान मणी देवीसमोर ठेवला व भक्ष्याच्या शोधार्थ देवळांतून बाहेर पडला.

देवळाजवळील एका झाडावर त्याच वेळीं एक पिंगळा येऊन बसला. तो भुजंग व पिंगळा मानवी आवाजांत एकमेकांशीं बोलूं लागले! धाकटा राजपुत्र कांहींशा भीतीनें व कांहींशा आश्चर्यानें त्यांचें बोलणें ऐकूं लागला.

भुजंग पिंगळ्याला म्हणाला, "तुला जर कोणी ठार मारील व तुझें शीर खाईल तर त्याला राज्यपद मिळेल व धड खाईल तर तो दरिद्री राहील.

पण जर एखाद्यानें नुसतें शीर खाऊन धड फेंकून दिलें तर तो कायमचा आंधळा होईल. ”

हें ऐकून पिंगळा भुजंगाला म्हणाला, “ तुझ्या फणेमधील देदीप्यमान लाल कोणी काढून घेतला तर पहिले सहा महिने तो हाल भोगील पण नंतर त्यास राज्यपद मिळेल. ”

हें भाषण ऐकतांच तो धाकटा राजपुत्र उठला व हातांतील तीरकमठ्यानें त्या पिंगळ्याला त्यानें ठार केलें. नंतर देवीच्या गाभाऱ्यांत जाऊन सापानें फणीतील काढून ठेवलेला तो तेजस्वी खडा उचलून आपल्या अंगावरील कपड्यांत गुंडाळून ठेवला व नंतर पिंगळ्याचें धड खाऊन टाकलें. पिंगळ्याचें शीर त्यानें आपल्या मोठ्या भावासाठीं ठेवून दिलें. आपण दरिद्री राहिलों तरी चालेल; पण आपल्या मोठ्या भावाला राज्यपद मिळावें, अशी त्याची मनापासून इच्छा होती. शिवाय पिंगळा व भुजंग यांच्या भाषणांतील शब्द न् शब्द खरा असेल तर सहा महिन्यांनंतर अपणांसहि राज्यपद मिळेल. कारण तो सर्पमणी आपणांजवळ आहे, हाहि विचार मनांत होताच.

मोठ्या भावाची पहाऱ्याची वेळ होतांच धाकट्या राजपुत्रानें त्यास जागें केलें व त्याच्या उशाखालीं ठेवलेली शिकार खाऊन टाकण्यास सांगितलें. त्या शिकारीमागचा अद्‌भुत इतिहास मात्र त्यानें त्यास सांगितला नाहीं. मोठ्या भावानें तें शीर खाल्लेलें पाहून मगच धाकटा राजपुत्र झोंपी गेला व मोठ्या भावानें पहाऱ्याचें काम सुरू केलें.

इकडे भक्ष्य शोधावयास गेलेला भुजंग मध्यरात्र उलटतांच आपल्या वारुळांत जाण्यासाठीं परत आला. देवीच्या गाभाऱ्यांत येऊन आपला मणी त्यानें सगळीकडे शोधला. पण धाकट्या राजपुत्रानें तो केव्हांच उचलून आपल्या कपड्यांत गुंडाळून ठेवलेला होता. तो त्या सर्पराजास कसा बरें मिळणार ?

संतापानें त्या भुजंगानें झोपीं गेलेल्या धाकट्या राजपुत्राच्या पायाला कडकडून चावा घेतला. भुजंगाच्या जालीम विषानें तो सुकुमार राजपुत्र जागच्या जागीं गतप्राण झाला व कांहीं अंतरावर तो भुजंगहि मरून पडला.

मोठा राजपुत्र पहारा संपवून आंत आला तेव्हां दिशा फाकूं लागल्या होत्या. धाकटा राजपुत्र उठण्याची तो वाट पाहूं लागला. बराच वेळ झाला तरी

आतां पुन्हां राजधानींत जाण्यांत धोका आहे, हेंहि ते समजून चुकले. वनवास व वनवासांतील संकटें सोसण्याची त्यांनीं मनाची तयारी केली. एके ठिकाणीं रहाण्यापेक्षां पुढला मार्ग आक्रमावा, कदाचित आपलें नशीब उदयास येईल, असें ठरवून ते पुढील प्रवासास निघाले. आणखी कांहीं दिवस पुरेल एवढी शिदोरी त्यांच्याजवळ होतीच. शिवाय दोन चपळ व सुंदर घोडेहि त्यांच्या ताब्यांत होते. धनुष्यबाण जवळ असल्यामुळें व दोघेहि धनुर्विद्येंत पारंगत असल्यामुळें रानांतील श्वापदांचीहि त्यांना तेवढी भीति नव्हती. अशा रीतीनें बरेच दिवस ते प्रवास करीत होते. जवळची शिदोरी संपल्यामुळें कंदमुळें व रानांतील मधुर फळें यांवर ते आपला निर्वाह करीत होते. रात्रीच्या वेळीं एखाद्या झाडाखालीं निवाऱ्याला रहावयाचें, पाळीपाळीनें पहारा करावयाचा, दिवसां शिकार करून व कंदमुळें गोळा करून निर्वाह करावयाचा, एकाद्या ठिकाणाचा कंटाळा आला किंवा मृगया किंवा कंदमुळें मिळेनाशीं झालीं कीं पांचपंचवीस मैल पुढें कूच करावयाचें, अशा रीतीनें ते कालक्रमण करीत होते.

दिवस गेले, महिने गेले, कांहीं वर्षेंहि निघून गेलीं ! ते वनवासी राजपुत्र आतां शैशवांतून पुढें जाऊन कुमार बनले होते. डोक्यावर जटा वाढल्या होत्या. अंगावरील वस्त्रें जीर्ण झालीं होतीं. अनेक अरण्यें एव्हांना त्यांनीं मागें टाकलीं होतीं.

असाच प्रवास करतां करतां एकदां एका अरण्यांत एक मनोहर ठिकाण त्यांना दिसलें. गर्द आंब्याची राई, झुळझुळ वाहणारा झरा, निवाऱ्याला उपयोगी पडेल असें एक जुनाट मंदिर हें सर्व पाहून यापुढें एकसारखे भटकत न रहातां तेथेंच कायमचें रहावें, असें त्यांनीं ठरविलें.

पहिल्याच रात्रीं त्या दोघा राजपुत्रांपैकीं मोठा झोपला होता व धाकटा राजपुत्र पहारा करीत होता. मध्यरात्र झाली होती. देवीच्या मूर्तीच्या पाठीमागून एक मोठा भुजंग बाहेर आला. त्यानें आपल्या फणेंतील देदीप्यमान मणी देवीसमोर ठेवला व भक्ष्याच्या शोधार्थ देवळांतून बाहेर पडला.

देवळाजवळील एका झाडावर त्याच वेळीं एक पिंगळा येऊन बसला. तो भुजंग व पिंगळा मानवी आवाजांत एकमेकांशीं बोलूं लागले ! धाकटा राजपुत्र कांहींशा भीतीनें व कांहींशा आश्चर्यानें त्यांचें बोलणें ऐकूं लागला.

भुजंग पिंगळ्याला म्हणाला, “तुला जर कोणी ठार मारील व तुझें शीर खाईल तर त्याला राज्यपद मिळेल व धड खाईल तर तो दरिद्री राहील.

पण जर एखाद्यानें नुसतें शीर खाऊन धड फेंकून दिलें तर तो कायमचा आंधळा होईल. ”

हें ऐकून पिंगळा भुजंगाला म्हणाला, “ तुझ्या फणेमधील देदीप्यमान लाल कोणी काढून घेतला तर पहिले सहा महिने तो हाल भोगील पण नंतर त्यास राज्यपद मिळेल. ”

हें भाषण ऐकतांच तो धाकटा राजपुत्र उठला व हातांतील तीरकमठ्यानें त्या पिंगळ्याला त्यानें ठार केलें. नंतर देवीच्या गाभाऱ्यांत जाऊन सापानें फणीतील काढून ठेवलेला तो तेजस्वी खडा उचलून आपल्या अंगावरील कपड्यांत गुंडाळून ठेवला व नंतर पिंगळ्याचें धड खाऊन टाकलें. पिंगळ्याचें शीर त्यानें आपल्या मोठ्या भावासाठीं ठेवून दिलें. आपण दरिद्री राहिलों तरी चालेल; पण आपल्या मोठ्या भावाला राज्यपद मिळावें, अशी त्याची मनापासून इच्छा होती. शिवाय पिंगळा व भुजंग यांच्या भाषणांतील शब्द न् शब्द खरा असेल तर सहा महिन्यांनंतर अपणांसहि राज्यपद मिळेल. कारण तो सर्पमणी आपणांजवळ आहे, हाहि विचार मनांत होताच.

मोठ्या भावाची पहाऱ्याची वेळ होतांच धाकट्या राजपुत्रानें त्यास जागें केलें व त्याच्या उशाखालीं ठेवलेली शिकार खाऊन टाकण्यास सांगितलें. त्या शिकारीमागचा अद्भुत इतिहास मात्र त्यानें त्यास सांगितला नाहीं. मोठ्या भावानें तें शीर खाल्लेलें पाहून मगच धाकटा राजपुत्र झोंपी गेला व मोठ्या भावानें पहाऱ्याचें काम सुरू केलें.

इकडे भक्ष्य शोधावयास गेलेला भुजंग मध्यरात्र उलटतांच आपल्या वारुळांत जाण्यासाठीं परत आला. देवीच्या गाभाऱ्यांत येऊन आपला मणी त्यानें सगळीकडे शोधला. पण धाकट्या राजपुत्रानें तो केव्हांच उचलून आपल्या कपडयांत गुंडाळून ठेवलेला होता. तो त्या सर्पराजास कसा बरें मिळणार ?

संतापानें त्या भुजंगानें झोपीं गेलेल्या धाकट्या राजपुत्राच्या पायाला कडकडून चावा घेतला. भुजंगाच्या जालीम विषानें तो सुकुमार राजपुत्र जागच्या जागीं गतप्राण झाला व कांहीं अंतरावर तो भुजंगहि मरून पडला.

मोठा राजपुत्र पहारा संपवून आंत आला तेव्हां दिशा फाकूं लागल्या होत्या. धाकटा राजपुत्र उठण्याची तो वाट पाहूं लागला. बराच वेळ झाला तरी

आतां पुन्हां राजधानींत जाण्यांत धोका आहे, हेंहि ते समजून चुकले. वनवास व वनवासांतील संकटें सोसण्याची त्यांनीं मनाची तयारी केली. एके ठिकाणीं रहाण्यापेक्षां पुढला मार्ग आक्रमावा, कदाचित आपलें नशीब उदयास येईल, असें ठरवून ते पुढील प्रवासास निघाले. आणखी कांहीं दिवस पुरेल एवढी शिदोरी त्यांच्याजवळ होतीच. शिवाय दोन चपळ व सुंदर घोडेहि त्यांच्या ताब्यांत होते. धनुष्यबाण जवळ असल्यामुळें व दोघेहि धनुर्विद्येंत पारंगत असल्यामुळें रानांतील श्वापदांचीहि त्यांना तेवढी भीति नव्हती. अशा रीतीनें बरेच दिवस ते प्रवास करीत होते. जवळची शिदोरी संपल्यामुळें कंदमुळें व रानांतील मधुर फळें यांवर ते आपला निर्वाह करीत होते. रात्रीच्या वेळीं एखाद्या झाडाखालीं निवाऱ्याला रहावयाचें, पाळीपाळीनें पहारा करावयाचा, दिवसां शिकार करून व कंदमुळें गोळा करून निर्वाह करावयाचा, एकाद्या ठिकाणाचा कंटाळा आला किंवा मृगया किंवा कंदमुळें मिळेनाशीं झालीं कीं पांचपंचवीस मैल पुढें कूच करावयाचें, अशा रीतीनें ते कालक्रमण करीत होते.

दिवस गेले, महिने गेले, कांहीं वर्षेंहि निघून गेलीं! ते वनवासी राजपुत्र आतां शैशवांतून पुढें जाऊन कुमार बनले होते. डोक्यावर जटा वाढल्या होत्या. अंगावरील वस्त्रें जीर्ण झालीं होतीं. अनेक अरण्यें एव्हांना त्यांनीं मागें टाकलीं होतीं.

असाच प्रवास करतां करतां एकदां एका अरण्यांत एक मनोहर ठिकाण त्यांना दिसलें. गर्द आंब्याची राई, झुळझुळ वाहणारा झरा, निवाऱ्याला उपयोगी पडेल असें एक जुनाट मंदिर हें सर्व पाहून यापुढें एकसारखे भटकत न रहातां तेथेंच कायमचें रहावें, असें त्यांनीं ठरविलें.

पहिल्याच रात्रीं त्या दोघा राजपुत्रांपैकीं मोठा झोपला होता व धाकटा राजपुत्र पहारा करीत होता. मध्यरात्र झाली होती. देवीच्या मूर्तीच्या पाठी-मागून एक मोठा भुजंग बाहेर आला. त्यानें आपल्या फणेंतील देदीप्यमान मणी देवीसमोर ठेवला व भक्ष्याच्या शोधार्थ देवळांतून बाहेर पडला.

देवळाजवळील एका झाडावर त्याच वेळीं एक पिंगळा येऊन बसला. तो भुजंग व पिंगळा मानवी आवाजांत एकमेकांशीं बोलूं लागले! धाकटा राजपुत्र कांहींशा भीतीनें व कांहींशा आश्चर्यानें त्यांचें बोलणें ऐकूं लागला.

भुजंग पिंगळ्याला म्हणाला, "तुला जर कोणी ठार मारील व तुझें शीर खाईल तर त्याला राज्यपद मिळेल व धड खाईल तर तो दरिद्री राहील.

पण जर एखाद्यानें नुसतें शीर खाऊन धड फेंकून दिलें तर तो कायमचा आंधळा होईल. "

हें ऐकून पिंगळा भुजंगाला म्हणाला, " तुझ्या फणेमधील देदीप्यमान लाल कोणी काढून घेतला तर पहिले सहा महिने तो हाल भोगील पण नंतर त्यास राज्यपद मिळेल. "

हें भाषण ऐकतांच तो धाकटा राजपुत्र उठला व हातांतील तीरकमठ्यानें त्या पिंगळ्याला त्यानें ठार केलें. नंतर देवीच्या गाभाऱ्यांत जाऊन सापानें फणीतील काढून ठेवलेला तो तेजस्वी खडा उचलून आपल्या अंगावरील कपड्यांत गुंडाळून ठेवला व नंतर पिंगळ्याचें धड खाऊन टाकलें. पिंगळ्याचें शीर त्यानें आपल्या मोठ्या भावासाठीं ठेवून दिलें. आपण दरिद्री राहिलों तरी चालेल; पण आपल्या मोठ्या भावाला राज्यपद मिळावें, अशी त्याची मनापासून इच्छा होती. शिवाय पिंगळा व भुजंग यांच्या भाषणांतील शब्द न् शब्द खरा असेल तर सहा महिन्यांनंतर अपणांसहि राज्यपद मिळेल. कारण तो सर्पमणी आपणांजवळ आहे, हाहि विचार मनांत होताच.

मोठ्या भावाची पहाऱ्याची वेळ होतांच धाकट्या राजपुत्रानें त्यास जागें केलें व त्याच्या उशाखालीं ठेवलेली शिकार खाऊन टाकण्यास सांगितलें. त्या शिकारीमागचा अद्भुत इतिहास मात्र त्यानें त्यास सांगितला नाहीं. मोठ्या भावानें तें शीर खाल्लेलें पाहून मगच धाकटा राजपुत्र झोंपी गेला व मोठ्या भावानें पहाऱ्याचें काम सुरू केलें.

इकडे भक्ष्य शोधावयास गेलेला भुजंग मध्यरात्र उलटतांच आपल्या वारुळांत जाण्यासाठीं परत आला. देवीच्या गाभाऱ्यांत येऊन आपला मणी त्यानें सगळीकडे शोधला. पण धाकट्या राजपुत्रानें तो केव्हांच उचलून आपल्या कपडयांत गुंडाळून ठेवलेला होता. तो त्या सर्पराजास कसा वरें मिळणार ?

संतापानें त्या भुजंगानें झोपीं गेलेल्या धाकट्या राजपुत्राच्या पायाला कडकडून चावा घेतला. भुजंगाच्या जालीम विषानें तो सुकुमार राजपुत्र जागच्या जागीं गतप्राण झाला व कांहीं अंतरावर तो भुजंगहि मरून पडला.

मोठा राजपुत्र पहारा संपवून आंत आला तेव्हां दिशा फाकूं लागल्या होत्या. धाकटा राजपुत्र उठण्याची तो वाट पाहूं लागला. बराच वेळ झाला तरी

त्याची कांहींच हालचाल नाहीं, हें पाहून मोठा राजपुत्र त्याला उठवण्यासाठीं जवळ गेला. पहातो तों राजपुत्राचें शरीर हिरवें-निळें झालें असून काल्यासारखें गार झालेलें. आपला भाऊ गतप्राण झाला आहे, हें समजण्यास त्याला उशीर लागला नाहीं. कांहीं अंतरावर एक प्रचंड भुजंग मरून पडलेला होता. त्या सर्पाच्या दंशामुळेंच आपल्या भावास मृत्यु आला याबद्दल त्याची खात्री झाली.

भावाच्या प्रेताजवळ बसून तो शोक करूं लागला. पण अरण्यांतला तो आक्रोश कोणाच्या कानावर जाणार? डोळ्यांतील अश्रू आटून डोळे कोरडे होईपर्यंत तो रडला. पण त्याचें सांत्वन कोण करणार? या विशाल जंगलांत आपण एकटेच आहोंत, याची जाणीव होऊन त्याचा दुःखावेग वाढतच गेला.

सूर्य डोक्यावर आला तरी त्यानें अन्नपाण्याला स्पर्श केला नाहीं. अखेरीस त्या ठिकाणीं रहाण्यांत आतां अर्थ नाहीं, असा विचार करून त्यानें आपल्या भावाचें प्रेत एका झुडपाच्या बाजूला ठेवलें व आपल्या घोड्यावर स्वार होऊन व भावाचाहि घोडा बरोबर घेऊन त्यानें मोठ्या कष्टानें आपला मुक्काम हालवला व पुढला मार्ग आक्रमूं लागला. कित्येक दिवस त्यानें रानांतून प्रवास केला. अनेक उंच उंच पहाड ओलांडून तो समुद्रकिनाऱ्याच्या सपाट प्रदेशांत आला. मोठमोठीं वाळवंटें व सुरूचीं बनें ओलांडून अखेरीस एका शहरांत तो येऊन पोंचला.

राजधानी सोडल्यानंतर मनुष्यवस्तींत असा तो प्रथमच येत होता. डोक्यावर लांब लांब जटा, अंगावर फाटक्या चिंध्या, असा हा घोडेस्वार पाहून मुलें तर त्याच्या मागेंच लागलीं! गांवाबाहेरील एका देवळाजवळील झाडाखालीं त्यानें आपले घोडे बांधले व भिक्षा मागून कांहीं खावयास मिळतें काय हें पहाण्यासाठीं गांवांतील हमरस्त्याकडे तो निघाला. ज्या गांवांत हा नवा भिकारी आला होता तें गांव म्हणजे एका राजाची राजधानी होती. मोठमोठ्या बाजारपेठा, उंच उंच वाडे, सुंदर सुंदर इमारती, उपवनें, मोठमोठे राजपथ असा त्या गांवाचा थाट होता.

पण काय असले तें असो त्या दिवशीं सारीं दुकानें बंद होती. राजरस्ते ओसाड वाटत होते. क्वचित् जीं माणसें रस्त्यानें जातां येतां दिसत त्यांचें चेहरे दुःखमग्न होते! भिकाऱ्यानें चौकशी केली तेव्हां त्याला समजलें कीं, त्या देशाचा राजा मृत्यु पावला असून अजून त्याच्या शवाला अग्निहि देण्यांत आला नव्हता. राजाला मुलगा नसून फक्त एक मुलगी आहे व तीच राज्याची वारस आहे. तिचें अजून लग्न झालेलें नाहीं. तिच्या लग्नानंतर जावयाच्या हातीं राजाचें क्रियाकर्म केलें जाईल व मग जावयाला राज्याभिषेक होईल. राजकन्येचें लग्न

वाटेल त्या राजपुत्राशीं होणार नाहीं. तर तिचें स्वयंवर होईल व दरबारचा हत्ती आपल्या सोंडेतील फुलांचा हार ज्याच्या गळ्यांत घालील त्याच्याशींच राजकन्येचें लग्न होईल.

त्याच दिवशीं सायंकाळीं राजकन्येचें स्वयंवर योजण्यांत आलें. होतें. हें सर्व समजल्यावर राजकन्येच्या स्वयंवराची मौज आपणहि पहावी, असें या भिकाऱ्यास वाटलें व राजवाड्यापासून दूर एका झाडाखालीं बसून तो मौज पाहूं लागला.

हळूंहळूं अनेक राजबिंडे तरुण राजवाड्याच्या दिशेनें जातांना त्यानें पाहिलें. भरजरी कपडे परिधान केलेले व उमद्या घोड्यावर स्वार होऊन देशो-देशींचें अमीरउमराव व त्यांचीं तरुण मुलेंहि गर्दीगर्दीनें राजवाड्याकडे चाललीं होतीं.

एका मस्त हत्तीच्या सोंडेंत माळ देण्यांत आली. माहूत हत्तीवर स्वार झाला. हत्तीला काबूंत ठेवणें एवढेंच माहूताचें काम. कोणत्याहि दिशेला जायला हत्तीला मज्जाव नव्हता.

राजवाड्यापुढील प्रचंड शामियान्यांत हत्तीनें सर्व बाजूंनीं एक फेरी घातली व तेथून तो तडक बाहेर पडला. शामियान्यांतील एकहि राजपुत्र अथवा उमराव त्याला जणूं काय राज्याचा वारस म्हणून पसंत पडला नाहीं! आतां हा गजेन्द्र काय करतो, इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. राजवाड्याच्या बाहेर राजरस्त्याच्या दुतर्फा नागरिकांची गर्दी होती. ती सारी गर्दी मागें टाकून हत्ती पुढें चालूं लागला. आपल्या नव्या राजाच्या दर्शनासाठीं सारे नागरिक हत्तीच्या मागून चालूं लागले. ही सर्व मिरवणूक राजवाड्यापासून बरीच दूर चालत आली.

दूर अंतरावर एका झाडाखालीं भिकाऱ्यासारखा दिसणारा तो राजपुत्र उभा होता. हत्तीनें सरळ जाऊन त्याच्या गळ्यांत माळ घातली. हत्तीच्या मागोमाग शृंगारलेल्या रथांतून येत असलेली राजकन्या तर हा प्रकार पाहून भांबावूनच गेली. एका भिकाऱ्याशीं आपलें लग्न होणार व हा अडाणी भिकारी या राज्याचा राजा होणार ही कल्पना मनांत येऊन तिचें अंग शहारलें! लोकहि चिडले. त्या भिकाऱ्याच्या गळ्यांतील माळ त्यांनीं हिसकावून घेतली व त्यास हाकून दिलें! त्या दळभद्री हत्तीला हत्तीखान्यांत डांबण्यांत आलें व एक नवीन हत्तीण सजवून तिच्या सोंडेंत माळ देऊन पुन्हां स्वयंवराचा थाट मांडण्यांत आला.

पुन्हां आपला पहिलाच प्रकार ! हत्तीण सबंध मंडपांत फीर फीर फिरली, पण माळ कुणाऱ्याहि गळ्यांत न घालतां मंडपाच्या बाहेर पडली. दुतर्फा गर्दी असलेल्या राजरस्त्यांतून ती पुढें पुढें जाऊं लागली. सबंध गांव संपला तरी हत्तीण चालतच होती. राजकन्येचा रथ व त्यामागें प्रचंड जनसमुदायहि हत्तीणीच्या मागें चालला होता. अखेरीस गांवाबाहेरील देवळापाशीं ती आली. भिकारी राजपुत्र याच देवळापाशीं उतरला होता. सरळ येऊन हत्तीणीनें त्याच्या गळ्यांत माळ घातली ! सारे लोक आश्चर्यचकित झाले. यावेळीं ते चिडले नाहींत. परमेश्वरी संकेतच तसा असला पाहिजे, असें मानून ते राजकन्येकडे पाहूं लागले. राजकन्येनेंहि आपल्यासाठीं विधात्यानें हाच वर योजिला आहे, असें समजून त्याच्या गळ्यांत माळ घातली. नव्या राजाला वाजतगाजत राजवाड्यांत नेण्यांत आलें. त्याचा जटांचा संभार उतरवण्यांत आला. सुवासिक तेलें लावून त्याला अभ्यंगस्नान घातलें व उंची भरजरी कपडे त्याच्या अंगावर घातले.

आतां तो भिकारी एखाद्या राजपुत्रासारखा किंबहुना त्याहूनहि अधिक सुंदर दिसूं लागला ! हा भिकारी एखाद्या राजघराण्यांतील कोणीतरी युवक असला पाहिजे व दुर्दैवाच्या फेऱ्यांत सापडल्यानें त्याला अशा अवस्थेंत रहावें लागलें असावें, असें प्रत्येकासच वाटलें.

लग्नसोहळा पार पडला. नव्या राजाला राज्याभिषेक झाला व मृत राजाच्या प्रेताला अग्नि देऊन अंत्यसंस्कार करण्यांत आले. त्यानंतर भरलेल्या पहिल्याच दरबारांत राजपुत्रानें म्हणजेच नव्या राजानें आपला पूर्वेतिहास सर्वांना सांगितला. तें सर्व ऐकून लोकांना आश्चर्य तर वाटलेंच, पण त्याबरोबर परमेश्वराच्या लीलेचें कौतुकहि वाटलें व नव्या राजाविषयीं त्यांचा आदर दुणावला.

## २ : दुसऱ्या भावाचा वनवास

इकडे धाकट्या राजपुत्राचें प्रेत जंगलामध्यें एका झुडपापाशीं पडलें होतें. ज्या देवळांत ते राजपुत्र राहिले होते. तें देऊळ म्हणजे त्यांच्या पित्यानें ज्या देवीची सेवा करून पुत्रप्राप्तीसाठीं आंब्याचीं दोन फळें मिळविलीं होतीं त्याच देवीचें होतें ! त्या रात्रीं देवी नेहमींप्रमाणें गस्तीसाठीं बाहेर निघाली

तेव्हां राजपुत्राचें प्रेत एका झुडपाजवळ पडलेलें तिनें पाहिलें. आपल्या प्रसादामुळेंच जन्मलेल्या त्या मुलाची ती अवस्था पाहून त्या देवतेनें आपल्या हातांतील अमृतकुंभांतील अमृताचे दोन थेंब राजपुत्राच्या तोंडांत टाकले. त्याबरोबर राजपुत्र झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें खडबडून उठून बसला. आपण देवळांत झोपलों असतांना येथें कसे आलों, हेंच त्याच्या लक्षांत येईना. तो तसाच उठला व चांचपडत चांचपडत मंदिरांत गेला. तिथें त्याला मोठा भाऊ दिसला नाहीं. त्यानें हाका मारल्या. पण कुठूनही त्याच्या हाकेला 'ओ' आली नाहीं. त्यानें आजूबाजूला पाहिलें तर सामानसुमान अथवा घोडेहि जवळ नव्हते. थोडा वेळ विचार केल्यावर त्याच्या लक्षांत आलें कीं, आपणांस सर्पदंश झाला, आपण बेशुद्ध झालों व कदाचित आपण मेलों आहोंत असें समजून आपला मोठा भाऊ आपणास येथेंच टाकून गेला असावा ! त्यानेंहि ती जागा सोडून जाण्याचें ठरविलें. अंगावरील कपड्यांत गुंडाळून ठेवलेला सर्पमणी त्यानें चांचपून पाहिला. मणी सुखरूप जवळ आहे, हें पाहून त्यास त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें. दिशा उजळतांच तो मार्ग आक्रमूं लागला.

कित्येक दिवस तो पायीं प्रवास करीत होता. अनेक उंच उंच पहाड ओलांडून तो समुद्रकिनाऱ्याच्या सपाट प्रदेशांत आला. मोठमोठीं वाळवंटें व सुरूचीं वनें ओलांडून अखेरीस एका शहरापाशीं तो येऊन पोंचला. गांववेशीवरील एका देवळात मुक्काम करून त्यानें त्या गांवाची चौकशी केली. तें शहर एका राजाची राजधानी असून तेथील नवा राजा राज्यावर येतांना घडलेली हकीगत त्याला ऐकायला मिळाली. राजानें दरबारांत सांगितलेला आपला इतिहास प्रत्येक नागरिकाच्या स्मरणांत होता. तो इतिहासहि या राजपुत्राला समजला. हा राजा म्हणजे आपला मोठा भाऊ होय, हें त्याच्या लक्षांत येण्यास मुळींच विलंब लागला नाहीं. पिंगळा व भुजंग यांच्या संवादाची त्याला आठवण झाली त्या संवादांतील एक भाग खरा ठरला होता. जो पिंगळ्याचें शीर खाईल. त्यास राज्यपद मिळावयाचें होतें. त्याप्रमाणें त्याचा भाऊ राजा झाला होता आता सर्पमण्याची प्रचीति पहायची होती. आणखी कांहीं दिवस भावाला ओळख द्यावयाची नाहीं, योग्य वेळीं सर्पमण्याच्या प्रभावानें आपला हा वनवास संपेल, तोंपर्यंत वाट पहायची, असें त्यानें ठरविलें.

दररोज गांवांत भिक्षा मागावयाची किंवा गांवाबाहेरील कंदमुळें आणि फळें आणून खावयाचीं, अशा रीतीनें तो कितीतरी दिवस आपली गुजराण करीत होता. एक दिवस जंगलांतून परत यावयास त्याला उशीर झाला.

गांवाभोंवतीं एक मैलभर अंतर सोडून एक तट बांधलेला होता. या तटाला असलेल्या वेशींतूनच गांवांत येण्यासाठीं वाट होती. सूर्यास्तानंतर दोन तासांनीं ती वेस बंद होई व सूर्योदयापूर्वी दोन घटका आधीं ती उघडली जाई. राजपुत्र त्या दिवशीं वेशीजवळ आला तों ती वेस बंद झालेली! त्यामुळें वेशी-बाहेरच रात्र काढण्यावांचून त्याला गत्यंतर नव्हतें. वेशीच्या कडेला जागा साफ करून तों अंग टाकणार तोंच त्याला जवळच्याच शेतांत कसलीतरी हालचाल दिसली. गेले अनेक महिने रात्रंदिवस रानांत रहायची संवय असल्यानें जंगली जनावरांची किंचितहि हालचाल त्याच्या ध्यानांत चटकन येई व लगेच तो आपला तीरकमठा सज्ज करी. ह्या वेळीं चांदण्याच्या प्रकाशांत त्याला दिसलें कीं, एक लाव त्याच्याच दिशेनें येत होती! लाव हें एक अत्यंत क्रूर जनावर असून मनुष्याचें रक्तमांस हें त्याचें आवडतें भक्ष्य असतें. राजपुत्रानें सहज लीलेनें व अगदीं निर्भयपणें त्या जनावरावर बाणांची वृष्टि केली. तें जनावर जागच्या जागीं मरून पडलें! मग राजपुत्र थोडयाच वेळांत झोंपीं गेला.

नेहमींप्रमाणें पहाटें ती वेस उघडण्यांत आली. शेतावर व गवत कापणी-वर जाणाऱ्या मजुरांची जा-ये सुरू झाली. कांहीं मजुरांनीं लावेचें तें धूड पाहिलें. उशाशीं तीरकमठा घेऊन झोपलेल्या त्या भिकाऱ्याचेंच हें काम असलें पाहिजे, हें त्यांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. गेलीं अनेक वर्षे ती लाव गांवकऱ्यांना उपद्रव देत असे. कित्येक जिवंत मुलें तिनें पळवून नेलीं होतीं. तिच्या त्रासानें बकरी, कोंबडया एवढेंच नव्हे, तर गुरें पाळणेंहि मुष्किल झालें होतें! पुष्कळ शिकाऱ्यांनीं तिला मारण्याचा प्रयत्न केला होता. पण कुणालाहि यश आलें नाहीं. म्हणून ती लाव मारणाराला एक हजार मोहरांचें बक्षिस राजानें लावलें होतें. त्या मजुरांना हें माहीत होतें म्हणून ती मेलेली लाव पहातांच त्यांच्या मनांत लोभ उत्पन्न झाला. त्यांनीं त्या भिकाऱ्याला अलगद उचलून जवळच्या एका खंदकांत फेंकून दिलें। आपल्या विळ्यांनीं लावेचे तुकडे करून तिच्या रक्तानें विळे माखवून लावेचे ते तुकडे घेतले आणि ते राजवाड्यांत गेले! त्या मजुरांवर अविश्वास दाखविण्यास कांहींच कारण नव्हतें. त्या शूर मजुरांचा राजानें भर दरबारांत सत्कार केला व हजार मोहरा त्यांना बक्षिस देऊन आपल्या सैन्यांत त्यांना नोकऱ्या दिल्या

ज्या खंदकांत त्या राजपुत्राला टाकण्यांत आलें त्यांत पाणी मुळींच नव्हतें. उलट तळाशीं गवत व झुडपें वाढलेलीं होतीं. उंचावरून पडल्यामुळें राजपुत्र कांहीं काळ बेशुद्ध झाला; पण दुसरी कोणतीहि इजा त्यास झाली

नाहीं. थोड्या वेळानें शुद्धीवर आल्यावर आपण या खंदकांत कसे पडलों हें कांहींच त्याला कळेना. खंदकांत त्यानें इकडेतिकडे पाहिलें. पण वर जाण्यास कोठेंहि मार्ग नव्हता. त्यानें मदतीसाठीं हांका मारल्या. पण भोवतालचा प्रदेश निर्जन असल्यामुळें त्याच्या हांकेस कोठूनहि उत्तर मिळालें नाहीं.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो त्या खंदकांत पडून होता. भुकेमुळें त्याच्या पोटांत कावळे ओरडूं लागले होते. ओरडून ओरडून व तहानेनें त्याचा घसा कोरडा पडला होता. आतां याच ठिकाणीं आपण मरून जाणार, असें त्याला वाटलें. पण मरणापूर्वीं एकदां अखेरचा प्रयत्न करावा म्हणून असेल नसेल तेवढा सर्व जोर एकवटून त्यानें पुन्हां एकदां मदतीसाठीं हांक मारली. त्याच वेळीं एक भिकारीण त्या खंदकाच्या बाजूनें गांवाकडे चालली होती. तिनें ती हाक ऐकली, खंदकात डोकावून पाहिलें. तिला एक भिकारी आंतून मदतीसाठीं हाका मारीत असलेला दिसला. तिच्या मनांत चटकन् कांहींतरी कल्पना आली. तिनें भिकाऱ्यास वर काढण्याचें आश्वासन दिलें. मात्र तिची एक अट होती. यापुढें त्या भिकाऱ्यानें तिच्या घरीं राहिलें पाहिजे !

खंदकांतील भिकाऱ्याला ही अट मुळींच कठीण वाटली नाहीं. त्यानें चटकन् होकार दिला. भिकारणीनें गवताचा एक दोर वळला व त्याचें एक टोंक खडकाला बांधून दुसरें टोंक त्या खंदकांत सोडलें. दोराच्या आधारानें तो भिकारी वर आला व भिकारणीबरोबर तिच्या घराकडे चालूं लागला.

दसरा जवळ आला होता. त्या दिवशीं त्या शहरांत जलदेवतेचा एक मोठा उत्सव करण्याची पूर्वापार प्रथा होती. त्या राज्यांतील जहाजें व्यापारी माल घेऊन परदेशीं दसऱ्याच्या मुहूर्तावर विक्रीसाठीं निघत. राजेसाहेबांचें खास जहाज मौल्यवान् व दुर्मिळ माल घेऊन पहिल्याप्रथम हांकरलें जाई. परंतु किनाऱ्यावरील जलदेवतेच्या मंदिरांतील मूर्तीला नरबली देऊन त्या बळीच्या रक्ताचें सिंचन मूर्तीवर केल्याशिवाय एकहि जहाज जागचें हलूं शकत नसे ! कोणीं कितीहि प्रयत्न केला तरी नरबली घेतल्यावांचून जहाज मुळींच हलावयाचें नाहीं. गांवांतील एखादा माणूस नरबलीसाठीं आणण्यांत येई व त्याचा मोबदला म्हणून त्या माणसाच्या नातलगास सुपलीभर सोनें देण्यांत येई. त्या भिकारणीनें त्या राजपुत्रास खंदकांतून वर काढलें तेव्हां तिच्या मनांत हीच कल्पना आली होती. त्या मुलाला नरबलीसाठीं राजदूतांच्या हवालीं केलें कीं आपल्याला सुपलीभर सोनें मिळून आपली जन्माची ददात मिटेल या विचारानेंच त्या मुलाला घरीं आणून तिनें ठेवलें होतें.

ठरल्या दिवशीं गांवांत नरबलीसाठीं दवंडी देण्यांत आली. भिकारणीनें आपल्याकडील तरुण पोराला राजदूतांच्या हवालीं केलें व तिला सुपलीभर सोनें मिळालें. त्या भिकारी राजपुत्राला बलिदानाचा दिवस उगवेपर्यंत बंदीखान्यांत ठेवण्यांत आलें.

अखेर एकदांचा तो दसऱ्याचा दिवस उजडला. सकाळींच मुलाला स्नान घालून शुचिर्भूत करण्यांत आलें. बळी देण्यापूर्वी त्याला त्याची अखेरची इच्छा काय आहे, तें विचारण्यांत आलें. राजपुत्रानें सांगितलें कीं नरबली दिल्याशिवाय जहाज चालू करण्याचा प्रयत्न करण्याची परवानगी मिळावी व आपल्या प्रयत्नानें जहाज जर चालू लागलें तर आपणांस जीवदान द्यावें. सर्वांना वाटलें कीं, जगण्याच्या आशेनें चाललेली या पोराची ही अखेरची धडपड आहे. परंतु राजाच्या अनुज्ञेनें मुलाची विनंती मान्य करण्यांत आली.

तो जलदेवतेच्या मंदिरांत गेला. त्यानें मनोभावें तिची पूजा केली. क्षणभर डोळे मिटून तो ध्यानस्थ बसला व दुसऱ्याच क्षणीं जवळच असलेल्या एका शस्त्रानें आपली करांगुली कापून रक्ताचे दोन थेंब त्यानें जलदेवतेच्या मस्तकावर टाकले आणि काय आश्चर्य, नररक्ताचें असें सिंचन होतांच जहाज चालू झालें. या पोराला जर कायमचेंच जहाजावर ठेवलें तर प्रतिवर्षीं नरबली शोधण्याची जरुरी पडणार नाहीं, या कल्पनेनें जहाजावरील एका बंदिस्त असालींत त्या पोराला ठेवण्याबद्दल राजाज्ञा झाली. बंदीवासापलिकडे त्याचे कोणतेहि हाल करूं नयेत, खाणेंपिणें त्याला हवें तसें व भरपूर द्यावें आणि इतर सुखसोयीहि गरजेप्रमाणें त्याला द्याव्या असाहि हुकूम राजानें दिला.

राजपुत्राच्या जलपर्यटनाला आतां सुरुवात झाली. आतां तो पुष्कळच सुखात होता. खाण्यापिण्याची चिंताहि दूर झाली होती. सर्पमणी जवळ होताच ! त्या मण्याच्या शक्तीमुळें आणखी दीड-दोन महिन्यांत त्याची दुर्दशा संपून राजपद मिळणार होतें. बंदिस्त कोठडींत चैन पडेनासें झालें कीं, तो आपली आत्मकथा लिहित बसावयाचा. त्यासाठीं जहाजाच्या अधिकाऱ्यांकडून त्यानें लिहिण्याचें सामानहि मिळविलें होतें. स्वतःची राजधानी सोडल्यापासून आजपर्यंतचे सर्व महत्त्वाचे प्रसंग त्यानें हळूहळू लिहून काढले. त्याच्या मामांनीं त्या दोघा भावांना जंगलांत कसे सोडलें, भुजंग व पिंगळ्याची गोष्ट, सर्पदंश, त्यानंतर भावाच्या राज्यांत प्रवेश, लावेची शिकार, खंदकांतील अपघात, भिकारणीनें दिलेलें जीवदान व शेवटीं दसऱ्याच्या दिवसाचा तो प्रसंग, ही सारी हकीगत त्यानें संगतवार लिहून काढली.

# ४ : आनंदी आनंद

अनेक बंदरांतून मालाची देवघेव करीत तें जहाज अखेर एका दूरच्या दुसऱ्या राज्यांत, राजधानीच्या शहरीं येऊन पोंचलें. कितीतरी व्यापारी जहाजें बंदरांत नांगरून पडलीं होतीं, पण व्यापारी व्यवहार मात्र बंद होते. चौकशी करतां समजलें कीं तेथील वृद्ध राजानें आपल्या एकुलत्या एका मुलीचें स्वयंवर थाटलें असून त्या स्वयंवरानंतर राजाच्या नवीन जावयास राज्याभिषेक करण्यांत येईल व मगच परदेशांहून आलेल्या जहाजांवर तेथील माल चढवला जाईल. जहाज त्या बंदरांत पोंचलें, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं स्वयंवराचा समारंभ होता. तेथील राजकन्या अत्यंत रूपवती असून तिनें एक पण लावला होता. राजकन्येच्या महालांतील सोन्याच्या समईंतील सात वाती जो कोणी एकदम उजळील त्याच्या गळ्यांत ती माळ घालणार होती !

राजधानींतील व आजूबाजूच्या सर्व तरुणांना राजवाड्यांत भोजनासाठीं बोलावलें होतें. राजधानींतील पस्तीस वर्षांखालचा एकहि तरुण राजवाड्यांत आल्यावांचून रहातां कामा नये, अशी ताकीद देण्यांत आली होती. जेवायला आलेल्या प्रत्येक तरुणानें जेवणानंतर विडा घ्यावयासाठीं राजकन्येच्या महालांत जावयाचें व तेथें ठेवलेल्या समईच्या सातहि वाती एकदम पेटविण्याचा प्रयत्न करावयाचा, अशी योजना आंखण्यांत आली होती. त्या शहरांत जमा झालेले व तेथील रहिवाशी असलेले सारे तरुण जेवले, राजकन्येच्या महालांत गेले, प्रत्येकानें विडा घेतला व समई पेटवण्याचा अयशस्वी प्रयत्न करून प्रत्येकजण परत गेला. कोणीहि समई पेटवूं शकला नाहीं !

राजाला चिंता पडली, आपली मुलगी जर अविवाहित राहिली तर कसें होणार ? राज्याला वारस कोण ? अगदीं अखेरचा प्रयत्न म्हणून त्यानें नगरांत सर्वत्र राजदूतांना पाठवून कोणी तरुण राजवाड्यांत न येतां कोणत्याहि कारणानें घरींच राहिले असतील तर त्यांना घेऊन येण्यास सांगितलें. बंदरावरील गलबतांत असलेला एक तरुण कैदी जेवण्यास येऊं शकला नाहीं, अशी बातमी राजदूतांनीं आणली. राजेसाहेबांच्या खास आज्ञेवरून व पुन्हां नीट बंदोबस्तांत त्या तरुणाला जहाजावर पोंचवण्यांत येईल असें आश्वासन जहाजाच्या अधिकाऱ्यांना देऊन, त्या तरुणास राजवाड्यांत

ठरल्या दिवशीं गांवांत नरबलीसाठीं दवंडी देण्यांत आली. भिकारणीनें आपल्याकडील तरुण पोराला राजदूतांच्या हवालीं केलें व तिला सुपलीभर सोनें मिळालें. त्या भिकारी राजपुत्राला बलिदानाचा दिवस उगवेपर्यंत बंदीखान्यांत ठेवण्यांत आलें.

अखेर एकदांचा तो दसऱ्याचा दिवस उजडला. सकाळींच मुलाला स्नान घालून शुचिर्भूत करण्यांत आलें. बळी देण्यापूर्वी त्याला त्याची अखेरची इच्छा काय आहे, तें विचारण्यांत आलें. राजपुत्रानें सांगितलें कीं नरबली दिल्याशिवाय जहाज चालूं करण्याचा प्रयत्न करण्याची परवानगी मिळावी व आपल्या प्रयत्नानें जहाज जर चालूं लागलें तर आपणांस जीवदान द्यावें. सर्वांना वाटलें कीं, जगण्याच्या आशेनें चाललेली या पोराची ही अखेरची धडपड आहे. परंतु राजाच्या अनुज्ञेनें मुलाची विनंती मान्य करण्यांत आली.

तो जलदेवतेच्या मंदिरांत गेला. त्यानें मनोभावें तिची पूजा केली. क्षणभर डोळे मिटून तो ध्यानस्थ बसला व दुसऱ्याच क्षणीं जवळच असलेल्या एका शस्त्रानें आपली करांगुली कापून रक्ताचे दोन थेंब त्यानें जलदेवतेच्या मस्तकावर टाकले आणि काय आश्चर्य, नररक्ताचें असें सिंचन होतांच जहाज चालू झालें. या पोराला जर कायमचेंच जहाजावर ठेवलें तर प्रतिवर्षीं नरबली शोधण्याची जरुरी पडणार नाहीं, या कल्पनेनें जहाजावरील एका बंदिस्त खोलींत त्या पोराला ठेवण्याबद्दल राजाज्ञा झाली. बंदीवासापलिकडे त्याचे कोणतेहि हाल करूं नयेत, खाणेंपिणें त्याला हवें तसें व भरपूर द्यावें आणि इतर सुखसोयीहि गरजेप्रमाणें त्याला द्याव्या असाहि हुकूम राजानें दिला.

राजपुत्राच्या जलपर्यटनाला आतां सुरुवात झाली. आतां तो पुष्कळच सुखात होता. खाण्यापिण्याची चिंताहि दूर झाली होती. सर्पमणी जवळ होताच ! त्या मण्याच्या शक्तीमुळें आणखी दीड-दोन महिन्यांत त्याची दुर्दशा संपून राजपद मिळणार होतें. बंदिस्त कोठडींत चैन पडेनासें झालें कीं, तो आपली आत्मकथा लिहित बसावयाचा. त्यासाठीं जहाजाच्या अधिकाऱ्यांकडून त्यानें लिहिण्याचें सामानहि मिळविलें होतें. स्वतःची राजधानी सोडल्यापासून आजपर्यंतचे सर्व महत्त्वाचे प्रसंग त्यानें हळूहळूं लिहून काढले. त्याच्या मामांनीं त्या दोघा भावांना जंगलांत कसे सोडलें, भुजंग व पिंगळ्याची गोष्ट, सर्पदंश, त्यानंतर भावाच्या राज्यांत प्रवेश, लावेची शिकार, खंदकांतील अपघात, भिकारणीनें दिलेलें जीवदान व शेवटीं दसऱ्याच्या दिवसाचा तो प्रसंग, ही सारी हकीगत त्यानें संगतवार लिहून काढली.

# ४ : आनंदी आनंद

अनेक बंदरांतून मालाची देवघेव करीत तें जहाज अखेर एका दूरच्या दुसऱ्या राज्यांत, राजधानीच्या शहरीं येऊन पोंचलें. कितीतरी व्यापारी जहाजें बंदरांत नांगरून पडलीं होतीं, पण व्यापारी व्यवहार मात्र बंद होते. चौकशी करतां समजलें कीं तेथील वृद्ध राजानें आपल्या एकुलत्या एका मुलीचें स्वयंवर थाटलें असून त्या स्वयंवरानंतर राजाच्या नवीन जावयास राज्याभिषेक करण्यांत येईल व मगच परदेशांहून आलेल्या जहाजांवर तेथील माल चढवला जाईल. जहाज त्या बंदरांत पोंचलें, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं स्वयंवराचा समारंभ होता. तेथील राकजन्या अत्यंत रूपवती असून तिनें एक पण लावला होता. राजकन्येच्या महालांतील सोन्याच्या समईंतील सात वाती जो कोणी एकदम उजळील त्याच्या गळ्यांत ती माळ घालणार होती !

राजधानींतील व आजूबाजूच्या सर्व तरुणांना राजवाड्यांत भोजनासाठीं बोलावलें होतें. राजधानींतील पस्तीस वर्षांखालचा एकहि तरुण राजवाड्यांत आल्यावांचून रहातां कामा नये, अशी ताकीद देण्यांत आली होती. जेवायला आलेल्या प्रत्येक तरुणानें जेवणानंतर विडा घ्यावयासाठीं राजकन्येच्या महालांत जावयाचें व तेथें ठेवलेल्या समईच्या सातहि वाती एकदम पेटविण्याचा प्रयत्न करावयाचा, अशी योजना आंखण्यांत आली होती. त्या शहरांत जमा झालेले व तेथील रहिवाशी असलेले सारे तरुण जेवले, राजकन्येच्या महालांत गेले, प्रत्येकानें विडा घेतला व समई पेटवण्याचा अयशस्वी प्रयत्न करून प्रत्येकजण परत गेला. कोणीहि समई पेटवूं शकला नाहीं !

राजाला चिंता पडली, आपली मुलगी जर अविवाहित राहिली तर कसें होणार ? राज्याला वारस कोण ? अगदीं अखेरचा प्रयत्न म्हणून त्यानें नगरांत सर्वत्र राजदूतांना पाठवून कोणी तरुण राजवाड्यांत न येतां कोणत्याहि कारणानें घरींच राहिले असतील तर त्यांना घेऊन येण्यास सांगितलें. बंदरावरील गलबतांत असलेला एक तरुण कैदी जेवण्यास येऊं शकला नाहीं, अशी बातमी राजदूतांनीं आणली. राजेसाहेबांच्या खास आज्ञेवरून व पुन्हां नीट बंदोबस्तांत त्या तरुणाला जहाजावर पोंचवण्यांत येईल असें आश्वासन जहाजाच्या अधिकाऱ्यांना देऊन, त्या तरुणास राजवाड्यांत

आणण्यांत आलें. हा तरुण म्हणजे आपला भिकारी राजपुत्र, हें सांगावयास नकोच !

सर्वांप्रमाणें या कैद्यापुढेंहि पंचपक्वान्नांचें ताट आलें. भोजन झालें. राजकन्येच्या हातून त्यानें विडाहि घेतला. सोन्याच्या समईंतील सात वातींकडे त्यानें क्षणभर पाहिलें व चटकन् आपल्या फाटक्या अंगरख्यांत खोल गुंडाळून ठेवलेला सर्पमणी त्यानें बाहेर काढला. मण्याच्या प्रकाशानें सर्व खोली प्रकाशित झाली व दुसऱ्याच क्षणीं समईच्या सातहि वाती एकदम प्रज्वलित झाल्या ! राजकन्येचा पण पुरा झाला. तिचें त्या बंदिवान भिकाऱ्याशीं थाटामाटानें लग्न झालें ! !

लग्नानंतर लौकरच राजपुत्रानें आपला सर्व इतिहास आपल्या नवविवाहित पत्नीस सांगितला. आपल्या वडलांच्या कानांवरहि तिनें सर्व हकीकत घातली. राजपुत्रानें सांगितलेली हकीकत आश्चर्यजनक होती, तरीहि राजा व राजकन्या या दोघांचाहि विश्वास तिच्यावर लगेच बसला. आपलें लग्न एका चांगल्या घराण्यांतील राजपुत्राशीं झालें आहे, याचा तिला अभिमान वाटला. अजूनहि कांहीं काळ आपला इतिहास गुप्त ठेवावा, असें राजपुत्रानें सांगितल्यावरून या सर्व हकीकतीची कोणीहि, कुठेंहि वाच्यता केली नाहीं.

इकडे गलबतावरील सर्व व्यापारी, आपापला माल विकून आपल्या देशांत जावयास निघाले. राजपुत्रानेंहि आपण आपल्या भावाच्या गांवीं राजकन्येसह जाऊन थोड्याच दिवसांत परत येऊं असें राजास सांगून प्रवासाची तयारी केली. आतां या वनवासांतून मोकळें होऊन भावाला व शक्य तर आई-वडलांनाहि भेटण्याची त्याला तीव्र इच्छा होती. प्रवासास सुरुवात करण्यापूर्वी एक शंका मात्र त्याच्या मनास चाटून गेली. एका भिकाऱ्याला मिळालेलें हें वैभव पाहून व्यापाऱ्यांच्या मनांत हेवा व मत्सर निर्माण होऊन ते सर्व कदाचित् जहाजावरच दगाफटका करतील हीच ती शंका. कांहीं झालें तरी राजकन्येला मात्र ते त्रास देणार नाहींत अशी त्याची खात्री होती !

आपला हा राजपुत्र आतां कैदी म्हणून गलबतावर नव्हता. कसेंहि झालें तरी तो राजकन्येचा पति होता ! त्यानें गलबतावर एक स्वतंत्र खोली मागून घेतली. गलबत हांकरलें जाण्यापूर्वी या खोलींत आपल्या आकाराचा एक लाकडी पुतळा त्यानें सर्वांच्या नकळत नेऊन ठेवून दिला व राजकन्येच्या सामानसुमानाच्या निमित्तानें एक मोठा पेटाराहि बरोबर घेतला. सबंध दिवस

गलबतावर हिंडण्यांत, कांहींतरी लिहिण्यांत किंवा राजकन्येबरोबर सुख-दुःखाच्या गोष्टी करण्यांत त्याचा वेळ जाई. रात्रीं मात्र तो स्वतःच्या बिछान्या-वर तो लांकडी पुतळा झोंपवून स्वतः पेटाऱ्यांत जाऊन बसावयाचा. त्याच्या कल्पनेप्रमाणें एक दिवस जहाजावरील दोन इसमांनीं रात्रीं त्याच्या खोलींत हलकेंच प्रवेश करून व बिछान्यावरील पुतळा म्हणजे तो भिकारी तरुणच आहे असें समजून त्यास अलगद उचललें व समुद्रांत फेंकून दिलें !

उजाडण्यापूर्वीच गलबताच्या प्रमुखानें, त्या तरुणानें आत्महत्त्या केल्याचें राजकन्येस सांगितलें. समुद्रांतून त्याला वर काढण्याचा खलाशांनीं प्रयत्न केला, पण रात्रीच्या अंधारांत त्यांना यश आलें नाहीं, असें सांगून त्यानें रडण्याचेंहि नाटक केलें ! राजकन्येला खरा प्रकार माहीत होता, पण तिनेंहि शोक करण्याचें चांगलेंच नाटक केलें. राजकन्येच्या केसालाहि धक्का लागणार नाहीं व तिला बंदरावर पोंचतांच सरळ राजवाड्यांत नेऊन राजाच्या हवालीं करण्यांत येईल असें आश्वासन गलबताच्या अधिकाऱ्यानें राजकन्येस दिलें.

दोनच दिवसांनीं गलबत राजधानीच्या किनाऱ्याला लागलें. या दोन दिवसांत राजपुत्र व राजकन्या यांनीं पुढें काय करावयाचें याबद्दल सर्व विचार ठरवून ठेवले होते. राजकन्येवर कांहीं संकट आलें तर राजपुत्रानें लगेच प्रकट व्हावयाचें व राजपुत्रावर संकट आलें तर राजकन्येनें सर्व इतिहास उघड करावयाचा असें दोघांनीं ठरविलें होतें. सर्पमण्याच्या प्रभावाप्रमाणें आणखी पंधरा दिवस हाल भोगावयाचे हें ठरलेलेंच होतें.

राजधानींत पोंचतांच त्या व्यापाऱ्यांनीं राजकन्येला सरळ दरबारांत हजर केलें. सामानसुमान व पेटारा बरोबर होताच. राजकन्येच्या विवाहापासून तो त्या भिकाऱ्याच्या आत्महत्त्येपर्यंत सर्व हकीकत व्यापाऱ्यांनीं दरबारांत निवेदन केली. त्यांना वाटलें कीं, राजा पत्नी म्हणून राजकन्येचा स्वीकार करील व आपणांस चांगली बक्षिसी मिळेल. तथापि राजानें राजकन्येकडे पाहिलें आणि एका तरुण मुलीवर वैधव्याचा प्रसंग आला असतां तिची अभिलाषा करणें हें पाप आहे असा विचार चटकन् त्याच्या मनांत आला. राजानें आपल्या प्रधानाला हुकूम दिला कीं राजकन्येला राणीवशांत स्वतंत्र दालन रहावयास द्या. सेवेला दासी द्या व तिच्या वडलांच्या राज्यांत दूत पाठवून त्या राजेसाहेबांना येथें बोलावून घ्या.

राणीवशांत राजकन्येची चांगलीच बडदास्त ठेवण्यांत आली. त्या भागांत कोणाहि पुरुषास प्रवेश नसल्यामुळें पेटाऱ्यांतील राजपुत्राला फार जपून

वागावें लागे. राजकन्या आपल्या दालनाचीं सर्व दारें-खिडक्या बंद ठेवीत असे. तरीहि राजपुत्राच्या पुरुषी आवाजाचा एखादा शब्द बाहेर कुणाला ऐकूं जाणार नांहीं याची दक्षता घ्यावीच लागे.

एक आठवड्यांतच या राजाचे दूत त्या राजकन्येच्या वडलांच्या राज्यांत पोंचले. त्यांनीं एकंदर घटना राजास निवेदन केली व आपल्या राजाचें खास पत्र व नजराणा दरबारांत हजर केला. राजकन्येच्या दुर्दैवाची ती कहाणी ऐकून राजास दुःख झालें. पण त्याबरोबरच शेजारच्या राज्यांतील तरुण राजाचें न्यायी व उदार वर्तन पाहून त्यास आनंदहि झाला. त्या राजाच्या आमंत्रणाप्रमाणें या राजानें चटकन् निघण्याची तयारी केली. मुलीला स्वतः जाऊन घेऊन येण्याचा त्याचा हेतु होता. परंतु मुलीनें संमति दिली तर त्याच राजाशीं तिचा विवाह करून द्यावा असाहि एक हेतु राजाच्या मनांत होता.

राजधानीमध्यें राजेसाहेबांचें मोठ्या थाटांत स्वागत झालें. सबंध शहर शृंगारण्यांत आलें होतें. राजाच्या स्वागतासाठीं खास दरबाराची योजना करण्यांत आली होती. पिता-पुत्रीची भेट दरबारांतच करून देण्याचें ठरवलें होतें. पाहुण्यांना यथोचित आसनांवर बसविण्यांत आलें व राजकन्येला आणण्यासाठीं खास दासी राणीवशांत रवाना झाल्या.

दासी लगबगीनें राणीवशांतील राजकन्येच्या दालनापाशीं आल्या आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला ! राजकन्या बंद खोलींत कुणातरी पुरुषाबरोबर बोलत असल्याचा स्पष्ट आवाज बाहेर येत होता. राणीवशांत परक्या पुरुषाचा प्रवेश आज प्रथमच झाला होता. दासी तांतडीनें दरबारांत आल्या व प्रधानाच्या मार्फत ही घटना त्यांनीं राजाच्या कानांवर घातली. राजाचा क्रोध अनावर झाला. एका क्षणांत दरबार बरखास्त करण्यांत आला. राजकन्येला ताबडतोब तुरुंगांत डांबण्याचा हुकूम झाला व राजा स्वतः हातांत नंगी तलवार घेऊन, राणीवशांत शिरलेल्या पुरुषाचा शिरच्छेद करण्यासाठीं निघाला.

राजा तिथें पोंचण्यापूर्वींच राजकन्येला कैद करण्यांत आलें होतें. आपणांस तुरुंगांत डांबण्यापूर्वीं आपली व राजेसाहेबांची भेट व्हावी एवढी एकच इच्छा राजकन्येनें बोलून दाखवली होती. एवढ्यांत क्रोधानें थरथरणारे राजेसाहेब समोर पाहून राजकन्येनें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें व आपल्या ओचांतून कागदांचें एक भेंडोळें काढून राजेसाहेबांच्या हातीं दिलें. तशा रागाच्या अवस्थेंतहि राजानें भेंडोळ्यांतील पहिला कागद वाचला आणि त्याच्या तोंडून

नकळत उद्गार बाहेर पडले, " अरे, ही तर माझ्याच जन्माची हकीकत !"

राजा एकामागें एक पानें वाचीत होता. डोळ्यांतील क्रोध हळू हळू नाहींसा होऊन आतां त्यामधून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या ! अश्रूंच्या मागोमाग हळू हळू हुंदके बाहेर पडूं लागले. हा काय प्रकार आहे, हेंच कुणाला कळेना. राजाचे हुंदके ऐकून राजकन्याहि ओक्साबोक्शी रडूं लागली. खुद्द राणी व राणीवशांतील इतर स्त्रिया एव्हांना भोंवतीं जमा झाल्या. राजेसाहेब हुंदके देत होते व एकामागें एक पानें वाचीत होते.

शेवटचें पान वाचून झालें आणि राजानें बेभान होऊन राजकन्येला ' वहिनी ' म्हणून मिठी मारली !

" कुठें आहे माझा भाऊ ? " अशी आरोळी मारून राजा बेशुद्ध होऊन धरणीवर कोसळला.

भयचकित झालेल्या सेवकांनीं राजकन्येला मोकळें केलें. तेवढ्यांत पेटाऱ्याचें झांकण उघडलें व तो भिकाऱ्याचा पोर पेटाऱ्यांतून बाहेर पडला ! राजाची व त्याची डोळेभेट होतांच राजानें ' भाऊ ' म्हणून त्याला प्रेमानें मिठी मारली. दोघांच्याहि डोळ्यांतून घळघळा अश्रू गळत होते. ते दुःखाचे होते कीं आनंदाचे, हें कुणालाच समजत नव्हतें. भोंवतालचीं माणसें आश्चर्यानें दिङ्मूढ होऊन गेलीं होतीं.

ताबडतोब पुन्हां दरबार भरवण्याचा हुकूम राजानें दिला. भिकाऱ्याच्या पोराला भरजरी वस्त्रें देऊन दरबारांत आणलें आणि मानाच्या जागीं बसवलें. कांहीं क्षणांपूर्वींच बंदिवान झालेल्या राजकन्येलाहि चिकाच्या पडद्याआड मानाची जागा दिली होती. काय प्रकार आहे याची कुणास कल्पना नसल्यामुळें टांचणी पडली तरी आवाज होईल एवढी शांतता दरबारांत होती. राजेसाहेब दरबारांत येतांच सर्वांनीं उत्थापन दिलें. नंतर राजेसाहेबांनीं स्वतः आपल्या जन्मापासून तों आजच्या प्रसंगापर्यंत सर्व हकीकत दरबारांत निवेदन केली. क्षणाक्षणाला राजाचा कंठ दाटून येत होता व त्याचीच प्रतिक्रिया दरबारी लोकांच्यावरहि होत होती. सर्वांच्याच डोळ्यांतून अश्रू येत होते.

त्यानंतर आठ दिवस त्या राज्यांत दिवाळी साजरी करण्यांत आली ! राजवाड्यांत तर भोजनाच्या पंक्तीवर पंक्ति उठत होत्या. शहरांतील गरीबांतील गरीब माणसालाहि आठ दिवस पंचपक्वान्नांचें भोजन मिळालें. दगाबाज

व्यापारी व राजपुत्राला खंदकांत लोटणारे मजूर यांनीं गुन्हा कबूल करून माफी मागितली. त्यांना माफी देण्यांत आली. आनंदाचा हा सोहळा आटोपल्या-वर दोघेहि भाऊ आपल्या राण्यांसह आपल्या मातापित्यांच्या भेटीसाठीं निघाले.

इकडे राजपुत्रांना जंगलांत नेऊन त्यांचा वध केल्यापासून राजेसाहेब नेहमींच दुःखी असत. राज्यकारभारांतहि त्यांचें मन लागत नसे. मोठ्या राणीलाहि आपले मुलगे रानांतील श्वापदांनीं केव्हांच मारून टाकले असतील असें वाटे. धाकट्या राणीलाहि आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला होता आणि आतां त्या दोघी राण्या एकत्र रहात होत्या.

राजपुत्र आपल्या लवाजम्यानिशीं नगराबाहेर उतरले व शेजारच्या दोन राज्यांचे राजे भेटीस येत असल्याचा निरोप राजास पाठविला. राजानें दरबार भरवून दोन्ही राजांना भेटीस बोलावलें. दरबारीं रीतिरिवाज बाजूस ठेवून दोन्ही मुलांनीं राजाच्या पायावर डोकें ठेवलें व आपली सर्व हकीकत सांगितली. चिकाच्या पडद्याआडून मोठी राणी सारें ऐकतच होती. बेभान होऊन ती दरबारांत धांवत आली व तिनें आपल्या मुलांना प्रेमानें आलिंगन दिलें. धाकटी राणीहि मुलांना कडकडून भेटली.

कांहीं दिवस आनंदांत एकत्र घालविल्यावर राजानें एक दिवस दरबार भरविला व ज्या देवीच्या कृपेनें हे आनंदाचे दिवस पहावयास मिळाले त्या देवीच्या सेवेंत आपण आपलें यापुढील आयुष्य खर्च करणार असल्याचें दरबारांत सांगितलें. आपलें राज्य आपल्या प्रधानाच्या म्हणजे मोठ्या राणीच्या भावाच्या स्वाधीन केलें. जंगलांतील देवीच्या जुन्या देवळाचा जीर्णोद्धार करून तेथें नवीन देऊळ बांधलें. राजा व दोन्ही राण्या तेथेंच देवीच्या उपासनेंत व सेवेंत काळ कढूं लागले.

दोन्ही राजपुत्र आपापल्या नव्या राज्यांत गेले व त्यांनीं पुष्कळ वर्षें न्यायानें राज्य करून प्रजेला सुख दिलें.

ज्या दोन आंब्यांच्या प्रसादांतून एवढें सर्व झालें त्या दोन आंब्यांचें चित्र आजहि त्या दोन्ही राजपुत्रांच्या निशाणावर रंगवलेलें सर्वांना दिसेल.



अनुक्रम ३७३२
बालवाङ्मय
३९५८

# वसंत राजाची गोष्ट

## १ : कळीच्या घोड्यावर स्वार

फार फार जुनी गोष्ट आहे ही. त्या वेळीं या देशांत दूर दूर अंतरावर छोटीं छोटीं राज्यें होतीं. राज्याभोंवतालचा सर्व भाग घनदाट अरण्यांनीं भरलेला होता. या अरण्यांत अत्यंत क्रूर व बलाढ्य अशा राक्षसांची वस्ती होती. राज्यांतील नागरिकांना या राक्षसांचा फारच उपद्रव होई. कित्येक वेळीं राज्यांतील कर्तीं माणसें या राक्षसांच्या भक्ष्यस्थानीं पडत.

अशाच एका राज्यांत हेमंत राजा राज्य करीत होता. राजा मोठा न्यायी व पराक्रमी होता. राजाचे व प्रजेचे दिवस सुखांत चालले होते. गोष्टींतील राजाप्रमाणें या राजाला एक आवडती व एक नावडती अशा दोन राण्याहि नव्हत्या. मूलबाळ असल्यानें हा राजा तसा दुःखीहि नव्हता. हेमंत राजाला एकच राणी होती. तिच्यावर त्याचें खूप प्रेम होतें. या राणीला एक मुलगा व तीन मुली अशीं चार अपत्यें होतीं.

सर्वच मुलें वयांत आलीं होतीं. मुलगा वसंत धिप्पाड बांध्याचा व देखणा होता. तिन्ही मुली रूपानें एकीपेक्षां एक सुंदर होत्या. त्यांच्या सौंदर्यामुळें त्यांच्या विवाहाचीहि तशी काळजी वाटत नव्हती. कोणत्याहि राजपुत्रानें कधींच नकार दिला नसता असें त्यांचें लावण्य होतें.

राजपुत्र वसंत याच्या लग्नाचें वय झालेलें आणि तिघी बहिणी उपवर झालेल्या. हेमंत राजानें व त्याच्या राणीनें विचार केला कीं अगोदर वसंताचें लग्न करून सून घरीं आणूं आणि नंतरच मुलींची पाठवणी करूं.

सात समुद्रापलीकडील एका राजकन्येशीं वसंत युवराजाचा थाटानें विवाह झाला. लग्न समारंभाचे सगळे सोहळे पूर्ण करून हेमंत राजा आपलें वऱ्हाड व सून वासंती यांना घेऊन राजधानींत परत आला. त्यानंतर राजधानींतहि प्रजाजनांसाठीं मोठा समारंभ साजरा करण्यांत आला. राजवाड्यासमोरील उपवनांत रोषणाई करण्यांत आली होती. सर्व पौरजनांना मेजवानीचें पाचारण होतें. पंक्तीवर पंक्ति उठत होत्या. राजपुत्र वसंत व त्याची पत्नी लोकांना दर्शन देत पंक्तींमधून फिरत होते. एवढ्यांत एकाएकी वावटळ सुरू झाली व धुरासारखा दिसणारा एक प्रचंड ढग आकाशांतून खालीं आला. उपवनांतील एका पुष्पवाटिकेजवळ तो ढग उतरल्यासारखें दिसलें व एका क्षणांत तो नाहींसा झाला ! मघाची वावटळहि क्षणांत शांत झाली.

त्या धुरामध्यें राजकन्या गुदमरून गेल्या कीं काय, हें पहावयास पौरजन पुढें जातात तों राजकन्या जागेवर नाहींत ! सर्वत्र एकच गोंधळ उडाला. जिकडे तिकडे शोधाशोध सुरू झाली. आनंदी वातावरण क्षणांत नाहींसें झालें. सर्व राजधानीवर दुःखाची दाट छाया पसरली. कितीतरी दिवस राजकन्यांच्या शोधार्थ राजदूत हिंडत होते. सर्वांची खात्री झाली कीं कुणातरी राक्षसानेंच राजकन्यांचें हरण केलें.

नव्या सुनेच्या पायगुणामुळेंच राजकन्या नाहींशा झाल्या, अशी कुजबूज गांवांत सुरू झाली. सर्वांच्या तोंडीं हाच विषय. वसंत राजपुत्राच्या व राजस्नुषा वासंतीच्या कानांवरहि हें येत होतें. पण त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें होतें. एक दिवस हेमंत राजा व त्याची राणी आपल्या सुनेला खूप टाकून बोलले. ' पांढऱ्या पायाची सून !' म्हणून त्यांनीं तिची हेटाळणी केली. तिच्या कानीं फक्त लोकांचीच कुजबूज येत होती, पण आतां जेव्हां प्रत्यक्ष सासू–सासरेच असें बोलूं लागले तेव्हां तिला खूपच वाईट वाटलें. जन्मभर हा ठपका सहन करण्यापेक्षां मरण बरें असेंहि तिला वाटूं लागलें. तशीच ती कांहींशा रागानें व दुःखानें आपल्या महालांत गेली. राजपुत्र वसंताला तिनें सर्व हकीकत सांगितली व स्वतः वसंतानेंच बहिणींच्या शोधास जावें असें तिनें सुचविलें.

राजपुत्र प्रथम टाळाटाळच करीत होता. शेवटीं जेव्हां वासंतीनें आपण गेला नाहीं तर मी अन्नपाणी वर्ज्य करीन, असें निर्वाणीचें सांगितलें तेव्हां वसंत शोधास जाण्यास तयार झाला. वासंतीला तिच्या लग्नांत वडलांकडून अहेर म्हणून एक कळीचा घोडा मिळाला होता. हा घोडा शेंकडों योजनांच्या गतीनें आकाशांत संचार करूं शके व हवें तेव्हां समुद्र, डोंगर, नदी अथवा झाडावरहि त्याला उतरतां येई. घोडा चालूं करण्यासाठीं कोणती कळ फिरवावयाची हें वासंतीनें वसंत राजपुत्रास सांगितलें. उतरण्यासाठीं कोणती कळ फिरवावयाची हें समजावून घेण्यापूर्वींच राजपुत्र घोड्यावर स्वार झाला व घोडा सुरू करण्याची कळ फिरवून एका निमिषांत आकाशमार्गें दिसेनासा झाला. राजपुत्र स्वतःच राजकन्यांच्या शोधार्थ निघाल्याची वार्ता हां हां म्हणतां राजवाड्यांत पसरली. राजाराणीला थोडें वाईट वाटलें, पण थोडें समाधानहि वाटलें.

राजपुत्राचा घोडा आकाशमार्गानें वाऱ्याच्या वेगानें उड्डाण करीत निघाला. कितीतरी समुद्र, डोंगर, पर्वत, नद्यामागें पडल्या तरी घोडा चालतच होता.

राजपुत्राच्या मग लक्षांत आलें कीं घोडा खालीं कसा उतरावयाचा हें आपण समजावून घेतलेंच नाहीं ! त्यानें खूप प्रयत्न केला–तों तों घोड्याला अधिकच गति येऊं लागली. अखेरीस नशिबावर हवाला ठेवण्याखेरीज मार्गच उरला नाहीं. आणखी कांहीं अंतर गेल्यावर एका पर्वताच्या शिखराची धडक घोड्याला बसली व घोडा आणि राजपुत्र दोघेंहि खालीं कोसळले ! राजपुत्राला फारशी इजा झाली नाहीं, परंतु धक्क्यानें व अतिश्रमानें तो बेशुद्ध होऊन पडला.

## २ : बहिणींचा तपास लागला

राजपुत्र ज्या डोंगरावर बेशुद्ध होऊन पडला, त्याच डोंगराच्या एका गुहेंत एक दरोडेखोरांची टोळी रहात होती. वेगवेगळ्या राज्यांत दरोडे घालावयाचे व एका राज्यांतील लुटलेला माल दुसऱ्या राज्यांत विकावयाचा, हा त्या टोळीचा धंदा होता. सुंदर स्त्रिया पळवून त्यांची विक्रीहि हे डाकू करीत ! त्या काळांत तर हा त्यांचा सर्वांत किफायतशीर धंदा होता. राजपुत्रांच्या घोड्याची धडक डोंगरावर बसून मोठा आवाज झाला होता. तो ऐकून दरोडेखोरांचा नायक आपल्या गुहेंतून बाहेर आला. कळीच्या घोड्याचें तंत्र या दरोडेखोराला बरोबर माहीत होतें. राजपुत्राला तसेंच टाकून त्यानें तो घोडा आपल्या ताब्यांत घेतला. जलद गतीनें दरोडे घालण्यास त्याला आतां अनायासेंच साधन मिळालें ! भर दिवसा दरोडे घालूनहि त्याला आतां कोणी पकडूं शकलें नसतें. त्याच आनंदांत कळीच्या घोड्यावर बसून एका क्षणांत तो आकाशमार्गें उडून गेला.

---

कांहीं अंतर गेला नाहीं तोंच त्या डाकूला एका अरण्यांत एका विहिरीजवळ तीन स्वरूपसुंदर मुली बसलेल्या दिसल्या ! क्षणभर या कोणी अप्सरा किंवा वनदेवता असल्या पाहिजेत, असेंच त्याला वाटलें. या तीन मुली आपणांस मिळाल्या तर त्या राजांना किंवा श्रीमंत सावकारांना विकून किती तरी पैसा मिळेल, या कल्पनेनें त्यानें आपला घोडा हलकेंच त्या विहिरीजवळ उतरवला. घोड्याची चाहूल लागतांच एक अक्राळविक्राळ राक्षस जवळून कोठून तरी डाकूच्या अंगावर चाल करून आला. डाकूनें चपळाई करून त्या तीन मुलींपैकीं

एकीला आपल्या घोड्यावर घातलें व एका क्षणांत तो आला तसा आकाश-मार्गें निघून गेला.

ओरडण्यापलीकडे राक्षसाला कांहींच करतां आलें नाहीं. दुसऱ्या दोन मुली भीतीनें थरथर कांपत विहिरीपाशीं उभ्या होत्या. अखेरीस गेलेली मुलगी परत आणतां येणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे हें राक्षसाच्या लक्षांत आलें व त्यानें त्या दोन मुलींना हलकेंच आपल्या पंजांत पकडून आपल्या विशाल अंगरख्याच्या दोन खिशांत दोघींना ठेवलें व एक पाय विहिरींत टाकून तो राक्षस एका क्षणांत नाहींसा झाला.

इकडे राजपुत्र वसंत हळूहळू शुद्धीवर आला. त्यानें पाहिलें तों जवळ-पास घोडा नाहीं. आतां पुढें जायचें तरी पायींच जायला हवें व घरीं परत जायचें तरीहि पायींच जावें लागणार! वहिणींचा शोध न लावतां घरीं जाणें म्हणजेहि नामुष्कीच. त्यापेक्षां परमेश्वरावर भरंवसा ठेवून आपण वहिणींच्या तपासासाठीं पायींच पुढला रस्ता काटला पाहिजे, असें ठरवून राजपुत्र हळूहळू डोंगर उतरूं लागला. वाटेंत झाडांची मधुर फळें खाल्यावर व झऱ्याचें पाणी प्याल्यावर त्याला खूपच हुषारी वाटूं लागली.

डोंगरउताराच्या अर्ध्या वाटेवर तो आला आणि त्याला माणसांचे शब्द ऐकूं आले. त्यांतील एक आवाज एका स्त्रीचा होता. त्यानें नीट कानोसा घेतला तर डोंगराच्या पोटांतून ते आवाज येत आहेत अशी त्याची खात्री झाली. डोंगराच्या पोटांत जवळपास एखादी गुहा असावी व तीमधून हे आवाज येत असावेत अशी त्यानें कल्पना केली व जमिनीला कान लावून तो आंतील संभाषण ऐकूं लागला.

ती स्त्री रडत रडत आपली हकीकत सांगत होती. आपण एका राजाची मुलगी असून विहिरीच्या कांठावरील आणखी दोन मुली म्हणजे आपल्याच सख्या बहिणी. आपल्या भावाच्या लग्नसोहळ्यांत एका राक्षसानें आपल्याला कसें पळविलें याची साद्यंत हकीकत सांगून ती स्त्री म्हणाली, " तुम्ही मोठे दयाळू दिसतां. मग माझ्या दुसऱ्या दोन बहिणींनाहि सोडवून आणणार काय?"

यावर तो पुरुष म्हणाला, " ज्या राक्षसानें तुम्हांला पळवून आणलें तो एवढा भयंकर आहे कीं मला जर तूं राक्षसाच्या ताब्यांत आहेस हें माहीत असतें तर तुमच्यापर्यंत येण्याचें धाडसहि मीं केलें नसतें. केवळ माझ्यापाशीं कळीचा घोडा होता म्हणूनच मीं राक्षसाच्या तावडींतून सुटलों."

यावर ती म्हणाली, " तो राक्षस कितीहि क्रूर असला तरी त्यानें अगदीं स्वतःच्या मुलींप्रमाणें आम्हांस वागवलें. पण आतां तुम्ही माझें काय करणार आहां ? "

तो पुरुष म्हणाला, " माझा धंदा जरी दरोडेखोरीचा असला तरी स्त्रियांकडे पापी नजरेनें मी कधींच पहात नाहीं. परंतु येथून पलीकडे एक समुद्र आहे. त्यांत सात बेटें आहेत. त्यांतील सातव्या बेटावर एक मोठा श्रीमंत मनुष्य रहातो. त्याचा एक सात मजली वाडा आहे. जगांतील अत्यंत सुंदर अशा सहा मुलींशीं त्यानें लग्न केलें असून प्रत्येक मुलगी त्या वाड्याच्या एक एक मजल्यावर रहाते. या सहाहि मुलींवर ताण करील इतकी सुंदर आणखी एक बायको त्याला हवी आहे व तिच्यासाठीं त्यानें सातवा मजला बांधून ठेवला आहे. एवढी सुंदर मुलगी कोणी दिल्यास त्याला तो दहा हजार मोहरा देणार आहे ! त्या श्रीमंताकडे मी तुला नेणार आहे. "

एवढ्यांत लांबून कांहीं घोडेस्वार येतांना राजपुत्राला दिसले. तो तें बोलणें ऐकण्याचें तसेंच टाकून एका झाडावर जाऊन बसला व काय होतें तें पाहूं लागला. डोंगराच्या पायथ्याशीं ते सर्व घोडेस्वार आले व एक मोठी शिळा बाजूला सारून सरळ डोंगराच्या पोटांत शिरले ! ते आंत जातांच ती शिळा आपोआप जागेवर येऊन बसली.

एकंदर प्रकार काय आहे हें वसंत राजपुत्राच्या चटकन लक्षांत आलें. डोंगराच्या पोटांत एक गुहा असून तींत दरोडेखोरांची एक टोळी रहात आहे. आपला कळीचा घोडा त्यापैकींच एकानें पळवून नेला आहे. आपली एक वहीण या दरोडेखोरांच्या ताब्यांत असून दुसऱ्या दोघीजणी एका राक्षसाच्या तावडींत सांपडलेल्या आहेत. पण हें लक्षांत येऊन देखील त्याला एकट्याला त्या दरोडेखोरांशीं सामना देऊन घोडा व बहीण मिळविणें शक्य नव्हतें. परंतु बहिणींचा तपास असा अचानक लागल्यामुळें त्यांच्या सुटकेचाहि असाच मार्ग सांपडेल, तोंपर्यंत संधीची वाट पहात राहिलें पाहिजे, असें ठरवून तो झाडावरून खालीं उतरला व वाट आक्रमूं लागला.

## ३ : मापट्याचें रहस्य

कितीतरी दिवस तो राजपुत्र चालत होता. झऱ्याचें पाणी प्यायचें, झाडांचीं रसरसलेलीं फळें खायचीं व दुपारीं आणि रात्रीं एखाद्या झाडाखालीं विश्रांति घ्यायची असा त्याचा रोजचा कार्यक्रम होता. असें करतां करतां एके दिवशीं एका दाट अरण्यांतील एका प्रचंड विहिरीपाशीं तो आला. जवळच एक जुनाट देऊळहि होतें. त्यानें विहिरींत डोकावून पाहिलें तों आंत पाण्याचा थेंबहि नाहीं ! मग त्याच्या लक्षांत आलें कीं हीच ती राक्षसाची विहीर असावी. आणि ही विहीर नसून राक्षसाच्या गुहेचें प्रवेशद्वार असावें, आपल्या वहिणीला पळविणारा हाच तो राक्षस असावा ! शेवटीं त्या देवळांतच मुक्काम करावयाचा व राक्षस दिसतो का तें पहावयाचें, असा विचार करून राजपुत्रानें देवळांतच मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच राजपुत्र उठून व देवळाच्या मागें असलेल्या झऱ्यावर आंघोळ करून नुकताच देवळांत परत आला होता. स्नान करून देवीची पूजा करावी व आपलें गाऱ्हाणें देवीसमोर मांडावें अशा विचारांत तो होता एवढ्यांत एकाएकीं वावटळ सुरू झाली. राजपुत्राला आपल्या लग्नांतील मेजवानीचा तो प्रसंग आठवला. त्यानें तर्क केलाच कीं बहुधा राक्षसाची स्वारी येत असावी. एवढ्यांत त्या विहिरींतून धुराचा प्रचंड लोट बाहेर आला व थोड्याच वेळांत त्यामधून एका अक्राळविक्राळ राक्षसाची आकृति दिसूं लागली. राजपुत्र चटकन् मूर्तीच्या आड जाऊन बसला व पुढील प्रकार पाहूं लागला.

त्या राक्षसानें दोन खिशांतून दोन सुंदर मुली बाहेर काढल्या. त्यांना उत्तम उत्तम फळें खावयास दिलीं. कांहीं खेळणीं त्यांच्यापुढें टाकलीं व एका झाडाखालीं तो बसून राहिला. एवढ्यांत त्यापैकीं मोठ्या मुलीचें लक्ष देवळांतील मूर्तीकडे गेलें. तिची आणि राजपुत्राची नजरानजर झाली. भावानें बहीण ओळखली व बहिणीनेंहि भाऊ ओळखला. तिनें भावाला गपचीप लपून राहण्याबद्दल खूण केली.

थोड्याच वेळांत राक्षस नाक फेंदारीत मुलीजवळ आला व आपल्याला माणसाचा वास येत आहे असें सांगूं लागला. कर्कश स्वरानें तो म्हणाला, "तुमच्यापैकीं एकीला एका माणसानें माझ्या डोळ्यांदेखत पळवून नेलें आहे. त्यामुळें माणूस दिसला तर मी आतां त्याची गय करणार नाहीं !"

मोठ्या मुलीनें त्याची खूप समजावणी केली. आमच्याच अंगाचा वास येत असेल, असेंहि ती म्हणाली. परंतु राक्षसाची समजूत पटेना. अखेरीस आपण आतां लागलीच गुहेंत जाऊं या म्हणजे सर्वच त्रास वांचेल, असें ती राक्षसाला म्हणाली. तिचें हें म्हणणें मात्र राक्षसास पटलें. त्यानें चटकन् दोन्ही मुलींना पुन्हा आपल्या खिशांत ठेवलें व एक पाय विहिरींत टाकून तो क्षणांत नाहींसा झाला ! राक्षसाच्या खिशांत जाण्यापूर्वी मोठ्या मुलीनें पायानें मातींत कांहीं रेघोट्या ओढलेल्या राजपुत्राला दिसल्या होत्या. राक्षस जाऊन सर्वत्र सामसूम झाल्यावर राजपुत्र हलकेंच मूर्तीमागून बाहेर आला व विहिरीच्या कांठापाशीं गेला.

आपल्या बहीणीनें काढलेल्या रेघोट्यांत कांहीं अर्थ आहे काय, हें तो प्रथम पाहूं लागला. नीट लक्षपूर्वक पाहिल्यावर त्याला दिसून आलें कीं, मातीमध्यें तिनें ‘ मापटें ’ अशीं अक्षरें लिहिलीं आहेत. यामध्यें निश्चित कांहींतरी अर्थ भरला आहे असा त्यानें कयास बांधला व झुडुपांचा आधार घेऊन तो हलकेंच त्या विहिरींत उतरला. सगळीकडे बारकाईनें शोध केल्यावर एका खोल कपारींत पानांआड लपवून ठेवलेलें एक तांब्याचें माप त्याला दिसलें ! हेंच तें मापटें असावें व यामध्यें कांहींतरी गूढ असावें असें समजून त्यानें तें मापटें आपल्या अंगरख्यांत गुंडाळलें व झटकन् विहिरीच्या बाहेर तो आला.

मापटें गेल्याचें राक्षसाच्या लक्षांत येण्यापूर्वी जेवढें दूर जातां येईल तेवढें जावें व मग मापट्याचें गूढ शोधून काढावें, असा विचार करून राजपुत्र झपाट्यानें तेथून निघाला व अनेक अरण्यें पायाखालीं तुडवून एका वस्तीच्या ठिकाणीं आला.

## ४ : तुरुंगाच्या कोठडींत रवानगी !

त्या मनुष्यवस्तींत प्रवेश करण्यापूर्वी गांवाबाहेरून वहाणाऱ्या नदीमध्यें राजपुत्रानें हातपाय धुतले. स्वच्छ पाणी प्याला आणि पुढें चालूं लागणार तोंच नदीकांठींच रसरशीत पिकलेल्या बोरांनीं भरलेलें झाड त्याला दिसलें. आपल्या अंगरख्यांत गुंडाळलेलें मापटें त्यानें झाडाखालीं ठेवलें व सपासप झाडावर चढून त्यानें पोटभर बोरें खाल्लीं. झाडावरून खालीं उतरून मापटें

घेण्यास जातो तों तें मापटें बोरांनीं शिगोशीग भरलेलें ! आपल्या हातांतील एक बोर त्या मापांत पडलेलें त्यानें पाहिलें होतें. त्या मापांतच कांहींतरी जादू असली पाहिजे, असा विचार करून राजपुत्रानें आपल्या अंगरख्यांत तें सबंध माप रिकामें केलें व त्यांतलेंच एक बोर उचलून मापट्यांत टाकलें तों काय आश्चर्य, तें माप बोरांनीं पुन्हा शिगोशीग भरलें !

नदीकांठीं असलेली ती वस्ती भिल्ल लोकांची होती. भिल्लांच्या वस्तींत त्यांचा एक राजा किंवा नायक असतो व त्या नायकाच्या भेटीस कांहीं नजराणा घेऊन गेलें कीं त्या माणसाच्या जिवाला जीव देण्यास सर्व भिल्ल तयार असतात हें राजपुत्रास माहीत होतें. घरून निघतांना आपल्या अंगरख्याच्या खिशांत एक मोहर होती हें त्याला आतां आठवलें. अरण्यांतून प्रवास करतांना या मोहरेचा कांहीं उपयोग नव्हता. ती मोहर त्यानें मापट्यांत टाकली व तें मापटें क्षणांत चकचकीत मोहरांनीं भरून गेलें ! अशा प्रकारें चार-दोन मापटीं मोहरांची त्यानें रास केली व त्या सर्व मोहरा आपल्या अंगरख्याच्या आंत बांधून तो भिल्लांच्या नायकाच्या भेटीला गेला. सोन्याची एवढी मोठी रास पाहून भिल्लांच्या नायकाच्या मनावर राजपुत्रास हवा तोच परिणाम झालेला दिसला. नायक खुषींत आहे, असें पहातांच त्यानें आपली हकीकत थोडक्यांत त्याला सांगितली. आपण एक राजपुत्र असून आपली एक बहीण डाकूनें पळवून पलीकडील समुद्रांतील सातव्या बेटावरील एका श्रीमंत सावकारास विकून टाकली आहे व तिला सोडवण्यासाठीं आपण आलों आहों, एवढीच हकीकत मुद्दामच त्यानें सांगितली. आणखी दोन बहिणींची हकीकत मुद्दामच त्यानें सांगितली नाहीं.

भिल्ल-राजानें आपल्या सेवकांना एक चांगली नौका तयार करण्याची आज्ञा केली, व नौका तयार होतांच कुशल नावाडी बरोबर देऊन परत येतांना पुन्हां एकदां आपल्याकडे मुक्काम करण्याचें आग्रहाचें आमंत्रण देऊन राजपुत्रास त्यानें निरोप दिला.

राजपुत्राचा आतां सुखांत प्रवास सुरू झाला होता. मापट्यामुळें त्याला द्रव्याची ददात नव्हती. उत्तम नौका व कुशल नांवाडी त्याच्या ताब्यांत होते. वाराहि अनुकूल होता. अगदीं थोड्याच दिवसांत एक एक बेट मागें टाकीत राजपुत्र सातव्या बेटावर येऊन पोंचला. नावाड्यांना त्यानें भरपूर द्रव्य दिलें

व आपण परत येईपर्यंत तेथेंच समुद्रकिनाऱ्यावर झोंपडी बांधून रहावयास सांगितलें. तो स्वतः शहरांत दाखल झाला.

शहरांत आल्यावर त्या सावकाराचा सात मजली वाडा शोधून काढण्यास कांहींच अडचण पडली नाहीं. वाड्याच्या देवडीवर सात सहस्र शिपायांचा पहारा होता. वाड्यांत जायला सात कमानी होत्या, व त्या प्रत्येक कमानींत नंग्या समशेरी घेतलेले पहारेकरी होते. कुणीहि परका माणूस सावकाराच्या भेटीस आला तर बाहेरच्या दिवाणखान्यांत त्यांची भेट व्हावयाची. खुद्द सावकाराखेरीज व त्याच्या खास विश्वासू सेवकांखेरीज कुणालाहि वाड्याच्या आंत प्रवेश मिळत नसे !

राजपुत्रानें त्या वाड्यासमोरचेंच एक घर भाड्यानें मिळवलें. आपण परदेशचे व्यापारी असून कांहीं उत्तमोत्तम माल मिळाल्यास खरेदीसाठीं येथें आलों आहों, अशी बतावणी त्यानें सुरू केली. शहरांतील व्यापाऱ्यांशीं त्यानें ओळखी केल्या. राजपुत्राच्या घरीं दररोज कोणी मातबर व्यापारी भोजनास असावयाचा, व एखाद्या राजालाहि लाजवील असा भोजनाचा थाट असायचा ! एक दिवस या सावकारालहि राजपुत्रानें भोजनाचें आमंत्रण दिलें व त्याच्याशीं ओळख करून हळू हळू त्याजबरोबर मैत्री सुरू केली.

थोड्याच दिवसांत खुद्द सावकाराकडून त्या सातव्या मजल्यावरील मुलीची हकीकत राजपुत्राला समजली. बोराएवढ्या शंभर मोत्यांची माळ जर सावकारानें आपणांस दिली तरच आपण त्याच्याशीं लग्न करूं असा त्या मुलीनें पण केल्याचेंहि सांगितलें. परंतु बोराएवढा फक्त एकच मोती गांवांतील एका जवाहिऱ्यापाशीं असून त्याची किंमत एक हजार मोहरा आहे व आणखी असे मोती मिळणें मुष्किल आहे, हें आपल्या मनांतील दुःखहि सावकारानें बोलून दाखविलें. सावकाराला असे मोती मिळवून देण्याच्या कामीं आपण जरूर मदत करूं असें आश्वासन राजपुत्रानें सावकारास दिलें.

दुसऱ्या दिवशीं राजपुत्रानें हजार मोहरा देऊन तो बोराएवढा मोती खरेदी केला व मापट्यांत टाकून त्याचे शंभरावर मोती तयार केले. त्यानंतर गांवांतील एका कासाराकडून एक मोठी समई त्यानें तयार करून घेतली. या समईचा मधला दांडा पोकळ होता. त्यांत एक लहानसा दरवाजाहि होता व एक माणूस आंत जाऊन त्या दांड्याच्या पोकळींत सहज लपून बसूं शके !

एक दिवस राजपुत्रानें त्या सावकारास सांगितलें कीं आपल्य जवळ एक जादूची समई असून रात्रीं त्या समईंत अत्तराच्या सात वाती ठेवायच्या. त्यापैकीं सहा वाती उजळावयाच्या व एक वात तशीच ठेवायची. सकाळींच सातव्या वातीवर एक बोराएवढा मोती मिळेल. ती समई तुम्हांस द्यावयास मी तयार आहे. परंतु रोज सकाळीं ती समई पुन्हां आपल्या देवखोलींत आणून ठेवायची व संध्याकाळीं परत घेऊन जावयाची. हें ऐकून सावकाराला खूपच आनंद झाला ! क्षणभर ही बनवाबनवी असेल असेंहि त्याला वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं वसंतरावांसारखा प्रामाणिक व्यापारी असली बनवाबनवी करणार नाहीं, असाहि विचार त्याच्या मनांत आला. कांहीं असलें तरी यांत आपला कांहींच तोटा नाहीं, असा विचार करून त्यानें दुसऱ्या दिवसापासून त्या समईचा प्रयोग करण्याचें ठरविलें.

राजपुत्रानें आपला एक विश्वासू नोकर त्या समईंत बसवला. त्याच्या-जवळ बहिणीला देण्यासाठीं एक पाकीट दिलें होतें. त्या पाकिटांत बोराएवढे दहा मोती व एक सविस्तर खुलाशाचें पत्र होतें. आपल्या नोकराला राजपुत्रानें सांगितलें कीं मध्यरात्रीं सर्वत्र सामसूम झालें कीं हलकेंच समईच्या बाहेर यावयाचें, तें पाकीट त्या मुलीजवळ द्यावयाचें व परत गुपचूप समईंत जाऊन बसायचें आणि सकाळीं समई आपल्या देवखोलींत आली कीं बाहेर यावयाचें !

राजपुत्रानें आपल्या बहिणीला आपण तिला सोडवायला आलों असून तिनें समईंत बसून केव्हां बाहेर यावयाचें तें आपण कळवूं, तोंपर्यंत तिनें दररोज पहाटे उठून समईच्या बिनजळत्या वातीवर एक मोती ठेऊन द्यावयाचा असें लिहिलें होतें.

दुसऱ्या दिवसापासून सर्व कार्यक्रम सुरळीत सुरू झाला. सकाळीं लग-बगीनें सावकार सातव्या महालांत गेला, तों समईंतील एका वातीवर एक टप्पोरें तेजस्वी मोती त्याला दिसलें ! त्याचा आनंद गगनांत मावेना. आणखी शंभर दिवसांनीं ही मुलगी आपली बायको होणार, या आनंदांतच तो महालांतून बाहेर आला. दररोज सकाळीं ती समई राजपुत्राच्या देवखोलींत सावकाराचे नोकर आणून ठेवीत व सायंकाळीं दिवे लागणीला पुन्हा घेऊन जात.

राजपुत्र आतां पुढले बेत योजीत होता. राजकन्येला घेऊन बाहेर आल्यानंतर सावकाराच्या लक्षांत येण्यापूर्वीं पळून जाणें आवश्यक होतें. अखेरीस त्यानें सर्व बेताची नीट आंखणी केली व त्या रात्रीं आपण स्वतःच समईंतून जाऊन बहिणीला भेटावें व तिला सर्व कल्पना द्यावी असें ठरवून तो त्या रात्रीं समईच्या दांडींत बसून बहिणीच्या महालांत जाऊन पोंचला.

त्याच दिवशीं सावकाराच्या मनांत आलें कीं समईमध्यें मोती केव्हां तयार होतो, कीं एखादी परी किंवा देवता येऊन समईत मोती ठेवते, हें एकदां चोरून पहावें. म्हणून तो त्या रात्रीं सातव्या महालाच्या बाहेर एका झरोक्यापाशीं बसून राहिला. मध्यरात्रीं सामसूम झाली आणि समईचा दरवाजा उघडून राजपुत्र बाहेर आला. सावकार हें पहातच होता. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासहि बसेना. आपला मित्र म्हणवणारा हा व्यापारी एवढा कपटी व विश्वासघातकी आहे, हें पाहून सावकाराच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. धाडकन् महालाचा दरवाजा उघडून त्यानें राजपुत्राची मानगूटच पकडली व राजपुत्राला शहराच्या कोतवालाच्या ताब्यांत दिलें. वसंताची रवानगी तुरुंगाच्या कोठडींत झाली. समईच्या जादूचें रहस्य उघडें झालें व समईची रवानगी अडगळीच्या खोलींत झाली !

## ५ : कळीचा घोडा परत मिळाला

इकडे राजपुत्र वसंताची बायको मोठ्या दुःखांत दिवस कंठीत होती. तीन मुली गेल्या व दिवसेंदिवस मुलगाहि परत येण्याची आशा दुरावूं लागली होती म्हणून राजाराणीहि तिला आणखीच टाकून बोलत ! आतां सर्वांच्या नकळत आपणच राजवाड्याबाहेर पडावें व नवऱ्याचा आणि नणंदांचा शोध लागतो का ते पहावें, असेहि विचार अलीकडे तिच्या मनांत येऊं लागले होते.

एके दिवशीं सायंकाळीं असाच विचार करीत ती आपल्या वाड्याच्या गच्चीवर बसली होती. एवढ्यांत लांबून आकाशांतून कांहींतरी वस्तु तरंगत येत असलेली तिला दिसली ! थोड्याच वेळांत तो आपलाच कळीचा घोडा आहे हें तिनें ओळखलें. राजपुत्र वसंतच आला असावा म्हणून ती उत्सुकतेनें पाहूं लागली. तो त्या घोड्यावर आपल्या नवऱ्याऐवजीं कोणातरी एक जटाधारी दाढीवाला साधु बसल्याचें तिला दिसून आलें ! तो घोडा गांवाच्या सीमेवर उतरलेला दिसतांच तिनें आपल्या सेवकांना त्या साधूला राजवाड्यांत घेऊन येण्याचा हुकूम केला.

एका झुडूपाजवळ घोडा दडवून तो साधु शहरांतच यावयास निघाला होता. सेवक त्याला घेऊन वासंतीच्या वाड्यांत आले. वासंतीनें त्या घोड्याची

चौकशी केली. तेव्हां आपल्याला उडत्या घोड्याची कांहींच माहिती नसून आपण पायींच निघालों असल्याची वतावणी साधूनें केली. हा साधु नसून कोणीतरी लबाड माणूस आहे व आपल्या नवऱ्याबद्दल याला नक्की माहिती असली पाहिजे हें वासंतीला समजून चुकलें. तिनें आपल्या सेवकांना खूण करतांच त्यांनीं त्या साधूला गिरफदार केलें व त्याची रवानगी अंधार कोठडींत केली.

थोड्याच वेळांत झुडपाआड दडवलेला कळीचा घोडा सेवकांनीं शोधून काढला. साधूला दंडुक्याचा प्रसाद देतांच हळूंहळूं त्यानें कांहीं गोष्टींचा कबुलीजबाव दिला. एका डोंगराच्या माथ्यावर तो घोडा आपणास मिळाला, त्या घोड्यावरील स्वार बेशुद्ध पडला होता व नंतर शुद्धीवर आल्यावर तो कोठेंतरी निघून गेला, असें साधूनें सांगितलें. त्या साधूला थोडें विश्वासांत घेण्याचा प्रयत्न वासंतीनें केला. आपल्या नणंदांना कुणींतरी राक्षसानें पळवून नेलें आहे व आपला नवरा कळीचा घोडा घेऊन त्यांच्या शोधांत गेला होता, ही हकीगत वासंतीनें साधूला सांगितली. तेव्हां साधूनें त्या तीन मुली आपण पाहिल्या असून त्यांपैकीं एक मुलगी सातसमुद्रापलीकडील आठव्या समुद्रांतील सातव्या बेटावरील एका सातमजली महालांत आहे, अशी माहिती दिली. एवढी माहिती मिळतांच त्या साधूला पुन्हा कोठडींत ठेवलें, व कळीच्या घोड्यावर स्वार होऊन आपण स्वतःच त्या सातव्या बेटावर जावयाचें वासंतीनें ठरविलें.

आपण आपल्या नवऱ्याच्या व नणंदांच्या शोधांत गेलों आहों, एवढी चिठ्ठी तिनें सासूसासऱ्यांसाठीं लिहून ठेवली व पुरुषवेष धारण करून व प्रवासासाठीं पुरेशीं सामग्री व संपत्ती बरोबर घेऊन तिनें त्या रात्रींच कळीच्या घोड्यावरून आकाशमार्गें प्रवास सुरू केला.

एकामागें एक समुद्र मागें टाकीत तिनें सातहि समुद्र ओलांडले. आठव्या समुद्रांतील एक एक बेट तिनें मागें टाकलें व सातव्या बेटाच्या किनाऱ्यावर तिनें आपला घोडा उतरवला. त्या वेळीं नुकताच सूर्योदय होत होता. वाळूमध्यें एक मोठा खड्डा खणून त्यांत तिनें आपला घोडा पुरून ठेवला व गांवांत जावयास निघणार तोंच दूर अंतरावर समुद्रकिनाऱ्यावरच तिला एक झोपडी दिसली. त्या झोपडींत कांहीं माहिती मिळते का तें पहावें व मगच गावांत जावें असा विचार करून ती त्या झोपडीपाशी आली. राजपुत्राला बेटावर घेऊन येणाऱ्या त्या भिल्ल नावाड्यांचीच ती झोपडी होती.

झोपडींतील भिल्लांनीं मनमोकळेपणानें राजपुत्राची सर्व हकीगत सांगितली. सध्यां तो राजपुत्र कैदेंत असल्याचें आपल्या कानीं आल्याचेंहि त्यांनीं

सांगितलें. आपण परत येईपर्यंत येथून जाऊं नका, असें आपल्याला राजपुत्रानें सांगितल्यामुळें आपण येथेंच राहिलों आहों, असेंहि ते भिल्ल पुढें म्हणाले. त्या भिल्लांचा मनमोकळेपणा, प्रामाणिकपणा व निष्ठा पाहून वासंतीला मोठें समाधान वाटलें. आपण त्या राजपुत्राचे मित्र असून त्याला सोडविण्यासाठीं आलों आहें, असें वासंतीनें सांगून आपला मुक्काम त्या भिल्लांच्या झोपडींतच ठोकला.

वासंतीला आतां नवरा व नणंद अशा दोघांची सुटका करावयाची होती. नवरा तुरुंगांत असला तरी त्याच्या जिवाला धोका नाहीं, राजकन्येवर मात्र केव्हां काय प्रसंग येईल याचा भरंवसा नाहीं, यासाठीं तिची सुटका अगोदर करावी, असा विचार तिनें केला व ती कामाला लागली.

चार-दोन दिवस शहरांत फिरतांच तिला राजकन्येबद्दल, सावकाराबद्दल व तुरुंगांत टाकलेल्या व्यापाऱ्याबद्दल पुष्कळच माहिती मिळाली. आपल्या नणंदेचें तिच्या मताविरुद्ध लग्न लावण्यापूर्वींच तिला सोडविणें आवश्यक आहे, हेंहि वासंतीस कळून आलें. तो सावकार साधु-बैराग्यांचा भक्त असून गांवांत कोणीहि नवा साधु आला कीं त्याला मिष्टान्नाचें जेवण दिल्याखेरीज तो रहात नसे. हें समजतांच वासंतीनें एका जोगिणीचा वेष घेतला व त्या सावकाराच्या महालाच्या रस्त्यानें जाऊं लागली. गांवांत आलेली ती नवी जोगीण पहातांच सावकाराच्या नोकरांनीं सावकारास वर्दी दिली व सावकारानें स्वतः बाहेर येऊन जोगिणीस आपल्या घरीं भोजनाला पाचारण केलें. पंचपक्वान्नांचें पोटभर जेवण जेवल्यावर जोगिणीनें सावकाराला आशीर्वाद दिला कीं लौकरच त्याची कामना पूर्ण होईल.

जोगिणीची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें सावकार म्हणाला, "माई मला काय कमी आहे ! माझ्या साऱ्या कामना केव्हांच पूर्ण झाल्या आहेत !"

त्यावर ती जोगिण म्हणाली, "राजकन्येसारखी एक सुंदर मुलगी तुझ्या मनांत भरली आहे, पण ती लग्नाला तयार होत नाहीं हें खरें ना? मी एक मंतरलेला ताईत देतें तो तिच्या दंडांत बांध. आजपासून बरोबर सात दिवसांनीं ती स्वतः होऊनच तुझ्याशीं लग्न करण्याची गोष्ट काढील." असें म्हणून जोगिणीनें आपल्या पडशींतून एक ताईत काढून त्याच्या हातीं दिला. पण पुन्हां लगेच ती म्हणाली, "कदाचित् तुम्हांला ती आपल्या दंडांत ताईत बांधूं देणार नाहीं. त्यापेक्षां मीच तिची समजूत घालून दंडांत ताईत बांधतें."

सावकाराला जोगिणीचें म्हणणें पटलें. तो स्वतःच जोगिणीस घेऊन राजकन्येच्या महालांत गेला. जोगिणीनें सावकाराला दूर उभे रहावयास सांगितलें व आपण पुढें जाऊन त्या मुलीच्या दंडांत ताईत बांधूं लागली. ताईत बांधतां बांधतां जोगिणीनें हळूच राजकन्येच्या कानांत सांगितलें कीं ताईतामध्यें एक चिठ्ठी आहे ती वाच म्हणजे सर्व कांहीं कळेल.

सावकार व जोगीण निघून गेल्यावर राजकन्येनें हळूच ताईत उघडला व त्यामधील चिठ्ठी बाहेर काढली. चिठ्ठींत लिहिलें होतें, " तुम्हांला व राजपुत्र वसंत यांना सोडविण्यासाठीं मी आलें आहें. दोन दिवसांनीं पौर्णिमा आहे. त्या दिवशीं मध्यरात्रीं वाड्याच्या गच्चीवर तुम्ही थांबा. मी पुरुषाच्या वेषांत येऊन तुम्हांस घेऊन जाईन.–तुमची वहिनी."

चिठ्ठी वाचतांच राजकन्येला अपरिमित आनंद झाला. प्रश्न एवढाच होता कीं मध्यरात्रीं वाड्याच्या गच्चीवर जायला कसें मिळणार? तथापि कांहींतरी प्रयत्न करणें जरूर होतें.

पौर्णिमेच्या दिवशीं सकाळपासूनच तिनें आपण फार आनंदी आहों, असें भासविण्यास सुरुवात केली. सकाळीं सावकाराला मुद्दाम बोलावून घेऊन त्याच्याशीं कांहीं वेळ गप्पा मारल्या व पुन्हा संध्याकाळीं येण्याबद्दल त्यास सांगितलें. सावकार संध्याकाळीं आला तेव्हां राजकन्येनें त्याला सांगितलें " आज फार उल्हसित वाटत असून रात्रीं चांदण्यांत जेवावें व चांदण्यांत झोंपावें असें वाटतें आहे. तरी वाडयाच्या गच्चींत झोपण्याची आज मला परवानगी असावी." सावकाराला वाटलें हा ताइताचाच परिणाम असावा, अशा स्थितींत तिला नाराज करणें बरें नव्हे. त्यानें आपल्या सेवकांना तिचा पलंग वाडयाच्या गच्चीवर नेण्यास सांगितलें व तो निघून गेला.

मध्यरात्रीं पुरुष वेष धारण केलेली वासंती कळीच्या घोडयावरून हलकेंच वाडयाच्या गच्चीवर उतरली व एका क्षणाचाहि विलंब न लावतां राजकन्येला आकाशमार्गें घेऊन सरळ भिल्लांच्या झोपडींत आली. भिल्लांना तावडतोब नाव हाकारण्याची तयारी करण्यास सांगितलें. प्रथम तें भिल्ल तयार होईनात. पण जेव्हां तिनें सांगितलें कीं त्या मुलीला त्या बेटावर ठेवणें धोक्याचें आहे व आपण राजपुत्राला सोडवून आणीतोंपर्यंत त्या मुलीला भिल्ल वस्तींत ठेऊन तिचा सांभाळ करावा. तेव्हां त्या भिल्लांनीं राजकन्येसह नाव हाकारली. लौकरच ते भिल्ल वस्तींत पोचले व नायकाला सर्व हकीकत सांगून राजकन्येला

त्याच्या ताब्यांत दिलें. राजकन्याहि तेथें निर्भयपणें आपल्या भावाची व वहिनींची वाट पहात दिवस घालवूं लागली.

इकडे राजपुत्राच्या सुटकेचा विचार आतां वासंती करूं लागली. एक दिवस तिनें उत्तम पोषाख परिधान केला व बेटांतील राजाच्या भेटीस ती गेली. दरबारी रिवाजाप्रमाणें राजाला नजराणा अर्पण करून ती म्हणाली, " माझ्या जवळ उत्तम मोत्याचें बीं आहे. तें विशिष्ट जमिनींत पेरलें तर मोत्याचीं कणसें येतील. परंतु त्यास लागणारी जमीन आपल्या राज्यांत आहे काय त्याचा तपास करण्याची परवानगी मला मिळावी."

राजानें मोठ्या आनंदानें परवानगी दिली. आठ-दहा दिवसांत तिनें सबंध बेट धुंडाळण्याचें नाटक केलें व अशी जमीन त्या बेटांत कुठेंच नाहीं असें सांगितलें. आपण फक्त राजवाड्याच्या उद्यानाची व तुरुंगाच्या बागायतीची जमीन पाहिली नाहीं, असेंहि ती म्हणाली. राजानें या दोन्ही जमिनी त्या तरुणास दाखविण्याबद्दल अधिकाऱ्यांना हुकूम दिला. शेवटीं तुरुंगाच्या जमिनींतील एक शेत आपणांस हव्या तशा प्रकारचें आहे, असें त्या तरुणानें सांगितलें. राजाला आनंद झाला व ती जमीन लावण्यासाठीं हवें तें साह्य त्या तरुणास देण्याचें राजानें कबूल केलें.

आतां या तरुणाच्या देखरेखेखालीं शेतीची नांगरट व मशागत सुरू झाली. तरुणाला हवे ते व हवे तेवढे कैदी शेतांत खपूं लागले. सर्व कैद्यांची पहाणी करून त्यानें एक दिवस वसंत राजपुत्रासहि कामास बोलावलें व काम करीत असतां त्याच्या हातीं एक चिठ्ठी दिली. चिठ्ठींत लिहिलें होतें, " उद्यां आपलें सर्व सामान घेऊनच कामावर यावें. आपली आवडती वासंती कळीच्या घोड्यावरून येऊन आपणांस घेऊन जाणार आहे. "

चिठ्ठी वाचतांच आपण स्वप्नांत तर नाहीं ना, असें वसंतास वाटलें. त्यानें त्या तरुणाकडे निरखून पाहिलें आणि त्यानें ओळखलें कीं, त्याच्या हातीं चिठ्ठी देणारा तरुण म्हणजे पुरुष वेषांतील वासंतीच होती ! तिच्या धाडसाचें त्याला कौतुकच वाटलें. तथापि कळीचा घोडा तिनें परत कसा मिळवला असेल, हें त्याला गूढच होतें.

दुसऱ्या दिवशीं त्या बेटावर एकच चर्चेचा विषय होता. उडत्या घोड्यावरून एक सुंदर स्त्री त्या बेटावरील तुरुंगांत उतरली व एका तरुण कैद्यास हातोहात घोड्यावर घालून ती आकाशांत अदृश्य झाली !

# ६ : राक्षसाचा निकाल

थोडयाच वेळांत वसंत व वासंती त्या भिल्ल वस्तींत येऊन उतरले. वाटेंत राजपुत्रानें आपली सर्व हकीगत वासंतीस सांगितली व तिनेंहि घोडा मिळाल्यापासूनची सारी हकीगत राजपुत्रास सांगितली. आपण कैद केलेला साधु हा एका दरोडेखोरांच्या टोळीचा नायक आहे हें समजतांच क्षणभर वासंतीला स्वतःच्या कर्तबगारीचें कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

भिल्ल वस्तींत आल्यावर राजपुत्रानें आपल्याजवळील मापटें आपल्या वाहिणीस दाखविलें. तें त्या राक्षसाचें मापटें आहे व त्यांतूनच तो आपल्याला मेवामिठाई व फळफळावळ काढून देई एवढेंच तिला माहीत होतें. तथापि या मापट्याबद्दल आपल्या मोठ्या वहिणीस राक्षसानें कांहीं तरी सांगितलें होतें असें ती म्हणाली.

उडत्या घोडयावरून राक्षसाच्या तावडींतील मुली पळवून आणणें हें धोक्याचें आहे हें वसंतास माहीत होतें. शिवाय मुली पळवून आणल्याच तर राक्षस क्रोधानें वेडा होईल व आसमंतांतील सर्व माणसांचा संहार करील, ही भीतीहि होतीच. कांहीं तरी करून राक्षसाला ठार मारूनच त्या मुलींची सुटका करावयाची असा निर्णय राजपुत्र व वासंती यांनीं घेतला.

वेगवेगळ्या राक्षसांचें मरण वेगवेगळ्या वस्तूंत असतें, हें राजपुत्राला ठाऊक होतें. तो साऱ्या भिल्ल वस्तींत घरोघर हिंडला. म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या त्यानें भेटी घेतल्या. पण त्या राक्षसाचें मरण कशांत आहे, हें त्याला कोणींच सांगूं शकलें नाहीं. अखेरीस तो भिल्लांचा नायक म्हणाला कीं, तेथून शंभर मैलांवर दुसऱ्या एका भिल्ल राज्यांत त्याची आत्या रहाते. ती दोनशें वर्षें वयाची आहे ! तिला आजूबाजूच्या अनेक राक्षसांच्या कथा माहीत आहेत. ही माहिती मिळतांच राजपुत्रानें तात्काळ उडत्या घोडयावरून कूच केलें व त्या भिल्ल राज्यांत जाऊन त्या म्हाताऱ्या भिल्लिणीची गांठ घेतली. वसंतानें भिल्ल नायकाची ओळख देतांच त्या म्हातारीनें साऱ्या रात्रभर एका-मागून एक अनेक राक्षसांच्या कथा सांगितल्या.

म्हातारीनें सांगितलेल्या एका कथेंतून राजपुत्राला हवी होती ती माहिती मिळाली. एका राक्षसाजवळ एक मापटें असून त्या मापट्याला

खिळ्यानें भोंक पाडलें कीं, राक्षस मरून पडेल ही हकीगत ऐकतांच राजपुत्रानें भिल्लिणीचा निरोप घेतला व तो पुन्हा भिल्ल वस्तींत आला !

दुसऱ्या दिवशीं राजपुत्र, राजकन्या व वासंती यांनीं सर्व भिल्लांचा निरोप घेतला व उडत्या घोड्यावरून प्रयाण केलें. वाटेंत राक्षसाची विहीर व तें देऊळ दिसतांच ते हलकेंच खालीं उतरले व देवळांत जाऊन मूर्तीच्या आड लपून बसले.

थोड्याच वेळांत नेहमींप्रमाणें वावटळ सुरू झाली; धुराचा लोट आला व विहिरींतून राक्षस बाहेर आला. पूर्वीपेक्षां आतां तो बराच कृश झालेला दिसत होता ! त्यानें आपल्या अंगरख्यांतून राजकन्यांना बाहेर काढलें व त्यांच्याकडे कौतुकानें पहात तो विहिरीच्या कांठाजवळ बसून राहिला. मूर्तीच्या मागें राजपुत्र तयारींत होताच. त्यानें एका मोठ्या खिळ्यावर दगडाची उपट घालून आपल्याजवळील मापट्याला भोंक पाडलें आणि काय आश्चर्य, गगनभेदी आरोळी मारून राक्षस जागच्या जागी मरून पडला ! भेदरलेल्या दोघी मुली राक्षसाच्याजवळ जातात तोंच मूर्तीमागून राजपुत्र, वासंती व राजकन्या प्रकट झाले. सर्वांची भेट झाली त्या प्रसंगाचें वर्णन शब्दानें करता येणें शक्य नाहीं !

बहिणींच्या सांगण्यावरून राजपुत्रानें राक्षसाचें विधिपूर्वक दहन केलें. राक्षस असला तरी पित्याच्या मायेनें त्यानें आपला प्रतिपाळ केला, असें म्हणून त्या मुली रडूं लागल्या. त्यांची समजूत करून सर्वजण उडत्या घोड्या-वरून आपल्या राजधानींत येऊन पोंचलें. राजाराणीच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं.

लौकरच राजानें चांगला मुहूर्त पाहून युवराज वसंतास राज्याभिषेक केला. वसंत राजानें आपलें सैनिक पाठवून त्या दरोडेखोरांच्या टोळींतील सर्व दरोडेखोरांना अटक केली व गुहेंत त्यांनीं सांठविलेली अगणित संपत्ति राज्यांत आणली. राक्षसाच्या गुहेचाहि तपास करून हिरेमोत्यांनीं भरलेले अनेक रांजण त्यानें आपल्या खजिन्यांत जमा केले.

थोडयाच दिवसांत तिन्ही राजकन्यांचे विवाह अनुरूप राजपुत्रांशीं झाले. या विवाहसमारंभाला भिल्लांचा राजा आपल्या शेंकडों प्रजाजनांसह मुद्दाम आमंत्रणावरून आला होता.

वसंत राजानें आपल्या पराक्रमी व हुषार पत्नीच्या साह्यानें अनेक वर्षें राज्य करून प्रजेला भरपूर सुख दिलें.



# गुराख्याच्या पोराचें नशीब

# १ : हलक्या कानाचा राजा

एक होता राजा. वडिलांच्या पराक्रमामुळें आयत्या बिळांत बसणाऱ्या नागोबा-सारखें त्याला राज्य मिळालें होतें ! अंगांत शौर्य नव्हतें, धाडस नव्हतें व पराक्रमहि नव्हता. स्वतःच्या अंगांत कांहींच कर्तबगारी नसल्यामुळें हाताखालचे लोक सांगतील तसा वागायचा. कारभार करणाऱ्या मंत्र्यांपासून तो पंचांग पहाणाऱ्या भटजींपर्यंत कोणीहि, कांहींहि सांगितलें तरी त्यावर त्याचा विश्वास बसायचा. एवढ्या हलक्या कानांचा तो होता !

राजवाड्यापासून नजीकच एका पडक्या देवळाच्या ओसरींत एक म्हातारी विधवाबाई रहात होती. सारा दिवस मिळेल तें काम करूनहि तिला पोटभर खाण्याची पंचाईत पडे. तिचा एकुलता एक तरुण पोरगा रानांत गुरें चारण्याचें काम करी. घरांतील दारिद्र्यामुळें त्यानें लग्नहि केलें नव्हतें. आजूबाजूच्या श्रीमंत लोकांचीं गुरें रानांत चारायला न्यायचीं, चरणीवर गुरें सोडलीं कीं गुराख्यांबरोबर नाना प्रकारचे खेळ खेळायचे, म्हातारीनें दिलेला भाकरकांदा खाऊन पोटभर पाणी प्यायचें व सूर्य मावळतीला गेला कीं पुन्हा गुरें गोळा करून हाकीत हाकीत ज्या त्या घरीं पोंचतीं करायचीं, हा त्याचा रोजचा कार्यक्रम. यांतून जी मजुरी मिळे ती तो प्रामाणिकपणें म्हातारीजवळ आणून द्यायचा. कधीं काळीं आपलें नशीब उजळेल, अशी आशा करायलाहि त्याला जागा नव्हती !

कधीं कधीं त्याला वाटायचें कीं, नदीकांठी हिंडतांना एखादें भांडें आपल्या पायाला लागेल व भांड्यांतील राक्षस आपला गुलाम होईल ! कधीं वाटायचें रानांतल्या पडक्या देवळांतील देवी आपल्याला ' काय पाहिजे तो वर माग ' असें म्हणेल ! एखाद्या वेळीं त्याला वाटायचें कीं रानांतील एखादी परी, अप्सरा किंवा वनदेवी आपल्यावर भाळेल. अशी कांहीं किमया झाली तरच आपलें दारिद्र्य जाईल, एवढीच कल्पना या सगळ्या विचारामागें होती.

एका दिवशीं सारीं गुराख्यांचीं पोरें नदीच्या एका खोल डोहांतील संथ पाण्यावर भाकरी भाकरीचा खेळ खेळत होतीं. नदीकांठच्या दगड-गोट्यांतून एखादा चपटा दगड शोधून काढायचा व एकेका फेकींत पांच–पांच

सातसात भाकऱ्या पाडायच्या, अशी स्पर्धा चालली होती. असेच दगड शोधतां शोधतां त्या मुलाला एक रंगीत व चकचकीत दगड सांपडला! भाकरी पाडायला या दगडाचा उपयोग नव्हताच, तेव्हां त्यानें तो दगड आपल्या अंगरख्याच्या खिशांत ठेवून दिला व सायंकाळीं घरीं आल्यावर आपल्या लांकडी पेटींतील इतर अनेक सटरफटर निरुपयोगी वस्तूंच्या संग्रहांत तो दगड ठेवून दिला.

किती तरी दिवस तो दगड त्या अडगळींत पडून होता. एक दिवस सहजें त्यानें पेटी उघडून आपली दगडागोट्यांची दौलत बाहेर काढली! नवीन दगडावर चिखल-मातीचें पूट चढलें होतें म्हणून त्यानें तो दगड पाण्यानें धुतला. आणि काय आश्चर्य, त्याच्या प्रकाशानें त्याचे डोळे दिपून गेले! पडक्या भिंताडांना कुडाचीं ठिंगळें लावून बनवलेलें त्याचें घर. त्या उजेडानें ते जणूं उजळून निघालें! आतां घरांत दिव्यासाठीं तेलाचा खर्च करायला नको, या कल्पनेनें त्या मुलाला केवढा आनंद झाला! त्या म्हातारीच्या घरासमोरच एक वाणी राहत होता. म्हातारीच्या घरात पडलेला तो प्रकाश त्यानें पाहिला व चटकन् ओळखलें कीं तो प्रकाश अस्सल माणकाचा असला पाहिजे! या रत्नाची किंमत कांहीं लाख रुपये सहज असेल. कांहींहि प्रयत्न करून तें रत्न मिळवायचेंच, असा विचार करून तो वाणी सरळ त्या म्हातारी-कडे आला. मायलेक दोघेहि घरांत होतेच. वाण्यानें सांगितलें, " तो चकचकीत दगड मला दिलास तर वर्षभर पुरेल एवढे धान्य व मीठ-मसाला मी तुम्हांला देईन."

तो वाणी वेडा तर झाला नाहीं, असेंच क्षणभर त्या मायलेकांना वाटलें. पण कांहीं का असेना, हा सौदा कांहीं महाग नाहीं, असें समजून त्या दोघांनींहि लगेच संमति दिली.

वाण्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां दोन गाड्या भरून गहूं, तांदूळ, मीठ, मिरची, तेल वगैरे सामान पाठवून दिलें आणि तें रत्न आपल्या ताब्यांत घेतलें.

आतां तें रत्न वाण्याच्या बंद तिजोरींत मोठ्या बंदोबस्तांत जाऊन बसलें. त्या म्हातारीला व तिच्या मुलाला दररोज पोटभर जेवण मिळूं लागलें व थोड्याच दिवसांत त्या चकचकीत खड्याबद्दल त्यांना आठवणहि येईनाशी झाली.

यानंतर कांहीं महिन्यांनीं लक्ष्मीपूजनाचा दिवस आला. घरांतील द्रव्य, सोनें, अलंकार वगैरेंची पूजा त्या दिवशीं करण्याची प्रथा त्या वाण्याकडे होती. त्याप्रमाणें वाण्यानें रात्रीं पूजेसाठीं तें रत्न तिजोरींतून बाहेर काढलें. समयांच्या मंद प्रकाशांत रत्नाचा मोहक प्रकाश मिसळला व वाण्याच्या घराचा दिवाणखाना एका आगळ्याच प्रकाशानें शोभिवंत दिसूं लागला. ज्याचें त्याचें लक्ष वाण्याच्या घराकडे जात होतें. राजवाड्यांतील लक्ष्मीपूजन चालू असतांना राजाचें लक्ष दूरवर वाण्याच्या खिडकींतून दिसणाऱ्या त्या विलोभनीय प्रकाशाकडे गेलें व तो कसला प्रकाश आहे हें पाहून येण्यास त्यानें प्रधानास सांगितलें. थोड्याच वेळांत प्रधानानें माहिती आणली कीं वाण्याकडे एक माणिक असून त्या माणकाचाच तो प्रकाश आहे !

राजवाड्यांत लक्ष्मीपूजनाचा मंत्र सांगण्यासाठीं आलेला भटजी जवळच उभा होता. अत्यंत मत्सरी, हेवेखोर व स्वभावानें दुष्ट असा हा ब्राह्मण होता ! परंतु त्याच्या वेदाभ्यासावर व ज्योतिषावर राजाचा मोठा विश्वास होता. भटजीनें राजास सांगितलें, “ महाराज, एवढें तेजस्वी रत्न वाण्याकडे कुठून येणार ? त्यानें नक्की चोरूनच आणलें असलें पाहिजे. अशा मालावर राजाचीच सत्ता असते. शिवाय एवढ्या मौल्यवान रत्नाची पूजा करण्याचा अधिकार राजाचाच असला पाहिजे. राज्यांतील सर्वांत उत्कृष्ट रत्नें हीं राजाच्या खजिन्यांतच शोभून दिसतात. वाण्याला बोलावून तें रत्न आपल्या ताब्यांत घ्यावें. ”

राजाला ब्राह्मणाचें बोलणें पटलें. त्यानें वाण्याकडे शिपाई पाठवून त्याला रत्नासहित राजवाड्यांत येण्याबद्दल फर्मावलें. गर्भगळित होऊन वाणी राजवाड्यांत आला व राजाच्या पायाजवळ तें रत्न ठेवून थरथर कांपत उभा राहिला ! वाण्यानें प्रांजळपणानें सांगितलें, “ मला तें रत्न त्या म्हातारीच्या खोलींत दिसलें. वर्षभर पुरेल एवढें संसाराचें सामान देऊन मी त्या म्हातारीकडून व तिच्या लेकाकडून तें घेतलें ! ”

राजानें तें रत्न ठेवून घेतलें व वाण्याला घरीं जाण्यास सांगितलें. लगेच त्या म्हातारीला व तिच्या मुलाला राजानें बोलावणें पाठवलें. गुराख्याच्या पोरानें आपल्याला तो दगड नदीकांठी कसा सांपडला, त्यानंतर तो घरीं आणून आपण तो कसा धुतला व त्याच्या प्रकाश पाहून वाण्यानें तो गाडीभर धान्य देऊन खरेदी कसा केला, ही सारी हकीकत सांगितली. वाणी व तो

गुराख्याचा पोर खरें बोलत असल्याची राजाला खात्री पटली व हें रत्न कोठून चोरून आणलेलें नाहीं व कुणाची त्यावर मालकीहि नाहीं, हेंहि राजाला समजून आलें.

भटजीनें तें रत्न पूजा करण्यासाठीं देवघरांत नेलें. कांहीं वेळानें पूजा आटोपून भटजी बाहेर आला व राजास सांगूं लागला, " या रत्नाची मीं आतांच कुंडली मांडली. हें रत्न कुणाचा तरी एकाचा बळी घेणार आहे. आजपासून एक वर्षाच्या आंत तो गुराख्याचा पोर, तो वाणी, मी किंवा खुद्द महाराज यांच्यापैकीं एकाला अपघाती मरण येणार! कोणत्याहि परिस्थितींत हें टाळतां येणार नाहीं. अशा स्थितींत आपल्यावरचा प्रसंग टाळावयाचा असेल तर कांहीं तरी करून त्या गुराखीपोरास अपघाती मृत्यु येईल असें केलें पाहिजे. "

भटजीवर राजाचा एवढा विश्वास होता कीं त्याला हें म्हणणें एकदम पटलें. आतां या संकटांतून भटजीच आपल्याला पार करूं शकतील अशी राजाची खात्री होती. म्हणून यापुढें भटजी सांगतील तसें करावयाचें असें राजानें ठरवलें व भटजीस तसें सांगूनहि टाकलें. मग राजानें व त्या ब्राह्मणानें पुढें काय करावयाचें याचे बेत ठरवले. दुसऱ्या दिवशीं सकाळींच राजानें त्या गुराखी पोरास बोलावून घेतलें. व धमकावलें, " ह्या रत्नाची खाण तुला माहीत आहे. तिथून आणखी अशींच पांच रत्नें एका महिन्याच्या आंत घेऊन ये. नाहींतर तुझा शिरच्छेद करण्यांत येईल ! "

पोरगा भीतीनें अर्धमेला होऊनच घरीं परतला. रडत रडत त्यानें सर्व हकीकत म्हातारीला सांगितली. पुन्हां पांच माणकें मिळणें शक्यच नव्हतें. मरण टाळावयाचें असेल तर माणकें शोधण्याच्या निमित्तानें घराबाहेर पडावयाचें व पुन्हां त्या राज्यांत कधींच यावयाचें नाहीं, हा एकच मार्ग होता. जीव वांचावा म्हणून मनुष्य वाटेल तो धोका पत्करण्यास तयार होतो. म्हातारीला मुलाचा विचार पटला. तिनें भरपूर शिदोरी बरोबर देऊन पहाटे होण्याच्या आंतच भरलेल्या डोळ्यांनीं त्याला पोराला निरोप दिला.

## २ : भटजींचें कारस्थान

बरेच दिवस रानावनांतून तो गुराखी पुढें पुढें चालला होता. जंगली जनावरांच्या भीतीपेक्षां राजाची भीतिच त्याला जास्त वाटत होती !

त्या निबिड अरण्यांत दूर अंतरावर त्याला एका राजवाड्याचे कळस दिसले. साहाजिकच त्या राजवाड्याच्या दिशेनें त्यानें आपलीं पावलें वळवलीं.

त्या राजवाड्यांत एक सुंदर मुलगी रहात होती. कुणालाहि वाटावें कीं ती एखादी राजकन्याच असावी !

पूर्वीं ती स्वर्गांत रहाणारी एक परी होती. परंतु देवाच्या शापानें तिला व तिच्या तीन बहिणींना पृथ्वीवर यावें लागलें होतें. स्वर्ग सोडून पृथ्वीवर यावयाचें म्हणजे केवढ्या यातना ! त्या चौघींनीं देवाची अनन्यभावें प्रार्थना केल्यावर देवानें त्यांना उःशाप दिला कीं, जो पहिला पुरुष तुमच्या दृष्टीस पडेल त्याच्याशीं लग्न लावा; म्हणजे पुढील जन्मीं पुन्हां अप्सरा होऊन स्वर्गांत याल.

त्या मुलीनें राजवाड्याच्या गच्चीवरून ह्या गुराख्याच्या पोराला येतांना पाहिलें. तिच्या दृष्टीस पडणारा हा पहिलाच पुरुष ! तिनें आपल्या दासींना त्याला वर घेऊन येण्यासाठीं पाठविलें. त्याला हातपाय धुण्यास गरम पाणी दिलें, अभ्यंगस्नान घातलें, भरजरी पोषाख दिला व जेवणासाठीं पंचपक्वान्नांचा बेत केला !

आपलें एवढें आदरातिथ्य करणारी ही राजकन्या आहे तरी कोण, हेंच त्या पोरास कळेना ! जेवणानंतर राजकन्येनें गुराख्याला विडा दिला व सांगितलें, " जो पहिला पुरुष दिसेल त्याच्याशीं मी लग्न करण्याचें ठरवलें होतें त्याप्रमाणें मी आतां तुमच्याशीं लग्न करणार आहें. "

हें म्हणावयाचीच खोटी– तिच्या दासींनीं लग्नाची सर्व तयारी केली. सायंकाळ होण्याच्या आंतच गुराख्याचा पोर राजकन्येचें वैभव भोगणाऱ्या एका परीचा पति झाला !

दिवसांमागून दिवस जात होते. एवढ्या सुखांत असूनहि तो पोर फारसा आनंदी दिसायचा नाहीं. केव्हां केव्हां तर अश्रु गाळतांनाहि त्याला त्याच्या बायकोनें पाहिलें होतें. एक दिवस तिनें त्याला सरळच विचारलें.

गुराख्याच्या पोरानें सांगितलें, "मला वाटतें, मीं एवढ्या वैभवांत आहें. हें कसेंहि करून आईला कळवलें तर तिच्या जीवाला समाधान तरी लाभेल." पण घरीं जाण्यांत काय धोका आहे हेंहि त्यानें तिला सांगितलें व राजानें आणावयास सांगितलेल्या पांच रत्नांची इत्थंभूत हकीकत तिला निवेदन केली. केव्हांतरी राजदूत आपला तपास करीत येथवर येतील व आपणांस पकडून राजापुढें उभे करतील व रत्नें मिळालीं नाहींत म्हणून राजा आपला शिरच्छेद करील, अशी भीति वाटत असल्याचेंहि गुराख्याच्या पोरानें सांगितलें.

हें सर्व ऐकून ती राजकन्या म्हणाली, "हात्तीच्या, एवढेंच ना! मी पूर्वजन्मींची परी आहें. त्यामुळें मला हव्या त्या गोष्टी निर्माण करतां येतात! ती समोरच्या कोनाडयांतील सुरी घेऊन माझ्या मानेवर फिरव. मानेंत तुला रत्नें दिसतील. त्यांतील हवीं तीं पांच रत्नें काढून घे व पुन्हां तीच सुरी उलटी फिरव कीं मान पूर्ववत् होईल!"

गुराख्याच्या पोरानें भीतभीतच राजकन्येच्या मानेवर सुरी फिरवली. मानेला मोठी चीर पडली आणि आंतील तेजस्वी रत्नें दिसूं लागलीं. पांच रत्नें त्यानें काढून घेतलीं. व मानेवर पुन्हां उलटी सुरी फिरवतांच मान पूर्ववत् झाली.

रत्नें हातीं येतांच, "आईला भेटून व राजाला रत्नें देऊन परत येतों" असें त्या पोरानें सांगितलें. तेव्हां ती राजकन्या म्हणाली, "मलाहि आतां या जंगलांत रहाण्याचा कंटाळा आला आहे. मीहि तुमच्या झोंपडींत राहून तुमच्या आईची सेवा करीन."

गुराख्याला खूपच बरें वाटलें. तो आपल्या पत्नीला घेऊन एक दिवस अचानकपणें आपल्या पडक्या घरांत येऊन दाखल झाला! दोघांनींहि म्हातारीला नमस्कार केला व पोरानें म्हातारीसाठीं सून आणल्याचें सांगितलें. पण म्हातारीला आनंद होण्याऐवजीं तिच्या चेहऱ्यावर उद्विग्नताच पसरली. डोळ्यांत आसवें आणून ती म्हणाली, "बाळांनो आलांत तसेंच लगोलग कुठें तरी निघून जा! देव तुम्हांला उदंड आयुष्य देईल! राजाचे शिपाई रोज तुझी चौकशी करतात. राजाचा बामण म्हणाला होता कीं तुला आतां फांशीं द्यायचें आहे!"

पोरानें चटकन् आईला सांगितलें, "आई, घाबरूं नको. ही माझी बायको म्हणजे एक श्रीमंत राजकन्या आहे व तिनें मजजवळ राजाला देण्यासाठीं पांच रत्नें दिलीं आहेत!"

दुसऱ्या दिवशीं सकाळींच तो गुराख्याचा पोर रत्नें घेऊन राजवाड्यांत गेला. एका सुंदर मुलीला बरोबर घेऊन तो पोरगा घरीं परतल्याची बातमी त्यापूर्वींच राजाला व भटजीला कळली होती. पोराचा शिरच्छेद केला कीं ती सुंदर मुलगीहि राजालाच मिळेल, असा बेत भटानें अगोदरच योजून ठेवला होता. परंतु तीं पांच देदीप्यमान रत्नें पाहून भटाचा चेहरा खर्रकन् उतरला ! हा गुराख्याचा पोर मेला नाहीं तर न जाणो ती पाळी आपल्यावर यायची, म्हणून भटजीनें आणखी एक युक्ति शोधून काढली व त्याप्रमाणें त्यानें राजाला कानमंत्र दिला.

राजानें गुराख्याच्या पोराला सांगितलें, " मला कांहीं यज्ञकर्मासाठीं जंगली हत्तीणीचें दूध हवें आहे. एक महिन्याच्या आंत हत्तीणीचें दूध आणून दे नाहीं तर तुझा शिरच्छेद होईल. "

गुराखी पुन्हां उदास होऊन हिरमुसल्या तोंडानें आपल्या घरीं आला. राजकन्येनें त्याला चेहरा उतरण्याचें कारण विचारलें. गुराखी म्हणाला, " राजानें एक महिन्याच्या आंत रानटी हत्तीणीचें दूध मागितलें आहे. तें जर आणलें नाहीं तर राजा माझा शिरच्छेद करील ! "

राजकन्येनें सांगितलें, " कांहीं काळजी करूं नको. पूर्वेकडील सात डोंगर ओलांडून जा. पलीकडे एक सरोवर आहे. त्याच्या कांठावर एक वडाचें झाड आहे. त्या झाडावर जाऊन चढून बस. रात्र झाली कीं तेथें एक हत्तींचा कळप येईल. ते जंगली हत्ती त्या झाडाला धडका मारतील पण न घाबरतां घट्ट धरून बस. थोड्या वेळानें तो कळप निघून जाईल व एक मस्त हत्तीण येईल. ती हत्तीण तेथेंच थांबेल. थोड्याच वेळांत त्या हत्तीणीच्या कानांतून एक मुलगी बाहेर येईल. सरोवराच्या कांठची रेती एका सुपांत घेऊन ती पाखडीत बसेल. मी तुझ्याजवळ चिठ्ठी देते ती त्या झाडावरून हलकेंच खालीं सुपांत टाक म्हणजे तुझें काम होईल. "

गुराखी त्याप्रमाणें पूर्वेकडे सात डोंगर ओलांडून गेला. तेथें एका सरोवराच्या कांठावर त्याला वडाचें झाड दिसलें. त्यावर तो चढून रात्र होण्याची वाट पहात बसला. रात्र पडतांच हत्तींचा एक कळप आला. त्यांनीं त्या झाडावर टकरा मारून तें झाड गदगदां हलवलें. पारंब्यांचा बळकट आधार घेऊन गुराखी घट्ट बसून होता !

हत्तींचा कळप निघून गेल्यावर एक प्रचंड, मोठी व मस्त हत्तीण त्या झाडाखालीं येऊन उभी राहिली. थोड्या वेळानें एक सुंदर मुलगी त्या हत्तीणीच्या कानांतून बाहेर आली व एका सुपलींत रेती पाखडूं लागली. गुराख्यानें लगेंच आपल्याजवळील चिठ्ठी सुपांत टाकून दिली. त्या मुलीनें चिठ्ठी वाचली व आनंदानें नाचूं लागली ! माझ्या बहिणीनें माझ्यासाठीं नवरा पाठवला आहे, असें म्हणून हत्तीणीच्या सोंडेला धरून ती हत्तीणीच्या पाठीवर चढली व झाडावरून गुराख्याच्या पोराला हलकेंच उतरून घेतलें. रानफुलांची माळ करून तिनें ती त्याच्या गळ्यांत घातली व लग्नाचा विधि उरकला !

दोघेहि हत्तीणीवर बसूनच राजधानींतील गुराख्याच्या घरीं आलें. बहिणीबहिणींची भेट झाली. नंतर हत्तीण घेऊन गुराखी राजवाड्यांत गेला व राजेसाहेबांना निरोप पाठविला कीं, जंगली हत्तीण घेऊनच मीं आलों आहें. तेव्हां हवें तेवढें दूध काढून घ्यावें.

भटजीबुवांना एव्हांना समजलें होतेंच कीं, गुराख्याच्या पोरानें आणखी एक सुंदर मुलगी मिळवली आहे व बरोबर एक मस्त हत्तीणहि आणली आहे ! हें काय गौडबंगाल आहे, हेंच त्याला कळेना. पण कांहींहि करून या पोराला मारलें नाहीं तर आपली धडगत नाहीं असें त्याला पक्के ठाऊक होतें. त्यानें पुन्हां राजाला कांहींतरी सल्ला दिला व राजानें गुराख्यास फर्मावलें, " आणखी एका महिन्यांत वाघिणीचें दूध आण; तें आणलेंस तर तुला अर्धें राज्य देईन, न आणलेंस तर तुझा शिरच्छेद करीन.

गुराख्याचा पोर पुन्हां हिरमुसला होऊन रडक्या चेहऱ्यानें घरीं परतला. त्याच्या दोन्ही बायकांनीं कारण विचारलें. गुराख्यानें सांगितलें, " राजाला वाघिणीचें दूध हवें आहे ! "

हें ऐकतांच त्याची नवी बायको म्हणाली, " हात्तेच्या, एवढेंच ना ! कांहीं काळजी करूं नका. पश्चिमेकडील सात डोंगर ओलांडून जा. पलिकडे एक सरोवर आहे. त्याच्या कांठावर एक पिंपळाचें झाड आहे. त्या झाडावर जाऊन चढून बसा. रात्र झाली कीं तेथें वाघच वाघ एकामागोमाग एक असे येतील. झाडांच्या फांद्यांपर्यंत ते उंच उंच उड्या मारतील. पण न घाबरतां घट्ट धरून बसा. सर्व वाघ निघून गेल्यावर एक मस्त वाघीण येईल व तेथेंच थांबेल. त्या वाघिणीच्या कानांतून एक मुलगी बाहेर येईल. सरोवराकांठची

रेती एका सुपांत घेऊन ती पाखडीत बसेल. मी तुमच्याजवळ चिट्ठी देतें ती त्या झाडावरून हलकेंच खालीं सुपांत टाका. म्हणजे तुमचें काम होईल!"

गुराखी मुलगा त्याप्रमाणें सात डोंगर ओलांडून सरोवराकांठीं आला. तेथें त्याला पिंपळाचें झाड दिसलें. त्यावर तो चढला व रात्र होण्याची वाट पहात बसला. रात्र पडतांच एकामागोमाग एक असे कितीतरी वाघ तेथें आले. झाडाच्या फांद्यांपर्यंत त्यांनीं उड्या मारल्या व ते सर्व निघून गेले. फांद्यांना घट्ट पकडून गुराखी गुपचूप बसून होता. सर्व वाघ निघून गेल्यावर एक प्रचंड मोठी व मस्त वाघीण त्या झाडाखालीं येऊन उभी राहिली. थोड्या वेळानें एक सुंदर मुलगी त्या वाघिणीच्या कानांतून बाहेर आली व एका सुपलींत रेती पाखडूं लागली. गुराख्यानें लगेच आपल्याजवळील चिट्ठी सुपांत टाकून दिली. त्या मुलीनें ती वाचली व आनंदानें वाचूं लागली. "माझ्या वहिणीनें माझ्यासाठीं नवरा पाठविला आहे!" असें म्हणून वाघिणीच्या पाठीवर चढून तिनें त्या गुराख्याच्या पोराला हलकेंच उतरून घेतलें. रानफुलांची माळ करून तिनें त्याच्या गळ्यांत घातली व अशा रीतीनें लग्नाचा विधि उरकला!

दोघेहि वाघिणीवर बसूनच राजधानींतील गुराख्याच्या घरीं आले. वहिणी-वहिणींची भेट झाली. नंतर वाघीण घेऊन गुराखी राजवाड्यांत गेला. राजेसाहेबांना निरोप पाठवला, "मी वाघीण घेऊनच आलों आहें, तेव्हां हवें तेवढें दूध काढून घ्यावें!"

राजवाड्यांतील सर्वांचीच भीतीनें गाळण उडाली. भटजी तर देवघरांतच लपून बसला! तेथूनच त्यानें गुराख्यास फर्मावलें, "तूंच दूध काढून दे."

गुराख्यानें चांगलें तांब्याभर दूध काढून दिलें व वाघीण घेऊन तो निघून गेला.

## ३ : भटजींचा निकाल !

गुराखी वाघीण घेऊन गेल्याची खात्री झाल्यावर भटजीबुवा देवघरांतून बाहेर आले. एकापेक्षां एक सुंदर अशा तीन मुली गुराख्याला मिळाल्या होत्या. शिवाय त्यानें सर्व कामें विनतक्रार केल्यामुळें त्याला शिक्षा देण्यास कांहीं कारणहि उरलें नव्हतें. राजेसाहेबांनीं तर अर्धें राज्य कबूल केलेलें ! अशा स्थितींत गुराख्याच्या पोराचा कांटा कसा काढायचा, हा भटजींपुढें प्रश्न पडला. शेवटीं बराच विचार करून त्यानें एक नवीनच युक्ति शोधून काढली व राजास सांगितली. आतां मात्र गुराख्याचा मृत्यु अटळ आहे अशी भटजींची खात्री होती. भटजीनें राजाला सांगितलें, " काल रात्रीं महाराजांच्या वडिलांनीं मला दृष्टान्त दिला. स्वर्गामध्यें आपले वडील एका असाध्य रोगानें आजारी आहेत. त्यांना असह्य वेदना होत आहेत. त्या रोगावर वाघिणीचें दूध हा एकच उपाय आहे. पण स्वर्गांत तें मिळत नाहीं. पृथ्वीवरून कोणाबरोबर तरी तें वर पाठवलें तर आपले पूज्य पिताजी रोगमुक्त होतील ! "

राजानें विचारलें, " स्वर्गांत कोण व कसें जाणार? "

भटजी म्हणाले, " समुद्राच्या मध्यभागीं, पाण्याखालीं एक भुयार आहे. त्या भुयारांतून स्वर्गांत जाण्याची वाट आहे. या गुराख्याच्या पोराजवळच एका बंद भांड्यांत वाघिणीचें दूध द्यायचें. त्याला एका पेटींत बंद करावयाचें व समुद्रांत बरोबर भुयाराच्या तोंडाशीं ती पेटी नेऊन सोडून द्यायची. मला तें ठिकाण बरोबर माहीत असल्यामुळें ही सर्व व्यवस्था मी करीन. "

राजाला भटजींचें म्हणणें पटलें.

त्याप्रमाणें राजानें गुराख्यास सांगितलें, " उद्यां राजवाड्यावर ये. वाघिणीचें दूध घेऊन स्वर्गांतील माझ्या वडलांना तें नेऊन द्यायचें आहे. आपल्या भटजींना स्वर्गाचा दरवाजा माहीत आहे. समुद्राच्या तळाला एक भुयार आहे. तेथून स्वर्गाची वाट आहे. तेथपर्यंत भटजी बरोबर येतील. तूं दूध घेऊन स्वर्गांत जा व चार दिवस राहून परत ये ! परत येतांच तुला कबूल केल्याप्रमाणें अर्धें राज्यहि मिळेल. "

आतां मात्र आपल्याला ठार मारण्याचें कारस्थान सुरू असून त्यामागें मुख्य सूत्रधार भटजी हाच आहे, हें गुराख्याच्या लक्षांत आलें. उद्यांच्या

प्रसंगांतून जर आपण निभावून गेलों तर या भटजींचा प्रथम निकाल लावला पाहिजे, असें त्यानें मनाशीं ठरविलें. परंतु दुसऱ्या दिवसाच्या प्रसंगांतून कसें सुटायचें हा प्रश्नच होता.

पुन्हां एकदां हिरमुसल्या तोंडानें तो घरीं गेला. त्याच्या तिन्ही बायकांनीं त्याला कारण विचारलें. गुराख्यानें सर्व हकीकत सांगून यामागें भटजींचें कारस्थान कसें आहे व या प्रसंगांतून बचावल्यास प्रथम या भटजीला नामशेष करणें किती आवश्यक आहे तें त्यानें सांगितलें.

गुराख्याच्या तिसऱ्या बायकोनें आतां त्याला वांचविण्याची जबाबदारी घेतली. तिनें गुराख्यास दुसऱ्या दिवशीं निर्धास्तपणें राजवाड्यांत जाण्यास सांगितलें. पहांट होण्यापूर्वींच ती एकटीच समुद्रावर गेली व एका खडकावर उभी राहून मोठ्यानें म्हणाली, " ताई, अग ताई, आम्हां तिघींचीं लग्नें झालीं. आतां तुझ्यासाठींहि मी नवरा पाहिला आहे. उद्यां सकाळीं राजाचे शिपाई भटजीला घेऊन समुद्रावर येतील व एक पेटी समुद्रांत टाकतील. या पेटींत तुझा नवरा असेल ! "

एवढें बोलून ती घरीं आली व सर्व व्यवस्था झाली आहे असें तिनें गुराख्यास सांगितलें.

सकाळींच गुराखी राजवाड्यांत गेला. त्याच्याजवळ दुधाचें भांडें देऊन भटजीनें आपल्या हातानें त्याला एका पेटींत बंद केलें व लगेच एका होडींत ती पेटी ठेवून समुद्रकिनाऱ्यापासून खूप दूर जाऊन ती पेटी त्यानें समुद्रांत फेकून दिली. आतां हा पोरगा निश्चित मेला अशा आनंदांत भटजीबुवा राजवाड्यांत परतले !

समुद्रांत पेटी पडतांच एका मोठ्या कासवानें ती पेटी आपल्या पाठीवर झेलली व लगबगीनें नजीकच्या एका बेटावर ती तें घेऊन गेलें. पेटी खालीं ठेवतांच कासवाच्या तोंडांतून एक सुंदर मुलगी बाहेर आली व तिनें पेटी उघडून गुराख्याला बाहेर काढलें. त्या बेटावरच तिनें त्याच्याशीं लग्न लावलें व तीं दोघेंहि गुराख्याच्या झोपडींत परत आलीं.

देवाच्या शापानें वेगवेगळ्या ठिकाणीं पडलेल्या चारी वहिणी आतां एकत्र आल्या. आतां भटजींची निकाल कसा लावायचा हा प्रश्न होता. त्या

चौधी मुली, तो गुराखी व त्याची म्हातारी आई या सर्वांनीं एकत्र बसून कांहीं विचार केला व दोन दिवसांनीं गुराख्याचा पोर राजवाड्याकडे रवाना झाला !

गुराखी आणखी एक सुंदर मुलगी घेऊन समुद्रांतून सुखरूप घरीं आला असल्याची वार्ता भटजींच्या कानांवर गेली होतीच. एवढ्यांत तो गुराख्याचा पोरच राजवाड्याकडे येतांना पाहून भटजी आतां काय करावें या विचारांत पडला. भटजींकडे संपूर्ण दुर्लक्ष करून गुराख्यानें राजाची भेट मागितली. राजेसाहेब उत्सुकतेनें बाहेर आले. गुराख्यानें मुजरा करून सांगितलें, " महाराज, आपल्या वडिलांना वाघिणीचें दूध नेऊन दिलें. महाराज, त्या औषधाचा गुण अजब खराच ! एक घोटभर दूध पितांच त्यांच्या सर्व वेदना थांबल्या व ते खडखडीत बरे झाले. पण त्यांच्यापुढें आतां एक अडचण उभी आहे. "

राजेसाहेबांनीं अधीरतेनें विचारलें, " कोणती अडचण ? काय वाटेल तें करून वडिलांची अडचण दूर करणें हें पुत्राचें कर्तव्यच आहे ! "

गुराखी म्हणाला, " स्वर्गस्थ महाराजांनीं बरे होण्यासाठीं एक पूजेचा नवस केला होता. पण पूजा सांगण्यासाठीं स्वर्गांत भटजीच नाहींत ! तेव्हां त्यांनीं एका दिवसासाठीं आपल्या पुरोहितांना बोलावलें आहे. भटजींना स्वर्गाची वाट माहीत आहेच, व मीहि आतां ती पाहून आलों आहें. तेव्हां मी स्वतःच भटजींना स्वर्गाच्या वाटेवर नेऊन सोडीन. "


भटजींना स्वर्गाच्या प्रवासाच्या तयारींत राहण्याचा हुकूम लागलीच राजेसाहेबांनीं दिला. भटजींपुढें मोठा पेंचच होता. ' नाहीं ' सांगावें तर राजेसाहेब शिरच्छेद करतील. पृथ्वीवरील, लोकांना मेल्याखेरीज स्वर्ग दिसत नाहीं असें सांगावें तर आपणच गुराख्याच्या पोराला स्वर्गांत पाठविलें होतें व तो जाऊन आल्याचें स्वतःच सांगत आहे ! शेवटीं त्या रत्नाच्या पायगुणानें आपल्यालाच मृत्यु येणार हें जर ठरलेलेंच असेल तर यांतून आपण सुटणें शक्य नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें.

भटजी कांहींहि न बोलतां गप्प उभे आहेत हे पाहतांच राजाने आपल्या सेवकांना भटजींना पेटींत बंद करण्याची आज्ञा दिली व लगेच ती

बंद पेटी गुराख्याच्या ताब्यांत देण्यांत आली. यानंतर भटजीबुवांची रवानगी राजेसाहेबांच्या खास नौकेंतून समुद्रांत जेथें स्वर्गाचें दार होतें तेथें झाली !

गुराख्याच्या पोरानें स्वतः आपल्या हातानें ती पेटी समुद्रांत सोडली. आपल्या एका दुष्ट वैऱ्याची कायमची खोड मोडली, अशा आनंदांत तो घरीं परतला !

यानंतर चारहि बायकांना बरोबर घेऊन आपल्या म्हाताऱ्या आईसह त्या गुराख्यानें त्या मूर्ख राजाचें राज्य सोडलें व दुसऱ्या एका बेटावर आपलें स्वतःचें राज्य स्थापून चार राण्यांसह सुखानें राज्यकारभार केला.



मोत्यांचीं कणसें

## १ : चतुर प्रधानकन्या

एक होता राजा. त्याला एकुलता एक मुलगा होता. लहानपणापासून राजानें त्याला शिक्षण देण्याचा खूप प्रयत्न केला. पण तो बुद्धीनें इतका मंद होता कीं, कोणत्याच विषयांत त्याची प्रगति होईना. वयांत आला तरी त्याच्या बुद्धीची मजल फारशी पुढें गेली नाहीं. केवळ राजाचाच मुलगा म्हणून त्याचे लाड होत होते. साऱ्या दिवसभर गांवांत घोड्यावरून हिंडायचें, खेळतमाशे पहायचे एवढाच त्याचा रोजचा कार्यक्रम! राजधानींतील लोकसुद्धां आपापसांत कुजबुजायचे "राजाचा मुलगा निर्बुद्ध नंदीबैल आहे!" पण राजपुत्राला आपल्या बुद्धीची मोठीच घमेंड होती. मी म्हणेन तें झालेंच पाहिजे, असें त्यास वाटायचें. एकुलता एक मुलगा व राज्याचा वारस म्हणून राजाहि त्याचे लाड पुरवायचा.

राजाच्या प्रधानाची एक स्वरूपसुंदर मुलगी होती. ती जेवढी देखणी तेवढीच बुद्धिमान होती. अत्यंत सालस, नम्र, कष्टाळू व तेजस्वी म्हणून सारी राजधानी तिला ओळखत असे. ही प्रधानकन्या आपली बायको व्हावी, असें राजपुत्राच्या मनांत नेहमीं यायचें. राजपुत्र मधूनमधून तिला भेटून तिच्याशीं बोलण्याचा प्रयत्न करी. पण त्याचा मुळींसुद्धां अपमान न करतां ती त्याला नेमकें टाळीत असे.

एक दिवस राजपुत्रानें आपल्या वडिलांना सांगितलें कीं, प्रधानकन्येशीं आपल्याला लग्न करावयाचें आहे व कांहींहि झालें तरी ती आपणांस मिळालीच पाहिजे.

राजानें प्रधानास हें सांगितलें. प्रधान म्हणाला, "मुलगी मोठी झाली आहे. तिचें तिला कळूं लागलें आहे. तेव्हां तिचें लग्न तिच्या संमतीनेंच व्हावयास हवें. मी तिला विचारतों आणि उद्यां आपणांस कळवतों."

राजाला वाटलें कोणती मुलगी राजाची सून होण्यास व राज्याची भावी राणी होण्यास नकार देईल! उद्यां आपणास प्रधानाचें होकारार्थी उत्तर येणार हें ठरलेलें आहे. प्रधानाला त्यानें जाण्यास अनुमति दिली व दुसऱ्या दिवशीं येऊन भेटण्यास सांगितलें.

प्रधानाला माहीत होतें कीं, आपली मुलगी केवळ राज्याच्या लोभानें या निर्बुद्ध राजपुत्राशीं लग्न करण्यास तयार होणार नाहीं. परंतु राजाला नकार दिला तर त्याचे किती घोर परिणाम होतील याचीहि जाणीव त्याला होती. अतिशय दुःखी अंतःकरणानें तो घरीं परतला. त्याचा उतरलेला चेहरा पाहून मुलीनेंच त्याला त्याच्या दुःखाचें कारण विचारलें.

राजपुत्रासाठीं राजानें तिला मागणी घातली असल्याचें प्रधानानें सांगितलें. मुलीनें तावडतोब या मागणीस नकार दिला. या नकारामुळें किती भयंकर परिणाम होतील याची कल्पना प्रधानानें तिला दिली. परंतु त्या हुषार व धीट मुलीनें प्रधानाला धीर दिला.

" केवळ संकटांना भिऊन एखाद्या निर्बुद्ध नंदीबैलाबरोबर कायमचें बांधलें जाण्यापेक्षां धैर्यानें संकटाला तोंड देऊन प्रसंगीं मरण पत्करणेंहि आपल्याला पसंत आहे. " असें बाणेदार उत्तर देऊन आपल्या पित्यास राजाकडे जाऊन आपला नकार कळविण्यास तिनें सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं प्रधानानें राजाला भेटून सांगितलें, " राजपुत्राशीं लग्न करण्यास मुलगी तयार नाहीं. तिला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तिच्या मनाविरुद्ध कांहीं करावें हें बरें नाहीं. महाराजांनीं क्षमा करावी. "

राजा कांहींच बोलला नाहीं. प्रधान गेल्यावर राजानें मुलास बोलावून घेतलें व प्रधानाचा निरोप त्यास सांगितला. कांहींतरी करून ही मुलगी मिळवलीच पाहिजे असें सांगून राजपुत्र राजास म्हणाला, " आपण त्या मुलीला कांहीं अटी घालूं या. त्या तिनें पूर्ण केल्या तर ठीक. नाहींतर तिनें माझ्याबरोबर लग्न तरी केलें पाहिजे नाहींतर स्वतःच्या डोळ्यांदेखत आपल्या बापाचा शिरच्छेद तरी पाहिला पाहिजे ! "

राजाला ही मसलत पसंत पडली. राजपुत्रानें आपल्या सुपीक मेंदूतून एक शक्कल काढली. " आठ दिवसांच्या आंत प्रधानानें एक उलट्या कळसाचें मंदिर बांधून द्यावें. तें न झालें तर आपल्या मुलीचें लग्न राजपुत्राबरोबर लावावें अथवा मरणास तयार व्हावें ! "

प्रधानाकडे हा निरोप पोंचता झाला.

मुलगी राजपुत्राशीं लग्न करण्यास तयार झाली नाहीं तर आपल्या प्राणाशीं गांठ आहे हें प्रधानानें जाणलें. ' उलट्या कळसाचें मंदिर ' ही एक अशक्य गोष्ट होती. तथापि, मुलीनें आपल्या बापाला धीर देऊन सांगितलें, " कांहीं काळजी करूं नका. मी त्याचा बंदोबस्त करीन. "

चार दिवसांनंतर ती प्रधानकन्या एक पोतें भरून वाटाणे व एक माप घेऊन शेताच्या कडेला जाऊन बसली. राजपुत्राचा तो रोजचा जाण्यायेण्याचा रस्ता होता. राजपुत्र लांबून येतांना दिसतांच तिनें तें माप उलटें ठेवलें व त्यांत वाटाणे भरण्यास सुरुवात केली ! हें पाहून राजपुत्र तेथें थांबला. व खो खो हसूं लागला. त्याच्याकडे लक्ष न देतां प्रधानकन्येचें काम चालूंच होतें. अखेर राजपुत्र म्हणाला, " प्रधानजींची हुषार मुलगी एवढी मूर्ख कधीं झाली ? उलट्या मापट्यांत कधीं दाणे भरतां येतील काय ? "

प्रधानकन्या चटकन् म्हणाली, " मी मूर्ख कीं या देशाचा राजा मूर्ख, याची आपणच चौकशी करा. उलट्या कळसाचें देऊळ कुणीं पाहिलें आहे काय, हें राजेसाहेबांना विचारून पहा. "

राजपुत्र निरुत्तर होऊन घरीं आला व राजाला घडलेला प्रकार सांगितला. " ही अट बदलून आपण प्रधानाला दुसरी अट घालूं या. " असें सुचवून त्यानें सांगितलें कीं, " उद्यां प्रधानाला बोलावून घ्या व सांगा कीं पूर्वीची अट रद्द झाली आहे. आतां चार दिवसांत बैलाचें दूध घेऊन या ! "

राजपुत्राबरोबर आपला झालेला संवाद प्रधानाच्या मुलीनें आपल्या बापास सांगितला होताच. दुसऱ्या दिवशीं राजाकडील नवीन निरोप ऐकून आपल्या मुलीच्या बुद्धिमत्तेबद्दल त्याला अभिमानच वाटला, पण त्या बरोबरच नवीन कामगिरी ऐकून तो पुन्हां चिंताक्रान्त झाला !

प्रधानानें आपल्या मुलीला राजाची अट सांगितली. तिनें आपल्या वडिलांना पुन्हां धीर दिला व स्वस्थ रहाण्यास सांगितलें.

दोन दिवस गेल्यावर तिनें जुन्या कपड्यांचें एक गाठोडें बरोबर घेतलें व नदीकिनारीं जाऊन राजपुत्राच्या वाटेजवळ ती कपडे धूत बसली. राजपुत्र नेहमींप्रमाणें त्या बाजूनें आपला घोडा फेंकीत आलाच. प्रधानकन्या आज स्वतःच कपडे धूत आहे हे पाहून राजपुत्रानें घोडा थांबवला. विचारलें " हे जुने कपडे कसले धूत आहेस ? "

प्रधानकन्येनें चटकन् उत्तर दिलें, " माझे बाबा बाळंत झाले आहेत. त्यांचीं बाळंतीं मीं धुतें आहें ! "

राजपुत्र जोराजोरानें हंसूं लागला. या मुलीला बहुधा वेडच लागलें असावें असा त्यानें तर्क केला. तो तिला म्हणाला, " मला वाटतें तुला वेडच लागलें असावें. पुरुष कधीं बाळंत होतात काय ? "

प्रधानकन्या चटकन् म्हणाली, " मी वेडी कीं या देशाचा राजा वेडा, याची आपणच चौकशी करा. बैल कधीं दूध देतात काय, हें राजेसाहेबांना आपणच विचारा. "

राजपुत्र निरुत्तर होऊन घरीं आला व राजाला घडलेला प्रकार सांगितला. यापुढें अशी एखादी असाध्य अट घालण्याऐवजीं पृथ्वीवरीलच एखादी दुर्मिळ वस्तु आणण्याला सांगावें म्हणजे आपल्या पदरांत मूर्खपणाचें माप पडणार नाहीं व अखेर प्रधानाच्या मुलीला शरण यावें लागेल, असा त्या दोघांनीं विचार केला.

दुसऱ्या दिवशीं प्रधानास बोलावून राजानें पूर्वीची अट रद्द केल्याचें सांगितलें व त्याऐवजीं सहा महिन्यांच्या आंत मोत्यांचीं दोन कणसें आणून देण्याबद्दल फर्मावलें.

आतां मात्र प्रधानकन्येपुढें पेंच पडला. मोत्यांच्या कणसांबद्दल तिनेंहि ऐकलें होतें. कुणातरी राजाच्या राजवाडयाच्या खास बागेंत मोत्यांचीं कणसें आहेत एवढेंच तिला माहीत होतें. ती जशी बुद्धिमान होती तशी धीटहि होती. मोत्यांचीं कणसें शोधून काढण्याची जबाबदारी तिनेंच आपल्या अंगावर घेतली. आपल्या वडलांजवळून पुरेसें द्रव्य, प्रवासाची साधनसामग्री व एक चांगला घोडा घेऊन, पुरुषाचा वेष धारण करून ती घराबाहेर पडली.

## २ : वेष बदलून कणसांचा शोध

अरण्यामागून अरण्यें, शहरांमागून शहरें, व राज्यांमागून राज्यें मागें टाकीत प्रधानाच्या मुलीचा प्रवास चालू होता. असे तीन महिने निघून गेले. पण मोत्यांच्या कणसांचा तिला कुठेंच पत्ता लागेना. अखेर कांहींशी निराश होऊन पुढें काय करावें, याचा विचार करीत एका रानांत एका झाडाखालीं ती बसली असतां, गुरें चारणाऱ्या गुराख्यांमधील संवाद तिच्या कानावर पडला.

या जगांत सर्वांत श्रीमंत कोण, यावर त्यांच्यांत वाद चालला होता. " एका राजाच्या राज्यांत सोन्याच्या खाणी आहेत. तोच सर्वांत श्रीमंत असला पाहिजे. " असें एकजण म्हणत होता.

त्यावर दुसऱ्याचें म्हणणें होतें, " त्याच्या पलीकडील राज्यांत हिऱ्याच्या खाणी आहेत. सोन्यापेक्षां हिरा मौल्यवान् असल्यानें तो राजा अधिक श्रीमंत. "

तिसऱ्याचें म्हणणें होतें, " मोती नगरींतील राजाच्या शेतांत मोत्यांचीं कणसें होतात. दरवर्षी जो राजा मोत्यांचें पीक घेतो. तोच श्रीमंत असला पाहिजे ! "

प्रधानकन्येला हवी होती ती माहिती सहजगत्या मिळाली. तिनें त्या पोरांना जवळ बोलावून घेतलें, आपल्या पडशींतील उत्तम मिठाई त्यांना दिली व मोतीनगरीची मिळेल तेवढी माहिती घेऊन तिनें मोतीनगरीच्या दिशेनें आपला घोडा वळवला.

मोतीनगरींत पोंचतांच सरदाराचा वेष धारण करून तिनें एका धर्मशाळेंत तळ ठोकला. आपण एक सरदार असून जग पहाण्यासाठीं आपण बाहेर पडलों आहों, असा बहाणा तिनें केला. शहरांत फिरून तिनें त्याच नगरींत मोत्यांचीं कणसें असल्याची खात्री करून घेतली. परंतु राजाची ही मोतीबाग कुठें आहे हें कुणासच माहीत नव्हतें ! राजघराण्याचें तें एक गुपित आहे, एवढेंच सर्वजण सांगत.

राजधानींत आलेला हा नवीन देखणा सरदार आपल्या उमद्या घोड्यावरून दररोज राजवाड्यावरून चारदोन फेरफटके मारीत असे. राजवाड्यांतून राजाच्या मुलाची व या सरदाराची वारंवार दृष्टभेट होत असे. राजपुत्र आणि हा सरदार जवळजवळ सारख्याच वयाचे. त्यामुळें राजपुत्राला हळूहळू या सरदाराची ओळख करून घ्यावी असें वाटूं लागलें. प्रधानाचा मुलगाहि राजपुत्राच्या बरोबरीचा होता. आणि त्याची व राजपुत्राची जीवश्चकंठश्च मैत्री होती. अखेरीस या दोघा मित्रांनीं या सरदाराची ओळख करून घेण्याचें ठरवलें. एके दिवशीं आपल्या नोकरांकरवीं सरदाराचा घोडा थांबवून सरदाराला राजवाड्यांत येण्याचा निरोप त्यांनीं दिला.

त्या तरुण सरदाराच्या मोहकपणामुळें व गोड वागण्यानें राजपुत्राची व प्रधानपुत्राची त्याच्याशीं थोड्याच दिवसांत गाढ मैत्री झाली. एकमेकांना

एकमेकांवांचून करमेना. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते एकत्र रहावयाचे, फिरावयाचे व कधीं कधीं जेवायचेहि. एखाद्या दिवशीं राजपुत्र सरदाराला आपल्या वाड्यांतच राहण्याचा आग्रह करी. पण तेवढें मात्र सरदार टाळीत असे. आपण स्त्री आहों व हें वेषांतर जर कोणास कळलें तर आपलें काम होणार नाहीं व राजा आपल्या वडलांचा शिरच्छेद केल्यावांचून राहणार नाहीं, याची जाणीव तिला सतत होती.

प्रधानाच्या पुत्राला मधून मधून संशय यायचा कीं, हा सरदार पुरुष नसून कुणीतरी स्त्री असली पाहिजे ! सरदाराच्या बारीकसारीक हालचालींवर तो नजर ठेवायचा.

सरदाराच्या लक्षांतहि ही गोष्ट आली होती. पण तोहि कांहीं कमी हुषार नव्हता. त्याच्या वागण्यांत तो कधींहि आपलें स्त्रीत्व उघड होईल असें वर्तन अथवा आविर्भाव येऊं देत नसे.

प्रधानाचा मुलगाहि हुषार होता. त्यानें ठरवलें कीं आपला तर्क खरा कीं खोटा, हें पडताळून पहायचें असेल तर बारीकसारीक गोष्टींतच सरदाराची परीक्षा पाहिली पाहिजे. प्रधानाच्या मुलानें आपली शंका राजपुत्रास एकदोन वेळां बोलून दाखविली. पण राजपुत्रानें तिकडे लक्षहि दिलें नाहीं किंवा या तर्कावर विश्वासहि ठेवला नाहीं.

एक दिवस प्रधानाच्या मुलानें सरदारास मुद्दाम आपल्या घरीं फराळास बोलावलें व त्याच्या समोरच त्याचें लक्ष जाईल अशा ठिकाणीं एका भांड्यांत दूध तापत ठेवण्याची व्यवस्था केली. हेतु हा कीं, दूध उतूं जातांना सरदारानें पाहिलें म्हणजे तो स्त्री असेल तर ' आलें, आलें ! ' असें ओरडेल, व पुरुष असेल तर तिकडे लक्ष तरी देणार नाहीं, किंवा फार तर ' दूध, दूध ! ' असें कांहींतरी म्हणेल.

सरदारहि हुशार होताच. उतूं जाणाऱ्या दुधाकडे तो निर्विकार मुद्रेनें पहात राहिला. प्रधानपुत्राच्या एका परीक्षेंत सरदार हा सरदारच ठरला !

पण एवढयानें प्रधानपुत्राची शंका दूर झाली नाहीं. दुसऱ्या वेळेस प्रधानपुत्रानें सरदारास जेवणासच बोलावलें. मुद्दाम करंज्या केल्या होत्या. सरदाराची बसण्याची पद्धत, घांस घेण्याची रीत सर्व कांहीं प्रधानपुत्र बारकाईनें पहात होता. पण त्यामधून त्यास सरदाराच्या स्त्रीपणाचें एकहि लक्षण दिसलें नाहीं ! भोजनास करंज्या करण्याचें कारण असें कीं, सरदार जर स्त्री

असेल तर तो अगोदर टिचकीनें करंजी फोडील व नंतर खाईल! पण जर पुरुष असेल तर सरळ दातांनेंच तुकडा करील.

सरदारानें आपलें सोंग एवढें बेमालूम केलें होतें कीं याहि परीक्षेंत तो पास झाला व प्रधानपुत्रला आपली शंका खोटी असल्याचें वाटूं लागलें.

सरदारानें हळूहळू राजपुत्राची एवढी मर्जी संपादन केली कीं, त्यास सर्वांत अधिक जीवाभावाचा मित्र राजपुत्र समजूं लागला. एक दिवस राजपुत्र खुषींत आहे असें पाहून सरदार म्हणाला, " तुम्ही मला आपले जिवश्चकंठश्च मित्र म्हणवितां, पण आपल्या राज्यांतील मोत्याची बाग अजून दाखविली नाहीं, हें कसें ? "

राजपुत्र म्हणाला, " राजवाड्यांतील ही मोत्यांची बाग राजघराण्यांतील कांहीं ठराविक व्यक्तींशिवाय इतरांना दाखवायची नाहीं असा परिपाठ आहे. बागेंत काम करणारा माळी व रखवालदार यांनाहि बाग सोडून बाहेरच्या जगांत यावयास मज्जाव आहे. बागेचा रस्ता असा तयार करण्यांत आला आहे कीं, त्यांना प्रयत्न करूनहि तेथून बाहेर पडतां येणार नाहीं. त्यांपैकीं कोणाला कधीं बाहेर यावेंच लागलें तर आमच्यापैकीं कोणीतरी त्यांना डोळे बांधून घेऊन येतें."

सरदाराचें मन फारच नाराज झालेलें पाहून अखेर राजपुत्रानें सरदाराचे डोळे बांधून त्याला तेथें नेण्याचें मान्य केलें. सरदारहि तयार झाला. दुसऱ्या दिवशीं पहाटें सूर्योदयापूर्वीं सरदारानें राजवाड्यांत यावयाचें व राजपुत्रानें त्यास बाग दाखवायची असें ठरलें.

## ३ : मोत्यांचीं कणसें मिळालीं !

सरदारानें रात्रींच आपल्या घोड्याचें जीन फाडलें व त्यांतील काथ्या व कापूस बाहेर काढून त्याऐवजीं नदींतील पांढरी शुभ्र वाळू त्यांत भरली व एक लहानसें छिद्र ठेवून जीन शिवून घेतलें. या छिद्रांतहि कापडाचा लहानसा बोळा बुचाप्रमाणें बसवून दिला व आपल्या घोड्यावर पुन्हां तें जीन घालून ठरल्याप्रमाणें भल्या पहांटें राजवाड्यांत तो दाखल झाला.

पहांटेच्या अर्धवट अंधारांतच राजपुत्र व सरदार आपल्या घोड्यांवरून मोतीबागेकडे निघाले. पूर्वीं ठरल्याप्रमाणें सरदाराचे डोळे बांधलेले होते व

त्याच्या घोड्याचा लगाम राजपुत्राच्या हातीं होता. घोडा चालूं लागतांच सरदारानें हळूंच आपल्या घोड्याच्या जीनाला बसवलेलें बूच काढलें व शुभ्र वाळूची बारीक धार हळूहळू जमिनीवर घरंगळूं लागली !

सरदाराला जरी कांहीं दिसत नव्हतें तरी घोड्याच्या चालीवरून त्याला हें समजत होतें कीं अत्यंत कठीण, वेड्यावांकड्या, वळणावळणाच्या रस्त्यानें घोडा चालला आहे ! एखाद्या भुलभुलैय्यामधून आपण चालतों आहों, हें सरदार अंदाजानें समजत होता. एके ठिकाणीं तर क्षणभर घोडा थांबलाहि पण राजपुत्रानें 'चलो दिवाना' म्हणून घोड्याला एक शिवी दिली तेव्हांच तो पुढें चालूं लागला.

त्यांचा हा प्रवास बऱ्याच वेळानंतर संपला. दोघेहि घोड्यावरून खालीं उतरले. एवढ्यांत त्या दोघांपैकीं एकाचा घोडा जोरानें फुरफुरला. जातिवंत घोडे सहसा असे वाटेल तेव्हां फुरफुरत नाहींत, तेव्हां हें काय घडतें आहे, याचा सरदार विचार करतो आहे तोंच त्याचे डोळे सोडण्यांत आले व दार-वानाचा मुजरा स्वीकारीत त्या दोघा जणांनीं बागेच्या प्रचंड दरवाजांतून मोतीबागेंत प्रवेश केला !

बागेंतील सौंदर्य पाहून सरदाराचे डोळे दिपूनच गेले. एखादें मक्याचें शेत असावें तशीं हारीनें रोपें लागलीं होतीं व त्यावर देदीप्यमान मोत्यांचीं कणसें लहडलेलीं होतीं. कांहीं मोतीं तर द्राक्षांएवढें मोठे होते. आजूबाजूच्या झाडांवर चित्रविचित्र रंगाचे सुंदर सुंदर पक्षी इकडून तिकडे उड्या मारीत होते. मोत्यांचा चारा खाण्यासाठीं आलेले सोनेरी रंगाचे राजहंस आकाशांत घिरट्या घालीत होते. जवळच वाहणाऱ्या झऱ्याचें पाणी एका आगळ्याच तेजानें चमकत होतें. मनाला मोहन टाकणारा मंद सुगंध सर्वत्र दरवळला होता.

राजपुत्रानें सरदाराला सबंध बाग दाखवली. बागेंतील एका विश्राम गृहांत दोघांनीं उपहार केला व दोघेहि बागेंतून बाहेर पडले.

बागेची दिंडी बंद करतांना दारवानानें राजपुत्राला हळूंच सांगितलें कीं उद्यां येणाऱ्या पौर्णिमेच्या दिवशीं तुमच्यासाठीं दोन कणसें तोडून ठेवतों ! त्याच वेळेला सरदाराला राजपुत्राकडून हेंहि समजलें कीं पौर्णिमेलाच तोडलेल्या कणसांतील मोतीं कायम तेजःपुंज राहतात. एरवीं तीं तोडतांक्षणींच काळीं-ठिक्कर पडतात !

सरदाराचे डोळे पुन्हां बांधण्यांत आले व आल्या वाटेनेंच राजपुत्र व सरदार राजवाड्यांत परतले. थोडा वेळ इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यावर सरदारानें अगदीं सहज विषय काढला. तो म्हणाला, " माणसाच्या चेहऱ्यापेक्षां पोशाखावरूनच लोक त्याला ओळखतात. "

सरदाराचा हा मुद्दा राजपुत्राला मान्य नव्हता. दोघेहि आपले मुद्दे तावातावानें व आग्रहानें मांडीत होते. एक दुसऱ्याचें म्हणणें मान्य करण्यास तयार नव्हता. अखेर सरदारानें सूचना केली, " उद्यांच आपण प्रयोग करूं या. आपण माझा पोशाख धारण करावा व मी आपला पोशाख घालीन आणि राजधानींत आपण कांहीं वेळ एकत्र व कांहीं वेळ वेगवेगळी रपेट मारूं. पाहूं या लोक तुम्हांला मुजरा करतात कीं मला !

राजपुत्राला ही कल्पना एकदम पसंत पडली व त्याप्रमाणें करण्याचें ठरलें.

दुसऱ्या दिवशीं राजपुत्र व सरदार आपल्या पोशाखांची अदलाबदल करून सारा दिवसभर राजधानींत हिंडले. राजपुत्राला दिसून आलें कीं सरदाराचेंच म्हणणें बरोबर होतें. राजपुत्राचा नेहमींचा पोशाख घातलेल्या सरदारालाच लोक मुजरा करायचे ! रात्र पडेपर्यंत ते दोघेहि एकत्र हिंडले, वेगवेगळे हिंडले. सगळीकडे एकच अनुभव आला. एवढेंच नव्हे तर राजवाड्याच्या दिंडींतून प्रवेश करतांनाहि सरदारालाच प्रथम मुजरा मिळाला !

एरवीं राजपुत्राच्या अत्याग्रहानेंहि राजवाड्यांत कधीं मुक्काम न करणाऱ्या त्या सरदारानें त्या दिवशीं राजपुत्रानें जराशी सूचना करतांच राजवाड्यांत मुक्काम करण्यास अनुमति दिली. रात्रीं पुष्कळ वेळ गप्पागोष्टी करून राजपुत्र आपल्या दालनांत व सरदार त्यास दिलेल्या खोलींत झोपावयास गेले. अजूनहि सरदाराच्या अंगावर राजपुत्राचेच कपडे होते !

भल्या पहांटे सरदार उठला. राजपुत्राच्या पोशाखांतच घोड्यावर स्वार झाला व तडक मोतीबागेचा रस्ता त्यानें पकडला. प्रथम राजपुत्राबरोबर बागेंत जातांना त्यानें घोड्याच्या जीनांतील वाळू सोडून रस्त्याचा माग काढतां येईल अशी तरतूद केली होतीच. पौर्णिमेच्या टिपूर चांदण्यांत ती पांढरी वाळू चटकन् दिसत होती व त्या वाळूवरून मागोवा घेत घेत सरदार पुढें पुढें जात होता. अखेर एका मोठ्या तटापाशीं तो येऊन पोंचला !

" आतां पुढें काय? इथें वाट तर संपूर्ण बंद!" असें त्याच्या मनांत आलें. क्षणभर तो विचारांत पडला आणि त्याला आठवलें कीं राजपुत्राबरोबर जातांना घोडा येथेंच थांबला होता व राजपुत्रानें घोड्याला 'चलो दिवाना' म्हणून शिवीहि दिली होती! ही शिवी नसून हा कांहींतरी मंत्र किंवा परवलीचा शब्द असावा, अशी कल्पना करून सरदारानें 'चलो दिवाना' अशी आपल्या घोड्याला शिवी दिली. तोंच काय आश्चर्य! समोरच्या प्रचंड तटांत एखाद्या भुयाराप्रमाणें एक लहानसा दरवाजा उघडला गेला व सरदार आंत जातांच पुन्हां बंद झाला! सरदाराच्या आतां लक्षांत आलें कीं राजपुत्राबरोबर आलों असतां आपण घोड्याचें फुरफुरणेंहि ऐकलें होतें. तोहि असाच परवलीचा शब्द असावा.

वाटेंत कोणतेहि अडथळे न येतां सरदार बागेच्या दिंडीजवळ आला व घोड्यावरून उतरला. द्वारपालानें मुजरा केला, पण दिंडी कांहीं उघडली नाहीं. सरदारानें चटकन् घोडयाच्या फुरफुरण्याचा आवाज केला. द्वारपालानें दिंडी उघडली व हा राजपुत्रच समजून मोत्याचीं दोन कणसें सरदाराला दिलीं!

कणसें हातीं पडतांच सरदारानें द्रुत गतीनें घोडा राजवाड्याकडे दौडवला. आपल्या मुक्कामाच्या खोलींत त्यानें राजासाठीं एक पत्र लिहून ठेवलें. आपण अमुक राज्यांतील प्रधानकन्या असून तेथील राजपुत्रानें घातलेल्या मागणीपासून सर्व हकिगत तिनें पत्रांत लिहिली. शेवटीं राजपुत्राची प्रतारणा केल्याबद्दल त्याची क्षमा मागितली व प्रधान-पुत्राचेहि आभार मानले. राजपुत्राला सहज दिसेल अशा ठिकाणीं ती चिठ्ठी ठेऊन तिनें राजवाड्याचा व राजधानीचा निरोप घेतला.

## ४ : मोतीनगरचें राणीपद पटकावलें!

इकडे जसजशी सहा महिन्यांची मुदत भरत आली तसतशी प्रधानाला काळजी वाटूं लागली. एकतर एवढ्या दिवसांत मुलीची कांहींच वार्ता त्याला कळली नव्हती व दुसरें म्हणजे ठरलेल्या मुदतींत मुलगी आली नाहीं तर आपला शिरच्छेद होणार हीहि चिंता त्याला होती!

दिवसेंदिवस तो खंगत चालला होता. कारभाराकडेहि त्याचें लक्ष नव्हतें.

सहा महिने पुरे होण्याला आतां एकाच महिन्याचा अवधी होता. संध्याकाळच्या वेळीं प्रधान आपल्या वाड्याच्या गच्चीवर चिंताग्रस्त मनस्थितींत उभा असतां दुरून दौडत येणारा घोडेस्वार त्याला दिसला. दृष्टीच्या टप्प्यांत येतांच पुरुषवेषांतील आपल्या मुलीला त्यानें ओळखलें. तो धांवतच खालीं आला. वाड्याच्या दारांतच पिता-पुत्रींची भेट झाली. आपल्या पित्याच्या शरीराची ती अवस्था पाहून तिच्या डोळ्यांत पाणी आलें ! आपणच या सर्व प्रसंगाला जबाबदार आहों म्हणून तिला अतोनात दुःख झालें.

प्रधानकन्येनें आपली सर्व हकिगत पित्याला सांगितली. मुलीची हुषारी पाहून प्रधानहि चकित झाला व असलें रत्न या निर्बुद्ध राजपुत्राला देणें चूकच ठरलें असतें असें त्यासहि वाटलें.

मुलीच्या सांगण्यावरहुकूम प्रधानानें राजास निरोप पाठवला, " मुलगी मोत्यांचीं कणसें घेऊन आली आहे व आजपासून पंधरा दिवसांनीं कणसें आपणांस ती दरबारांतच अर्पण करील. त्यावेळीं दरबार भरवला जावा अशी तिची इच्छा व प्रार्थना आहे. "

राजानें त्याप्रमाणें दरबार भरविण्याचा हुकूम दिला.

इकडे मोतीनगरचा राजपुत्र सकाळींच सरदाराच्या खोलींत येता तों त्यास तेथें कोणीच नसल्याचें पाहून आश्चर्य वाटलें ! निरोप घेतल्याखेरीज सरदार राजवाडा सोडून जाणार नाहीं याची त्यास खात्री होती. म्हणून थोडा वेळ तो तेथेंच थांबला. एवढ्यांत त्याची नजर मेजावर ठेवलेल्या कागदाच्या घडीकडे गेली. ती घडी त्यानें उघडली, तों तें सरदारनें त्यालाच लिहून ठेवलेलें पत्र होतें !

पत्र वाचतांच राजपुत्राला त्या मुलीच्या धाडसाचें कौतुक वाटलें. त्याबरोबरच त्यानें हाहि विचार केला कीं, या मुलीनें मोत्याचीं कणसें नेऊन दिलीं तरी तिच्यावर कांहींतरी संकट आल्यावांचून रहाणार नाहीं व अशा वेळीं तिला मदत करणें आपलें कर्तव्य आहे.

आपल्याबरोबर निवडक सशस्त्र सहकारी व प्रधानपुत्र यांना घेऊन त्या मूर्ख राजपुत्राच्या राजधानीस राजपुत्र येण्यास निघाला.

राजधानींत ते येऊन पोंचले त्याच दिवशीं दरबार भरून प्रधानकन्य मोत्याचीं कणसें राजाला देणार होती. दरबाराची माहिती मिळतांच ते सर्वजण सरदारांचा वेश करून थेट दरबारांत दाखल झाले.

दरबार सुरू झाला. राजेसाहेब आपल्या स्थानावर येऊन बसले. त्यांच्या एका बाजूला तो मूर्ख राजपुत्र बसला होता. आतां पुढें काय करावें, या विचारानें तो कांहींसा बेचैनच दिसत होता. प्रधानकन्या दरबारांत एका उच्च आसनावर उभी राहिली. आपल्याजवळील तीं चमकदार मोत्याचीं कणसं तिनें सबंध दरबारास दाखवलीं व राजेसाहेबांच्या चरणांवर तीं अर्पण केलीं व राजाची आज्ञा घेऊन तिनें दरबाराला दोन शब्द सांगण्यास सुरुवात केली. राजपुत्रानें मागणी कशी घातली, आपण ती नाकारल्यावर त्यानें कोणत्या अटी घातल्या व त्या अटींतील मूर्खपणा आपण त्याच्याच पदरांत कसा घातला व शेवटीं मोत्यांचीं कणसें मिळविण्यासाठीं आपण काय काय केलें हें सर्व तिनें सांगितलें. शेजारच्या राज्यांतील राजपुत्र व प्रधानपुत्र किती हुशार, संयमी व चारित्र्यवान आहेत याचेंहि तिनें बोलण्याच्या ओघांत वर्णन केलें.

भर दरबारांत आपल्या मुलाचा होत असलेला अपमान पाहून राजेसाहेब संतापानें लाल झाले, व "या उद्दाम पोरीला तावडतोब गिरफदार करून बंदीखान्यांत टाका" अशी आज्ञा त्यांनीं केली.

राजाचे सशस्त्र सेवक पुढें सरसावले. एवढ्यांत दरबाराच्या एका कोपऱ्यांतून आठदहा सशस्त्र सरदार विजेच्या वेगानें पुढें आले. काय होतें आहे हें समजण्याच्या आंतच त्यांनीं प्रधानकन्येस उचललें व एका निमिषार्धांत दरबारांतून बाहेर पडून आपल्या चपळ घोड्यावर प्रधानकन्येस घालून ते निघूनहि गेले !

दरबार त्या गोंधळांतच समाप्त झाला. एवढ्यांत मागें राहिलेल्या दोन सरदारांनीं प्रधानास सर्व हकीगत सांगितली व त्या राज्यास तावडतोब रामराम ठोकून निघण्यास सांगितलें. प्रधानालाहि पुढील संकटाची कल्पना होतीच. लगेच प्रधानहि आपल्या कुटुंबियांसमवेत त्या राज्यांचा त्याग करून मोतीनगरीच्या दिशेनें निघाला व वाटेंतच त्यानें मुलीला व त्या सर्व सरदारांना गाठलें.

मोतीनगरींत गेल्यावर राजपुत्रानें त्या मुलीबरोबर लग्न करण्याचा आपला मानस बोलून दाखवला. प्रधानकन्येनें मोठ्या आनंदानें संमति दिली व त्या दोघांचें मोठ्या थाटानें लग्न झालें! तिच्या वडिलांना एक मानाची जहागीर देण्यांत आली व पुढें सर्वांनीं सुखानें कालक्रमणा केली.

अनुक्रम 3632
विभाग बालवाङ्मय
क्रमांक 3754
नों. दि. 10.11.80



# चेटकी राणी

# १ : मोहांत फसलेला राजा

एक होता राजा. त्याला सात राण्या होत्या. एकीपेक्षां एक सुंदर, रूपानें जशा देखण्या तशाच स्वभावानें मनमिळाऊ. सख्ख्या बहिणींप्रमाणें एकमेकींशीं वागायच्या. राजाला अजून मूलबाळ नव्हतें. पण सातवी राणी गरोदर होती. त्यामुळें राजाला मोठा आनंद झाला होता. तेवढाच आनंद इतर सहाहि राण्यांना झाला होता. राजाच्या राजवाड्यांत द्वेष, हेवा, मत्सर यांना थाराच नव्हता.

राज्याच्या राजधानींतच एक चेटकी राहत होती. राजाचा हा सुखी व समाधानी संसार तिला पाहवला नाहीं. राजाचा संसार धुळीला मिळवायचा असा तिनें बेत केला. एके दिवशीं तिनें आपलें राक्षसिणीचें रूप टाकून एका सुंदर तरुण बाईचें रूप धारण केलें. उत्तम वस्त्रें नेसली. खूपखूप दागिने घातले आणि राजवाड्यासमोरील पिंपळाच्या पाराला प्रदक्षिणा घालूं लागली.

राजानें आपल्या राजवाड्यातून ती सुंदर स्त्री पाहिली. राजाची व तिची नजरानजर होतांच तिनें आपल्या मंत्रसामर्थ्यानें राजास भारून टाकलें. वाटेल तें झालें तरी या स्त्रीशीं आपण लग्न लावणार, असा निश्चय राजानें मनाशीं केला आणि आपल्या सेवकांकरवीं त्या स्त्रीला राजवाड्यांत बोलावून घेतलें.

राजाची व त्या चेटकिणीची भेट होतांच तिनें त्याला आपल्या जादूनें एवढें वश करून घेतलें कीं तिनें सांगावें व राजानें ऐकावें ! राजानें तिच्या-बरोबर लग्नाची गोष्ट काढतांच एका अटीवर आपण लग्नाला तयार असल्याचें तिनें सांगितलें, " आपल्या सातहि राण्यांना जंगलांत सोडून त्यांचे डोळे काढून आपल्यापाशीं आणून द्यावें ! " हीच ती अट.

चेटकीच्या मंत्रामुळें राजा अगदीं भ्रमिष्ट झाला होता. त्यानें ती अट कबूल केली आणि सातहि राण्यांना जंगलांत सोडून त्यांचे डोळे चेट-किणीजवळ आणून दिले. मग तिच्याशीं लग्न लावून राजा राज्यकारभार करूं लागला.

दिवसेंदिवस तो या नव्या राणीच्या मोहांत इतका गुरफटला कीं, राज्यकारभाराकडेहि त्याचें लक्ष लागेना. राज्यांत अंदाधुंदी माजूं लागली. राजाचे अधिकारी भ्रष्टाचारी बनले. प्रजाजनांचे हाल कोणी पुसेना. असें करतां करतां बारा वर्षें निघून गेली.

# २ : सूडाची भावना

इकडे जंगलांत सोडलेल्या सात आंधळ्या राण्या त्याच अरण्यांत राहणाऱ्या एका साधूनें पाहिल्या. त्यांना साधूनें आपल्या आश्रमांत नेलें. राण्यांनीं आपली सर्व हकिगत साधूला सांगितली. साधूनें त्यांना आपल्या आश्रमांत कायमचें राहण्याबद्दल सांगितलें. धाकटी राणी गरोदर असल्यामुळें तिची तर तो आपल्या मुलीप्रमाणें काळजी घेऊं लागला.

यथाकालीं राणी प्रसूत होऊन तिला एक सुंदर मुलगा झाला. दिसामाशीं मुलगा वाढूं लागला. त्याला थोडेसें समजूं लागतांच त्यानें आपल्या आयांची अशी स्थिति कां झाली, याची चौकशी करायला सुरुवात केली. हळूहळू त्याला सर्व हकिगत कळली.

आपल्या वडिलांकडून असलें अघोरी कृत्य करून घेणाऱ्या बाईचा सूड घेण्याची कल्पना तो आपल्या छोट्या वयांतच बोलून दाखवूं लागला. त्याच्या आईनें व सावत्र आयांनीं एक गोष्ट मात्र त्याच्या मनांत पूर्ण बिंबवली होती. ती म्हणजे त्याचे वडील फार चांगले असून नवीन राणीच्या दुष्टपणामुळेंच हें सारें घडून आलें.

वाढत वाढत राजपुत्र बारा वर्षांचा झाला. आतां मात्र राजधानींत जाऊन त्या बाईचा सूड घेण्यास तो अगदी उतावीळ झाला. अखेरीस राण्यांनीं व साधूनें त्यास परवानगी दिली. जातांना साधूनें त्यास आशीर्वाद दिला व एक मंतरलेली काठी देऊन सांगितलें कीं या काठीमुळें राज्यांतून प्रवास करतांना किंवा कुठेंहि तुला साप किंवा जंगली जनावरें त्रास देणार नाहींत.

राजपुत्र प्रवास करीत करीत राजधानींत येऊन पोंचला, आणि सरळ राजवाड्यांत जाऊन राजापुढें उभा राहिला. आपण फार गरीब असून आपणांस कांहीं काम द्यावें अशी त्यानें राजाची प्रार्थना केली.

राजालाहि एकदम त्या मुलाबद्दल प्रेम वाटूं लागलें. त्यानें त्यास राजवाड्याच्या खास बागेंत माळ्याच्या हाताखालीं काम दिलें.

राणीचें लक्ष या मुलाकडे जातांच त्याच्या रूपावरून तिनें ओळखलें कीं, हा त्या सातव्या राणीचाच मुलगा असला पाहिजे. तिनें त्या मुलाला बोलावून पुष्कळ प्रश्न विचारून खरें काढून घेण्याचा प्रयत्न केला. मुलगाहि हुशार होताच. उत्तरें देण्याची त्यानें चांगलीच टाळाटाळ केली. कांहीं वेळा तर चक्क खोटीं उत्तरें दिलीं. परंतु तरीहि राणीची खात्री होतीच कीं हा राजाचाच मुलगा आहे ! कांहींहि असलें तरी याची वाट लावलीच पाहिजे असा तिनें विचार केला.

## ३ : साधूनें चिठ्ठी बदलली

मंत्रांच्या सामर्थ्यानें एखाद्याला ठार मारणें तिला मुळींच अवघड नव्हतें. एक दिवस तो मुलगा बागेंत एकटाच काम करीत असतां राणीनें मंत्र-सामर्थ्यानें एक भयंकर मोठा विषारी सर्प निर्माण केला ! बागेंतील एका वारुळां-तून तो साप फूं फूं करीत बाहेर आला व मुलाला दंश करण्यासाठीं त्याच्या अंगावर धांवला. साधूनें दिलेली मंतरलेली काठी मुलाजवळ होतीच. त्या मुलाजवळ येतांच सापाचा राग एकदम शांत झाला व तो एखाद्या पाळीव जनावराप्रमाणें मुलाच्या पायाभोंवतीं खेळूं लागला. त्या मुलानेंहि सापाला बराच वेळ खेळवून वारुळांत सोडून दिलें.

*

चेटकी राणी राजवाड्यांतून हा सर्व प्रकार लक्षपूर्वक पाहत होती. ह्या एकाच प्रकारामुळें तिची खात्री झाली कीं, या पोराच्या मागें कांहीं तरी जबरदस्त दैवी शक्ति असली पाहिजे, आणि म्हणूनच आपलें मंत्रसामर्थ्य अपुरें पडलें. आपल्या हातून या पोराला मरण येणें शक्य नाहीं अशी तिची खात्री झाली. आपल्यापेक्षां आपल्या आईबापांचें चेटूक करण्याचें सामर्थ्य शंभरपट अधिक आहे, तेव्हां त्यांच्याकडेच या पोराला पाठवून याचा निकाल लावावा

दुसऱ्या दिवशीं तिनें त्या पोराला बोलावून एक महत्त्वाची चिठ्ठी देऊन तांतडीनें ती आपल्या आईवडिलांकडे पोचविण्याबद्दल त्याला सांगितलें.

प्रवास चांगला आठ दहा दिवसांचा होता. सर्व प्रवास पायींच करावयाचा होता. तिनें रस्त्यांची माहिती त्या पोराला दिली व एका बंद लिफाफ्यांत घालून एक चिठ्ठी दिली. चिठ्ठींत लिहिलें होतें. : "हा माझ्या सवतीचा मुलगा आहे. याचे डोळे काढून घ्यावें व नंतर त्याचे हालहाल करून त्यास ठार मारावें ! या पोराला दैवी शक्तीचें पाठबळ असल्यामुळें माझी विद्या अपुरीच पडते. तरी हें काम जरूर करावें."

चिठ्ठींत काय लिहिलें आहे याची त्या पोराला कल्पनाहि नव्हती. राणीचें काम आपण नीट बजावलें तर तिचा आपल्यावर विश्वास बसेल व मग तिचा सूड घेण्याची संधि आपणांस केव्हांतरी मिळेल. एवढ्याच कल्पनेनें त्यानें हा अडचणीचा प्रवास पत्करला होता. शिवाय साधूनें दिलेली काठी जवळ असल्यामुळें त्याला जंगली जनावरांचें भय नव्हतेंच.

प्रवास करीत करीत एके दिवशीं सायंकाळीं एका जंगलांतील पडक्या देवळांत त्यानें रात्रींचा मुक्काम केला. प्रवासाच्या श्रमानें तो लौकरच गाढ झोंपीं गेला. देवळांतील देवाची पूजा करण्यासाठीं एक साधू रोज मध्यरात्रीं नियमित येत असे. आज देवळांत झोंपलेला तो राजबिंडा पोरगा पाहून साधूला आश्चर्य वाटलें. एवढ्या घोर अरण्यांत तो एवढा निर्धास्त झोंपलेला पाहून साधूला विशेषच नवल वाटलें. हा कोण आहे, कोठून आला व कुठें जात आहे याची चौकशी करावी असें त्यास वाटलें. पण मुलाची ती गाढ झोंप मोडण्याचें साधूच्या जिवावर आलें.

एवढ्यांत त्या साधूला त्या मुलाच्या उशापाशीं एक लिफाफा दिसला. त्यांत काय लिहिलें आहे त्यावरून या मुलाची माहिती मिळेल या कल्पनेनें त्या साधूनें तो लिफाफा हळूंच उघडला व वाचला. आंतील मजकूर वाचून साधूला मोठाच धक्का बसला. त्या सुकुमार पोराची साधूला दया आली. सावत्र आयांनीं मुलाचें केलेले छळ साधूनें ऐकले होते. पण एखादी सावत्र आई मुलाचा अशा प्रकारें घात करूं शकेल याची त्यास कल्पना नव्हती ! साधूनें त्या लिफाफ्यांतील पत्र काढून घेतलें व त्या जागीं एक वेगळीच चिठ्ठी लिहून लिफाफा बंद केला. चिठ्ठींत लिहिलें होतें, "प्रेमानें जतन करून वाढवलेला माझा मुलगा तुमच्या भेटीसाठीं पाठवीत आहे. त्याला चांगलें लाडांत ठेवा. भरपूर खायप्यायला द्या. त्याचे सारे हट्ट पुरवा आणि पंधरा दिवसांनीं परत पाठवा."

राणीचें लक्ष या मुलाकडे जातांच त्याच्या रूपावरून तिनें आळखल कीं, हा त्या सातव्या राणीचाच मुलगा असला पाहिजे. तिनें त्या मुलाला बोलावून पुष्कळ प्रश्न विचारून खरें काढून घेण्याचा प्रयत्न केला. मुलगाहि हुशार होताच. उत्तरें देण्याची त्यानें चांगलीच टाळाटाळ केली. कांहीं वेळा तर चक्क खोटीं उत्तरें दिलीं. परंतु तरीहि राणीची खात्री होतीच कीं हा राजाचाच मुलगा आहे ! कांहींहि असलें तरी याची वाट लावलीच पाहिजे असा तिनें विचार केला.

## ३ : साधूनें चिठ्ठी बदलली

मंत्रांच्या सामर्थ्यानें एखाद्याला ठार मारणें तिला मुळींच अवघड नव्हतें. एक दिवस तो मुलगा बागेंत एकटाच काम करीत असतां राणीनें मंत्र-सामर्थ्यानें एक भयंकर मोठा विषारी सर्प निर्माण केला ! बागेंतील एका वारुळां-तून तो साप फूं फूं करीत बाहेर आला व मुलाला दंश करण्यासाठीं त्याच्या अंगावर धांवला. साधूनें दिलेली मंतरलेली काठी मुलाजवळ होतीच. त्या मुलाजवळ येतांच सापाचा राग एकदम शांत झाला व तो एखाद्या पाळीव जनावराप्रमाणें मुलाच्या पायाभोंवतीं खेळूं लागला. त्या मुलानेंहि सापाला बराच वेळ खेळवून वारुळांत सोडून दिलें.

चेटकी राणी राजवाड्यांतून हा सर्व प्रकार लक्षपूर्वक पाहत होती. ह्या एकाच प्रकारामुळें तिची खात्री झाली कीं, या पोराच्या मागें कांहीं तरी जबरदस्त दैवी शक्ति असली पाहिजे, आणि म्हणूनच आपलें मंत्रसामर्थ्य अपुरें पडलें. आपल्या हातून या पोराला मरण येणें शक्य नाहीं अशी तिची खात्री झाली. आपल्यापेक्षां आपल्या आईबापांचें चेटूक करण्याचें सामर्थ्य शंभरपट अधिक आहे, तेव्हां त्यांच्याकडेच या पोराला पाठवून याचा निकाल लावावा असें तिनें ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं तिनें त्या पोराला बोलावून एक महत्त्वाची चिठ्ठी देऊन तांतडीनें ती आपल्या आईवडिलांकडे पोंचविण्याबद्दल त्याला सांगितलें.

प्रवास चांगला आठ दहा दिवसांचा होता. सर्व प्रवास पायींच करावयाचा होता. तिनें रस्त्यांची माहिती त्या पोराला दिली व एका बंद लिफाफ्यांत घालून एक चिठ्ठी दिली. चिठ्ठींत लिहिलें होतें. : "हा माझ्या सवतीचा मुलगा आहे. याचे डोळे काढून घ्यावें व नंतर त्याचे हालहाल करून त्यास ठार मारावें ! या पोराला दैवी शक्तीचें पाठबळ असल्यामुळें माझी विद्या अपुरीच पडते. तरी हें काम जरूर करावें."

चिठ्ठींत काय लिहिलें आहे याची त्या पोराला कल्पनाहि नव्हती. राणीचें काम आपण नीट बजावलें तर तिचा आपल्यावर विश्वास बसेल व मग तिचा सूड घेण्याची संधि आपणांस केव्हांतरी मिळेल. एवढ्याच कल्पनेनें त्यानें हा अडचणीचा प्रवास पत्करला होता. शिवाय साधूनें दिलेली काठी जवळ असल्यामुळें त्याला जंगली जनावरांचें भय नव्हतेंच.

प्रवास करीत करीत एके दिवशीं सायंकाळीं एका जंगलांतील पडक्या देवळांत त्यानें रात्रींचा मुक्काम केला. प्रवासाच्या श्रमानें तो लौकरच गाढ झोंपीं गेला. देवळांतील देवाची पूजा करण्यासाठीं एक साधू रोज मध्यरात्रीं नियमित येत असे. आज देवळांत झोंपलेला तो राजबिंडा पोरगा पाहून साधूला आश्चर्य वाटलें. एवढ्या घोर अरण्यांत तो एवढा निर्धास्त झोंपलेला पाहून साधूला विशेषच नवल वाटलें. हा कोण आहे, कोठून आला व कुठें जात आहे याची चौकशी करावी असें त्यास वाटलें. पण मुलाची ती गाढ झोंप मोडण्याचें साधूच्या जिवावर आलें.

एवढ्यांत त्या साधूला त्या मुलाच्या उशापाशीं एक लिफाफा दिसला. त्यांत काय लिहिलें आहे त्यावरून या मुलाची माहिती मिळेल या कल्पनेनें त्या साधूनें तो लिफाफा हळूंच उघडला व वाचला. आंतील मजकूर वाचून साधूला मोठाच धक्का बसला. त्या सुकुमार पोराची साधूला दया आली. सावत्र आयांनीं मुलाचें केलेले छळ साधूनें ऐकले होते. पण एखादी सावत्र आई मुलाचा अशा प्रकारें घात करूं शकेल याची त्यास कल्पना नव्हती ! साधूनें त्या लिफाफ्यांतील पत्र काढून घेतलें व त्या जागीं एक वेगळीच चिठ्ठी लिहून लिफाफा बंद केला. चिठ्ठींत लिहिलें होतें, "प्रेमानें जतन करून वाढवलेला माझा मुलगा तुमच्या भेटीसाठीं पाठवीत आहे. त्याला चांगलें लाडांत ठेवा. भरपूर खायप्यायला द्या. त्याचे सारे हट्ट पुरवा आणि पंधरा दिवसांनीं परत पाठवा."

## ४ : नवे सोबती

दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें राजपुत्राचा प्रवास चालू झाला. जातां जातां त्याला एका वाघाचें ओरडणें ऐकूं आलें. वाघाच्या आवाजावरून तो मोठ्या दुःखानें किंवा वेदनांमुळें ओरडत असला पाहिजे हें राजपुत्रानें ओळखलें. निवडुंगाच्या एका जाळींत वाघ अडकला होता व त्याच्या सर्व अंगांत काटे घुसलेले होते ! राजपुत्रानें निवडुंगाचे फडे सपासप तोडून काढले व वाघाला बाहेर काढून त्याच्या पायांतील व शरीरांतील काटे काढून टाकले. वाघानें मुलाकडे कृतज्ञतेच्या दृष्टीनें पाहिलें व त्या मुलामागून तो वाघहि एखाद्या इमानी कुत्र्याप्रमाणें चालूं लागला.

कांहीं वेळानंतर एके ठिकाणीं दोन कबुतरें भांडतांना त्याच्या दृष्टीस पडलीं. त्यांपैकीं एक कबुतर जरा दुबळें होतें. दुसऱ्या कबुतरानें त्याला अगदीं रक्तबंबाळ केलें होतें. मुलानें मध्यें पडून त्या आडदांड कबुतरास हांकून लावलें व त्या दुबळ्या कबुतराची सुटका केली. कबुतरानेंहि राजपुत्राकडे कृतज्ञतेनें पाहिलें व तें त्याच्या खांद्यावरच जाऊन बसलें. वाघाप्रमाणेंच तेंहि राजपुत्राला सोबत करूं लागलें.

राजपुत्र थोडा पुढें जातो तों त्यास अंग ठेंचाळून रक्तबंबाळ झालेला एक आंधळा भेटला. त्याच्या दोन्ही डोळ्यांच्या निव्वळ खांचा झालेल्या होत्या ! राजपुत्रानें आंधळ्याला मोठ्या प्रेमळ शब्दानें विचारून चौकशी केली. एवढ्या निबिड जंगलांत आपणांस कोणी मनुष्य भेटेल अशी कल्पनाहि त्या आंधळ्याला नव्हती. त्या आंधळ्यानें मुलास सांगितलें, “ याच जंगलांत एक शंभर पायऱ्यांची विहीर आहे. झाडेझुडपें वेली यांनीं ती एवढी आच्छादलेली आहे कीं जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंना ती दिसत नाहीं. या विहिरीच्या पाण्यानें डोळे धुतले कीं जन्मांधासहि दृष्टि येते असें एका साधूनें मला सांगितलें आहे. त्या विहिरीच्या शोधांत मी आहें. ती विहीर शोधून काढण्यांत, मुला तूं जर मदत केलीस तर परमेश्वर तुला यश देईल. आंधळ्याच्या आशीर्वादानें तूं राज्यपद भोगशील ! ”

राजपुत्रानें त्या आंधळयास एका झाडाखालीं बसविलें, आपल्याजवळील फराळाचें त्याला खायला दिलें, तांब्यांतील पाणी प्यावयास दिलें व त्याला तेथेंच

बसवून तो स्वतः विहिरीच्या शोधास निघाला. लौकरच त्यानें ती विहीर शोधून काढली. तिचें एक तांब्याभर पाणी घेऊन त्यानें त्या आंधळ्याचे डोळे धुतले. तोंच काय आश्चर्य, आंधळ्याच्या डोळ्यांच्या खाचांच्या जागीं दोन सतेज डोळे दिसूं लागले! आंधळ्यानें मुलाला मनापासून आशीर्वाद दिला. आंधळा आपल्या वाटेनें चालूं लागला.

तेथून जतांना मुलानें एक निश्चय मात्र मनाशीं केला कीं, परत जातांना या विहिरीचें भरपूर पाणी घेऊन जायचें व आपल्या सर्व आयांना दृष्टिलाभ करून द्यायचा.

## ५ : चेटकीच्या बापाच्या घरीं

आणखी एक दिवस प्रवास केल्यावर पलीकडच्या निबिड अरण्यांत राणीनें खाणाखुणा सांगितलेलें घर दिसूं लागलें. त्या घराभोंवतीं उंच व भयाण असा दगडी तट होता. त्या तटाला तुरुंगाला असतो तसा एक गजाचा दरवाजा होता. दरवाजाच्या मध्यभागीं एक हाडाची कवटी टांगलेली होती व त्याच्या दोन्ही बाजूला लिंबांच्या माळा सोडलेल्या होत्या. दगडी भिंतीवर शेंदुराच्या रंगानें माणसांचीं मुंडकी व अनेक अक्राळ विक्राळ प्राणी रंगवलेले होते. तें सर्व दृश्य पाहून त्याच्या अंगावर काटाच उभा राहिला.

आतां त्याला पहिल्याप्रथमच कल्पना आली कीं, राणीचे आईबाप कोणीतरी चेटूक करणारे असावेत व राणीदेखील चेटकीच असावी! म्हणूनच तिनें आपल्या आयांचे असे हाल केले व आपल्या वडिलांना आपल्या मुठींत ठेवलें. आतां त्याला आपल्या वडिलांचा तिरस्कार वाटण्याऐवजीं दया येऊं लागली व मनांत एक वेगळेंच प्रेम निर्माण झालें. केवळ सूड म्हणून नव्हे तर राजाची या भुताळीपासून सुटका करण्यासाठीं ही राणी व तिचे आईबाप नष्ट केले पाहिजेत असा त्यानें मनाशीं निश्चय केला व त्या विचारांच्या तंद्रींतच तो त्या तटाजवळ येऊन पोंचला व हलकेंच त्यानें तटाचा दरवाजा ढकलला.

दरवाजाला आंतून कडी नव्हतीच. दरवाजा उघडतांच एक अक्राळ-विक्राळ कुत्रा जोरानें भुंकत त्या मुलाच्या अंगावर धांवून आला ! मुलाच्या नरडीचाच तो चावा घेणार, इतक्यांत मुलानें इशारा करतांच त्याच्याबरोबर असलेल्या वाघानें एका क्षणांत कुत्र्यावर झडप घालून त्यास जागच्या जागीं ठार केलें व जणुं काय आपली कामगिरी संपली असें समजून वाघ जंगलांत निघून गेला.

कुत्र्याचें भुंकणें ऐकून राक्षसिणीप्रमाणें दिसणारी बाई घराचा दरवाजा उघडून बाहेर आली. तिचे डोळे बटबटीत व लालभडक होते. गिधाडाच्या चोंचीप्रमाणें अणकुचीदार वांकडें नाक होतें. हिंस्र श्वापदांप्रमाणें हाताच्या व पायाच्या बोटांचीं नखें लांबलांब व धारदार होतीं. आपला कुत्रा रक्तबंबाळ होऊन मरून पडलेला पाहतांच तिनें धाडकन् दरवाजा लावून घेतला आणि कर्कश स्वरांत ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, " दाराशीं एक मुलगा आला आहे. त्यानें आपल्या कुत्र्याला ठार मारलें आहे. तुम्हांस माहीत आहे, ज्याच्या हातून आपल्या कुत्र्याला मरण येईल तोच आपल्यालाहि ठार मारील ! ताबडतोब बाहेर जाऊन त्या पोराचा निकाल लावा."

भयानक आरोळी ठोकूनच बाहेर राक्षस आला. पोराची मानगूट तो पकडणार, एवढ्यांत धीटपणानें त्या मुलानें सांगितलें, " तुमचा कुत्रा मीं कांहीं मारला नाहीं. जंगलांतील एका वाघानें त्याच्यावर झडप घातली. मला मारायचें असेल तर खुशाल मारा. पण तुमच्या लेकीचें पत्र घेऊन मीं आलों आहे तें वाचा आणि मग काय तें करा. "

गेल्या बारा वर्षांत राक्षसाला आपल्या लेकीची कांहींच हाकगत कळली नव्हती. लेकीचें नांव काढतांच त्याच्या रागाचा पारा अर्धा खालीं आला. मुलाच्या हातांतलें पत्र त्यानें घेतलें व अधीरपणानें वाचून काढलें. वाचून होतांच त्या अक्राळविक्राळ राक्षसानें अगदी नाजूक हातानें त्या पोराला उचलून घेतलें व त्याचे पटापट मुके घेऊन तो धांवतच घरांत गेला.

त्याची बायको आश्चर्यानें पाहातच राहिली. राक्षसानें आपल्या बायकोस मुलीच्या पत्रांतील हकिगत सांगितल्यावर मुलाच्या कौतुकांत तीहि सामील झाली व कुत्रा मेल्याचें दुःख ते दोघे विसरूनहि गेले.

त्या भयाण घरांत तो पोर आतां घरच्यासारखा वावरूं लागला.

घरांतील प्रत्येक वस्तूबद्दल त्या पोराला एक प्रकारचा तिटकारा वाटत होता. त्या तसल्या वातावरणांत त्याला विरंगुळा देणारा एकच प्राणी होता, तो म्हणजे त्याच्याबरोबर आलेलें कबुतर ! बाकी संबंध घरांत तो अक्राळविक्राळ राक्षस व राक्षसीण, ठिकठिकाणीं उभे करून ठेवलेले माणसांच्या हाडांचे सांपळे, दारादारांतून टांगलेल्या कवट्यांच्या माळा व भिंतीवर रंगवलेलीं भयानक प्राण्यांचीं चित्रें ! नाहीं म्हणायला चारी बाजूंनीं गजाच्या भिंती असलेल्या एका खोलींत पोपटाचें तीन पिंजरे टांगलेले होते. त्या खोलीला भलीं मोठीं पांच कुलपें लावलेलीं होतीं. त्यामुळें पोपटांजवळ जाण्याची सोयच नव्हती.

## ६ : कबुतराची कामगिरी

चारसहा दिवसांतच त्या पोरानें आजीआजोबांचें चांगलेंच प्रेम संपादन केलें. त्यानें वाटेल ती वस्तु मागावी व आजीआजोबानें ती द्यावी. त्याचा कोणताहि हट्ट पुरवायला ते दोघे अगदीं तयारच असत.

एक दिवस मुलानें ते पोपट एवढे बंद करून कां ठेवलेत म्हणून चौकशी केली. त्या दोघांनीं खूप टाळाटाळ केली. पण जेव्हां तो पोर ऐकेचना, तेव्हां राक्षसानें मुलाला सांगितलें, " बाळ पहिल्या दोन पिंजऱ्यांतील पोपट म्हणजे माझे व तुझ्या आजीचे प्राण आहेत आणि तिसऱ्या पोपटांत राणीचे म्हणजे तुझ्या आईचे प्राण आहेत. या पोपटांना जेव्हां मरण येईल तेव्हां आमचाहि मृत्यु होईल. म्हणून या पोपटांना आम्ही फार जपत असतों. "

मुलाच्या मनांत कल्पना आली कीं आतां या राक्षसराक्षसणीस व त्यांच्या त्या चेटक्या मुलीस मारणें सोपें आहे. प्रश्न होता तो एवढाच कीं त्या बंद खोलीच्या पांच कुलुपांच्या किल्ल्या कशा मिळवावयाच्या. त्या किल्ल्यांचा जुडगा राक्षसीण आपल्या गळ्यांतच बांधून ठेवी व क्षणभरहि त्या दूर करीत नसे.

दोन तीन दिवस किल्ल्या मिळविण्याचा प्रयत्न त्या मुलानें केला, पण जेव्हां हें शक्यच दिसेना तेव्हां त्यानें पोपटाचा समाचार घेण्याचें काम